## ओळखा पाहू



प्रतिष्ठच्या 'पद्मविभूषण' पुरस्काराने नुकतेच गौरवण्यात आलेले हे भारतातील विख्यात पत्रकार-संपादक.

'द इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया' या साप्ताहिकाचे, 'हिंदूस्थान टाईम्स' या वृत्तपत्राचे संपादकपद यांनी भूषवले आहे.

यांची ओळख पटवा आणि आम्हांस कळवा.

विजेत्यास १०१रु.चे रोख पारितोषिक दिले जाईल.

( संपूर्ण पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक आवश्यक )

### ऑगस्ट अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

विख्यात जर्मन तत्वज्ञ - **कार्ल मार्क्स**

'द कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' आणि 'दास कॅपिटल' हे कार्ल मार्क्स यांचे सर्वाधिक गाजलेले ग्रंथ.

स्पर्धेची विजेती - **साक्षी वाणी, चिपळूण.**

**अचूक उत्तर पाठवणारे वाचक**

चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, हरिभाऊ शिंदे, अर्चना कुलकर्णी, विजया तर्टे - औरंगाबाद, श्रीनिवास कुरणे - कोल्हापूर, भगवान बनसोडे - नांदेड, वसंत बापट, मिलिंद चिंधडे - नासिक, डॉ. पितांबर सरोदे - नंदुरबार, प्रफुल्ल तायडे - अमरावती, रा. व्यं. जोशी - अंबरनाथ(पू), हेमचंद जैन - जळगाव, पंढरीनाथ घाटे - जालना, वैशाली कुऱ्हेकर - अमरावती.

**प्रायोजक**

**श्री राजू जगदीशचंद्र मेहता**, मे.हिराचंद नानचंद अँड कंपनी, मालेगाव, जि.नाशिक.



◆ सप्टेंबर २००७
◆ वर्ष सातवे
◆ अंक नववा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक : सुनील मेहता

कार्यकारी संपादक : शंकर सारडा

संपादन सहाय्य : अनिरुद्ध पाटील, शिल्पा कुलकर्णी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

*— अनुक्रमणिका —*

**संपादकीय** - ४
**साहित्यवार्ता** ८
**पुस्तक परिचय**
**थंडरबॉल** : अनु. जयंत कर्णिक ३६
**द स्पाय हू लव्हड् मी** : अनु. अजित ठाकूर ४९
**द मॅन विथ द गोल्डन गन** : अनु. डॉ. देवदत्त केतकर ६१
**लिव्ह अँड लेट डाय** : अनु. अनिल काळे ७०
**यू ओन्ली लिव्ह ट्वाइस** : अनु. जयवंत चुनेकर ७८
**पुरस्कार** ८५
**साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे ९२
**श्रद्धांजली** ९७
**बालनगरी** १०४

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४, फॅक्स : २४४७५४६२
**Email - info@mehtapublishinghouse.com**
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षाची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## जेम्स बाँड : चिरतरुण नायक

'००७ जेम्स बाँड' या ब्रिटिश हेराच्या आगळ्यावेगळ्या थरारकथांनी गेल्या पन्नास वर्षांमध्ये जगभरच्या वाचकवर्गाला आणि चित्रपटरसिकांना अमाप आनंद दिला आहे. या व्यक्तिरेखेची निर्मिती करणाऱ्या इयान फ्लेमिंगची जन्मशताब्दी २८ मे २००८ पर्यंत साजरी होणार आहे आणि त्याअनुषंगाने जेम्स बाँडच्या सर्वच थरारकथांचा पुनश्च मार्केटिंगच्या अत्याधुनिक तंत्राद्वारे उठाव आणण्याच्या योजना आखल्या जात आहेत. ऑगस्टच्या अंकात आम्ही इयान फ्लेमिंग आणि जेम्स बाँड यांच्या जागतिक प्रभावाविषयी लिहिले होते. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने जेम्स बाँडच्या सर्व पुस्तकांच्या मराठी अनुवादाचे व प्रकाशनाचे हक्क मिळवलेले आहेत आणि गेल्या दीड-दोन वर्षापासून अनुवादाची प्रक्रिया चालू आहे. अकरा पुस्तके आजवर मराठीत आणली आहेत. त्यापैकी गेल्याच महिन्यात पाच पुस्तके एकदम बाजारात आली आहेत. या पुस्तकांचे परिचय या अंकात वाचकांच्या सोयीसाठी देण्यात आले आहेत. इयान फ्लेमिंगची जन्मशताब्दी त्यामुळे मराठी वाचकांच्या दृष्टीनेही एक पर्वणी ठरणार आहे.

जेम्स बाँडवर आजवर २१ चित्रपट निघाले; त्यात जेम्स बाँडची भूमिका सीन कॉनेरी, जॉर्ज लॅझेंबाय, रॉजर मूर, स्मिथी डाल्टन, पियर्स ब्रोस्नान, डॅनिएल क्रेग यांनी केल्या आहेत. त्यातील सीन कॉनेरीच्या, 'डॉ. नो', 'गोल्डफिंगर' वगैरे चित्रपटातील भूमिका या ट्रेंडसेटर ठरल्या. 'कॅसिनो रॉयल' ही जेम्स बाँडची पहिलीच कादंबरी इयान फ्लेमिंगने १९५२ मध्ये अवघ्या एका महिन्यात लिहून पूर्ण केली. त्यावेळी त्याचे लग्न ठरलेले होते; पण प्रत्यक्ष लग्नाला काही अवधी होता. मधल्या अस्वस्थ हुरहुरीच्या काळात वेळ घालवण्यासाठी काय करायचे या पोकळीतून इयान फ्लेमिंगने टाइपरायटर घेऊन जेम्स बाँड या गुप्तहेराला जन्म दिला. ''सर्व गुप्तहेरांना झाकोळून टाकणारा असा माझा गुप्तहेर नायक असणार आहे'' असे त्याने आपल्या मित्रांना सांगितले होते. त्याची ती धारणा म्हणजे केवळ आत्मप्रौढी नव्हती हे काळानेच दाखवून दिले आहे. या 'कॅसिनो रॉयल' कादंबरीवरचा चित्रपट तीन महिन्यांपूर्वी प्रदर्शित झाला. त्यात जेम्स बाँडची भूमिका डॅनिएल क्रेगने केली आहे... इयान फ्लेमिंगच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने जेम्स बाँडचे मोठ्या प्रमाणावर मार्केटिंग करण्याचाच हा प्रकार आहे हे खरे आहे; परंतु



एवढ्यावरच शताब्दीचा सोहळा थांबणार नाही. जेम्स बाँडवरील पुढचा चित्रपटही जन्मशताब्दीच्या निमित्ताने काढण्याची तयारी जोरात चालू आहे आणि त्यात डॅनिएल क्रेग या अभिनेत्याबरोबर भारतीय अभिनेत्री शिल्पा शेट्टी ही जेम्स बाँडची सखी-अभिनेत्री म्हणून दिसण्याची शक्यता आहे. तशा बातम्या डेली मेल वगैरे वृत्तपत्रातून आल्या आहेत. इंग्लंडमधील 'बिग ब्रदर'या रिॲलिटी शोमधील शिल्पा शेट्टीच्या विजयामुळे तिच्या नावालाही युरोपियन देशात सध्या मोठा भाव आहे. तिच्या इमेजचा फायदा घेण्याचा चित्रपटनिर्मात्यांचा विचार दिसतो. शिल्पा शेट्टी बाँडच्या तेविसाव्या चित्रपटात नायिका म्हणून दिसेल. (बाविसावा चित्रपट सध्या तयार होत आहे.)

जेम्स बाँड आणि त्याचा निर्माता इयान फ्लेमिंग यांच्या संदर्भातील एक भव्य प्रदर्शन भरविण्याची तयारी चालू आहे. एप्रिल २००८ मध्ये हे प्रदर्शन खुले होईल. 'फॉर युवर आइज ओन्ली' हे त्याचे नाव असेल. जेम्स बाँडची पुस्तके, त्याचे चित्रपट, त्याच्या पुस्तकांचे वेगवेगळ्या भाषांतील अनुवाद, इयान फ्लेमिंगचे जीवनचरित्र आणि कार्य दाखवणारी छायाचित्रे व अन्य साहित्य हे सर्व या प्रदर्शनात पाहायला मिळेल. वयाच्या पन्नाशीत लेखनाला आरंभ करून इयान फ्लेमिंगने अवघ्या दहाबारा वर्षांच्या अवधीत जगातील बेस्टसेलर म्हणून आपले नाव जनमानसावर उमटवले. पुस्तके आणि चित्रपट यांच्याच बरोबर खेळणी, गेम्स आणि तयार कपडे या क्षेत्रातही जेम्स बाँडने कोट्यवधी डॉलर्सची उलाढाल घडवून आणली.

जेम्स बाँड ही व्यक्तिरेखा १९५०-६० या कालखंडातील जागतिक शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर उभी आहे आणि तिच्यातील बरेच तपशील हे त्यावेळच्या वैज्ञानिक, राजकीय, सांस्कृतिक मूल्यप्रणालीशी आणि वातावरणासशी सुसंवादी आहेत. मोबाईल, इंटरनेट आयपॉड वगैरे नवनवीन तंत्रज्ञानाने घडून आलेल्या क्रांतीचे चित्र या थरारकथांमध्ये असणे वा तशी अपेक्षा करणे अशक्यच आहे. स्त्रीवादी लेखिकांना जेम्स बाँड नायिकांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही आक्षेपार्ह वाटणे स्वाभाविक आहे. तशात जेम्स बाँड हा साम्राज्यवादी... देशप्रेमी आहे. तो देशासाठी शत्रूंना कंठस्नान घालतो. स्वत:च्या स्वार्थासाठी नाही. जेम्स बाँडवरील चित्रपट कथानकात बरेच बदल सध्या करण्यात येतात. 'कॅसिनो रॉयल'मध्ये अशा आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली आहे. 'कॅसिनो रॉयल'ने ब्रिटनमध्ये १०८ दशलक्ष डॉलर्सचा गल्ला जमवून आजवरच्या विक्रमी उत्पन्नाच्या चित्रपटांत सहावा क्रमांक मिळवला आहे. तोही अवघ्या दोनतीन महिन्यांत. उत्तर अमेरिकेत या चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्याच वीकएंडला ४०.६ दशलक्ष डॉलर्सची कमाई केली... याचा अर्थ जेम्स बाँडची लोकप्रियता अजूनही नेत्रदीपक आहे. त्याच्या पुस्तकांच्या ४ कोटी प्रती आजवर विकल्या गेल्या आहेत. जेम्स बाँडच्या गेल्या अर्धशतकातील या लोकप्रियतेचा

आलेख सतत उंचावतच चाललेला आहे. काहीजणांचा अर्थात त्यामुळे पोटशूळही उठतो. बाँडची नक्कल करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला; तसाच त्याला प्रतिस्पर्धी निर्माण करण्याचाही रशियासारख्या सत्तेला मोह झाला.

मराठी वाचक आजही जेम्स बाँडच्या पुरुषार्थाने, चातुर्याने, मूल्यांवरील व देशांवरील निष्ठेने भारावून जातात; त्याच्या अचाट साहसांनी थरारून जातात यात शंका नाही. त्याच्या व्यक्तिरेखेला केंद्रस्थानी ठेवून सेबॅस्टियन फाल्कस या ब्रिटिश लेखकाला नवीन थरारकथा लिहिण्यासाठी करारबद्ध करण्यात आले आहे हे वाचकांना ठाऊक आहेच. इयान फ्लेमिंगला जन्मशताब्दीनिमित्त श्रद्धांजली वाहण्याचा हा एक अभिनव प्रकार आहेच. चित्रपट, प्रदर्शन, पुस्तकांच्या नवीन आवऊत्त्या, नवे गेम्स, वैज्ञानिक उपकरणे, नवीन स्टाइलचे कपडे– या सर्वांमुळे जेम्स बाँडही नव्या पिढीला मोहिनी घालील यात शंका नाही.

## तसलिमा नसरीन यांच्यावरील हल्ला

मराठी वाचकांना तसलिमा नसरीन ही बंगाली भाषक लेखिका आपलीच वाटते; कारण तिच्या बहुतेक सर्व पुस्तकांचे मराठी अनुवाद प्रसिद्ध झालेले असून त्या पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत.

मुंबई, पुणे, कोल्हापूर येथे त्यांचे दौरे झाले असून बऱ्याच वाचकांशी त्यांनी संवाद साधला आहे.

हैदराबाद येथे तसलिमा नसरीन यांच्यावर पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात एमआयएम या संस्थेच्या कट्टरपंथीय मुस्लिम कार्यकर्त्यांनी हल्ला चढवला; त्यात तीन आमदारांचा उघड उघड सहभाग होता. तसलिमा नसरीन यांना बांगलादेश सरकारने 'लज्जा' या कादंबरीतील तथाकथित इस्लामविरोधी मतांबद्दल आणि बांगलादेशातील हिंदू व्यक्तींवर होणाऱ्या अन्याय्य अत्याचारांवर प्रकाश टाकल्याबद्दल हद्पार केले. तसलिमा नसरीन यांना ठार मारण्याचा फतवा काढून, मारेकऱ्याला लक्षावधी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. त्या वेळेपासून तसलिमा नसरीन यांना निर्वासित म्हणून देशोदेशी भटकावे लागत आहे. युरोपमध्ये त्यांनी काही काळ काढला. त्यानंतर त्या भारतात आल्या. सहा-सहा महिन्यांचा व्हिसा त्यांना मिळत आहे; भारताने त्यांना कायमच्या वास्तव्यासाठी परवानगी द्यावी अशी त्यांची इच्छा आहे. बंगाली भाषा ही आपली मातृभाषा आहे आणि बंगालीतच आपण लेखन करू शकतो अशी त्यांची धारणा आहे. बंगाली भाषा कानावर सतत पडत राहावी, बंगालीतील पुस्तके सतत वाचायला मिळावी, बंगालीत लिहिता यावे आणि ते सातत्याने प्रसिद्ध होत राहावे अशीच ओढ त्यांना आहे.





त्यामुळे कलकत्ता शहरात त्यांना घरच्यासारखे वाटते. इंग्लिशमध्ये लिहिण्याचा प्रयत्न त्यांनी करून पाहिला; 'परंतु खरे अंत:करण उघड करता येते ते मायभाषेतच, बंगालीतच!' अशी त्यांची भावना आहे. म्हणूनच या लेखिकेला भारताने आश्रय द्यावा असे वाटते... हैदराबादमध्ये त्यांच्यावर झालेला हल्ला आणि त्यांच्यावरच हैदराबाद पोलिसांनी भरलेला खटला– ही बातमी चोर सोडून संन्याशाला सुळी अशा प्रकारची आहे. या पोलिसी खाक्यावर टीका झाल्यानंतर हल्लेखोरांवर गुन्हा दाखल झाला आहे; परंतु आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री राजशेखर रेड्डी यांनी या भ्याड हल्ल्याचा कडाडून निषेध करायला हवा होता, तसा न करता तसलिमालाच असंतोष माजवणारे वक्तव्य केल्याबद्दल दोषी ठरवले आणि मुस्लीम आमदारांची भलावण केली याचा खेद वाटतो. या मुस्लिम आमदारांची एकूणच भाषा आणि कृती 'तसलिमा नसरीन यांना जाळून टाका, मारून टाका' अशा स्वरूपाची आहे. विचारस्वातंत्र्याची मुस्कटदाबी करण्याचे असले प्रयत्न होऊ नयेत म्हणून शासकीय यंत्रणेने सिद्ध रहायला हवे. त्याऐवजी त्यांना छुपा पाठिंबा देणे ही बाब लांछनास्पद आणि निंद्य आहे. तसलिमा नसरीनवर असा थेट हल्ला करण्याचे धाडस यापूर्वी कोणी दाखवले नव्हते. तसलिमाने या प्रसंगीही धैर्य दाखवून आपले भाषण पूर्ण केले याचेही कौतुक वाटते. 'लज्जा', 'निर्वाचित कविता', 'आमार मेयेबेला', 'फरासि प्रेमिक', 'नष्ट मेयेर नष्ट गद्य' वगैरे तसलिमाची पुस्तके मराठीतही स्वतंत्र पुस्तकाप्रमाणेच वाचली जात आहेत.

तसलिमा नसरीन यांना भारताने न्याय द्यावा हीच अपेक्षा राहील.



# साहित्यवार्ता

## * प्रादेशिक भाषा नव्हे, तर त्यांमधील साहित्य धोक्यात

‘माध्यमांच्या वाढत्या पसाऱ्यामुळे प्रादेशिक भाषा कधी नव्हे, इतक्या मोठ्या प्रमाणात वापरल्या जाऊ लागल्या आहेत. त्यामुळे ‘बोलली जाणारी भाषा’ बहरते आहे. मात्र, भाषेचे लिखित स्वरूप संकटात आहे. प्रादेशिक भाषा नव्हे, तर त्यांमधील साहित्य धोक्यात आले आहे,’ असे मत ज्येष्ठ नाट्यकर्मी आणि ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक डॉ. गिरीश कर्नाड यांनी व्यक्त केले.

‘महाराष्ट्राबाहेर रंगकर्मी म्हणता येतील असे आहेतच कितीजण?’ असा सवाल करून डॉ. कर्नाड म्हणाले, ‘बंगाली आणि कन्नड रंगभूमी जवळपास संपली आहे. याउलट मराठीत उदयोन्मुख नाटककार दर्जेदार नाटके लिहीत आहेत. धारवाडच्या परिसरात पौराणिक नाटके, हरिकथा, मराठी कीर्तने अशा वातावरणात वाढल्यामुळे माझ्यावर कथाकीर्तनाचे संस्कार झाले. परिणामी, मी सुरुवातीला लिहिलेली नाटके पौराणिक होती. मात्र, ‘बिखरे बिंब’ सारखी माझी अलीकडची नाटके समकालीन प्रश्नांवरील आहेत, असे आढळेल. समकालीन प्रश्नांना न भिडता समकालीन नाटके लिहू पाहणारे बरेचजण आहेत; पण ‘सखाराम बाइंडर’ सारखे एखादेच नाटक खऱ्या अर्थाने समकालीन असते. मोठा नाटककार हा नेहमी समकालीनच असतो. नाटक हा मुळात एक समकालीन अनुभव आहे.’

सध्या मी एक कौटुंबिक नाटक लिहितो आहे. नाटक लिहिण्याआधी मी बरेच संशोधन करतो. मी पात्रांबरोबर जगत असतो. ऐतिहासिक पार्श्वभूमीवर लेखन केले तरी माझी नाटके रूढ अर्थाने ऐतिहासिक नाहीत. ती चाकोरीबाहेरची आहेत. याप्रकारे ऐतिहासिक पार्श्वभूमी वापरून समकालीन प्रश्नांना भिडणे अवघड असते. पात्रे विकसित करणे, हे सुतारकाम असते. ऐतिहासिक नाटकांमध्ये नाटककाराला ‘शॉर्टकट्स’ सापडतात. आधुनिक नाटकांच्या बाबतीत ते संभवत नाही; त्यामुळे ती वेळखाऊ ठरतात. नाटकामुळे समाजात काही बदल घडतो, असे मला वाटत नाही; पण एखाद्या प्रश्नाकडे पाहण्याची अंतर्दृष्टी प्रेक्षकाला नक्कीच मिळते. तंत्रज्ञानाने आपल्या खासगी आयुष्यात प्रवेश केला आहे, हे भीतीदायक वास्तव मी ‘बिखरे बिंब’मधून रेखाटले आहे. लोकप्रिय लिखाण करून कोणी मोठा साहित्यिक होऊ शकत नाही, असे मला वाटते.’



## * डॉ. मोहन आगाशे– वय वर्षे ६०

‘लवचिक अभिनय आणि भावनिक ऊर्जा ही माझी बलस्थाने आहेत. पुरस्कार मिळाले नसले तरी चांगले चित्रपट आणि चांगले दिग्दर्शक मात्र या बलस्थानांमुळेच मला मिळाले,’ असे मत ज्येष्ठ रंगकर्मी आणि अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांनी व्यक्त केले.

डॉ. आगाशे यांच्या षष्ट्यब्दीनिमित्त ‘आशय सांस्कृतिक’तर्फे ज्येष्ठ रंगकर्मी निळू फुले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अभिनेते दिलीप प्रभावळकर, डॉ. विद्याधर वाटवे, ‘आशय’चे सतीश जकातदार, वीरेंद्र चित्राव उपस्थित होते.

आगाशे म्हणाले, “शालेय जीवनात य. शं. गोडबोले सरांमुळे नाटकाची सुरुवात झाली. सरांच्या घरी शिस्तीत तालमी चालत. ‘बालोद्यान’च्या निमित्ताने गोपीनाथ तळवलकर, सई परांजपे, भालबा केळकर यांचा सहवास घडला. स. प. कॉलेजमध्ये ‘पुरुषोत्तम करंडका’ची सुरुवात झाली. मात्र, तेव्हा या स्पर्धेभोवती आतासारखे वलय नव्हते.’

‘बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये डॉ. जब्बार पटेल यांच्यासह काम केले. त्यानंतर आलेल्या ‘घाशीराम’च्या यशाने चित्र खूप बदलले; पण एक शिक्काही बसला. या नाटकाच्या निमित्ताने जगभर प्रवास घडला. त्यातून ‘ग्रिप्स’ची चळवळ उभी राहिली. लहान मुलांकडे एक हुशार प्रेक्षक म्हणून पाहण्याचा आणि त्यांच्यासमोर एक प्रगल्भ नाट्यकलाकृती सादर करण्याचा प्रयत्न सतत केला. अर्थात नाटक ही ‘समूहकला’ असते. त्यामुळे हे मी एकट्याने केले असे नाही.

‘मानसोपचारतज्ज्ञ म्हणून लातूरच्या भूकंपरुग्णांसाठी केलेले काम महत्त्वाचे वाटते. थिएटर ही थेरपी होऊ शकते, हे तेव्हा जाणवले. सर्जनशील कलाकाराचा प्रवास अतिवापर आणि अभाव यांच्या पुसट सीमारेषेवरून चाललेला असतो. माझ्या सुदैवाने मला सत्यजित रे, गौतम घोष, गोविंद निहलानी, श्याम बेनेगल, मणि कौल, डॉ. पटेल अशा श्रेष्ठ दिग्दर्शकांबरोबर काम करता आले,’ याचा उल्लेखही आगाशे यांनी कृतज्ञतापूर्वक केला.

## * वाचनाची आवड लावण्यासाठी ‘अक्षरयात्री’

शालेय विद्यार्थ्यांमध्ये मराठी पुस्तकांच्या वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने अध्यापनक्षेत्रातील मंडळींनी एकत्र येऊन ‘अक्षरयात्री’ मंडळाची स्थापना केली आहे. या उपक्रमाद्वारे दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सायंकाळी साडेपाच ते साडेसहा या वेळेत पत्रकार संघाच्या सभागृहात उत्तम साहित्यातील निवडक भागांचे विद्यार्थ्यांसाठी वाचन केले जाणार आहे.

‘अक्षरयात्री’च्या अध्यक्षा संजीवनी बोकील म्हणाल्या, ‘पुण्यातील बावीस शिक्षकांनी एकत्र येऊन या मंडळाची स्थापना केली आहे. विविध शाळांच्या

इयत्ता ९ वीच्या १८० विद्यार्थ्यांचा 'अक्षरमैत्र' नावाचा संघ स्थापन करण्यात आला आहे. मराठी पुस्तकांच्या वाचनाची आवड विद्यार्थ्यांमध्ये जोपासण्याच्या हेतूने वाचनाच्या कार्यक्रमात विविध कलावंत सहभागी होणार आहेत.'

या उपक्रमाचा आरंभ ११ ऑगस्ट रोजी झाला, त्यात रणजित देसाई यांच्या 'श्रीमानयोगी' व पद्माकर गोवईकर यांच्या 'मुंगी उडाली आकाशी' या पुस्तकातील काही भाग; तसेच सफदर हाश्मी यांच्या 'किताबे कुछ कहती है' या कवितेचा दासू वैद्य यांनी केलेला अनुवाद श्रीकांत मोघे, राहुल सोलापूरकर, हेमा लेले यांनी सादर केला.

## * नरहर कुरुंदकरांवरील वेबसाइट

ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत नरहर कुरुंदकर यांच्यावरील वेबसाइट तयार करण्यात येत आहे.

कुरुंदकरांच्या ७५ व्या जयंतीनिमित्त श्रद्धांजली वाहताना हा संकल्प सोडण्यात आला. कुरुंदकरांच्या साहित्यातील विपुलता आणि त्यांच्या आठवणी एकत्र करणारी 'इंटरॲक्टिव्ह' वेबसाइट असेल.

चौफेर लिखाण आणि वक्तव्य करणाऱ्या कुरुंदकरांनी राजकीय प्रश्नांवर 'जागर' आणि 'आकलन' ही पुस्तके लिहिली, तर साहित्य-समीक्षेवरील 'रूपवेध', 'धार आणि काठ', 'रंगशाळा', 'पायवाट', 'मागोवा' आणि 'यात्रा' ही पुस्तके विशेष गाजली.

## * सावनी शेंडे यांचे बंदिशींचे पुस्तक

प्रसिद्ध गायिका सावनी शेंडे-साठ्ये यांनी स्वत: रचलेल्या बंदिशींचे पुस्तक रसिक-वाचकांच्या भेटीस येणार आहे.

वेगवेगळ्या रागांत आणि तालांमध्ये बांधलेल्या या बंदिशी दोन भागांत प्रसिद्ध होतील. त्यांच्या आजी आणि ज्येष्ठ गायिका कुसुम शेंडे यांनी रचलेल्या ४० बंदिशींचाही समावेश त्यात असेल. दोन्ही भागांत मिळून सुमारे ७५ ते ८० बंदिशी असतील.

याविषयी त्या म्हणाल्या, '१९९८ मध्ये अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना पोर्टलँड येथे मी पहिली बंदिश रचली. 'पिया तू जाने ना मो मनको' अशी ती बंदिश होती. राग यमनमध्ये द्रुत एकतालात बांधलेल्या या बंदिशीपासून माझा लेखनप्रवास सुरू झाला. अभिजात शास्त्रीय संगीतातील बहुतांश बंदिशी ब्रजभाषेतील असल्यामुळे सामान्यांना त्यांचा अर्थ कळत नाही. म्हणूनच सोप्या अर्थाचे शब्द असलेल्या बंदिशी रसिकांसमोर आणण्याचा मनोदय आहे. बंदिशींची पारंपरिक धाटणी कायम ठेवून शब्द आणि वर्णनामध्ये नावीन्य आणण्याचा प्रयत्न केला आहे. यातील राग वेगळ्या वाटेने जाणारे नाहीत, हे स्पष्ट करू इच्छिते. अभिजात



शास्त्रीय संगीताकडे तरुणांना आकृष्ट करायचे असेल, तर शब्दांना अधिक महत्त्व देणाऱ्या आणि अर्थपूर्ण बंदिशी हव्यात, या विचारातून हे पुस्तक आकारास येत आहे'.

आजी कुसुमताई शेंडे यांच्याकडे किराणा घराण्याचे, तर डॉ. वीणा सहस्रबुद्धे यांच्याकडे ग्वाल्हेर घराण्याचे शिक्षण घेतलेल्या सावनी शेंडे-साठ्ये यांनी देश-विदेशांत अनेक मैफली गाजवल्या आहेत.

राग बागेश्रीतील 'सजाओ दीप सब मिल शुभ घडी मंगल दिन', रागेश्री रागातील 'मोरे नैनवा तरस गये री उनहीके दरसन को', केदार रागातील 'शीतल मंद पवन बहे कुसुम अत्तर मन भाए' आदी बंदिशी प्रस्तुत पुस्तकात असणार आहेत. कुसुमताईंनी वयाच्या सत्तरीत रचलेली 'चतुर बलमा ना जाने दुखवा मोरा' ही बंदिश धानी या अप्रचलित रागात बांधलेली आहे. धानीप्रमाणेच त्रिवेणी, हिंडोलबहार आदी अप्रचलित रागांतील बंदिशीही पुस्तकामध्ये आहेत.

काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध गायिका डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे यांनी रचलेल्या बंदिशींचे पुस्तक प्रसिद्ध झाले होते. त्याहीपूर्वी रामाश्रय झा, विनयचंद्र मौद्‍गल्य, डॉ. प्रभा अत्रे यांनी लिहिलेली बंदिशींची पुस्तके रसिकप्रिय ठरली होती.

## * डॉ. द. भि. कुलकर्णी– ७४ वा वाढदिवस

'अध्यापनाचा आनंद हा अभ्यंगस्नानासारखा असतो आणि त्याचा विद्यार्थ्यांबरोबर आस्वाद घेणे म्हणजे तो जलविहाराचा आनंद ठरतो. हा वाङ्मयीन आनंद उपभोगण्यासाठी मला कायम अध्यापकाचेच आयुष्य मिळावे,' असे मनोगत प्रख्यात समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी आपल्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त व्यक्त केले.

ते म्हणाले, 'केजी' ते 'पीजी' हे अध्यापनाचे वेगवेगळे टप्पे मी पार पाडले आहेत; पण पूर्ण समाधानी नाही. अजून शिकवावे... शिकवीत राहावे, असेच सारखे वाटते. माझा पुनर्जन्मावर विश्वास आहे. त्यामुळे मला पुढचे आयुष्य एका अध्यापकाचेच मिळावे, अशी मागणी मी परमेश्वराकडे नेहमी करतो.'

'ज्ञानेश्वर महाराजांचा प्रभाव माझ्या आयुष्यावर पडला, तेव्हा मला जीवनाचे खरे तत्त्वज्ञान समजले आणि तेच माझे जीवनगुरू आहेत. 'ग. त्र्यं. देशपांडे आणि 'बा. सी. मर्ढेकर' हे माझे वाङ्मयीन गुरू आहेत. एक माणूस म्हणून किंवा समीक्षक म्हणून त्यांचा प्रभाव माझ्या जीवनावर पडला'.

समीक्षकामध्ये हळुवारपणा आणि निर्भीडता हे दोन विरोधी गुण असावे लागतात. 'वज्राप्रमाणे कठोर, फुलाप्रमाणे मृदू' होण्याच्या भूमिकेबरोबरच पक्ष, पंथ, गट अशा गोष्टींच्या आहारी न जाता प्रत्येक कलाकृतीला समीक्षकाने योग्य न्याय देणे आवश्यक आहे. सध्या चांगल्या समीक्षकांचीही तेवढीच आवश्यकता आहे. कारण प्रतिभाहीन लेखकांकडून बरेचसे लिहिले जात आहे, असे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

## * अ.भा. मराठी नाट्यसंमेलन सोलापुरात

सोलापुरात तब्बल पन्नास वर्षांनंतर आगामी ८८ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन भरणार आहे.

अ.भा. मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाची बैठक मुंबईत होऊन त्यात ८८ वे मराठी नाट्य संमेलन सोलापुरात भरविण्याचा निर्णय घेण्यात आला. नाट्य परिषदेच्या सोलापूर शाखेच्या रौप्यमहोत्सवी वर्षात पन्नास वर्षांनंतर प्रथमच सोलापूरला नाट्य संमेलन आयोजित करणे म्हणजे ग्रामदैवत सिद्धरामेश्वराने दिलेला आशीर्वाद होय, अशी समाधानाची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

## * 'चैतन्यगाथा'चे प्रकाशन

बडोदेकर कवी मधुकर सुळे यांनी लिहिलेल्या देवदत्त उर्फ काकामहाराज यांच्यावर लिहिलेल्या 'चैतन्यगाथा' या ओवीबद्ध पोथीचा प्रकाशनसमारंभ विलेपार्ले (पूर्व) येथील लोकमान्य सेवा संघात २९ जुलै रोजी झाला.

## * डॉ. ढेरे– वाढदिवस

विशिष्ट दैवताच्या संशोधनापुरता डॉ. रा. चिं. ढेरे यांचा साहित्यनिर्मितीचा उद्देश मर्यादित नाही. समग्र समाजाच्या स्थिती-गतीचा शोध त्यांनी आपल्या लेखनातून घेतला आहे, असे मत ज्येष्ठ संशोधक डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केले.

त्यांच्या ७७ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित ग्रंथप्रदर्शन कार्यक्रमात 'डॉ. ढेरे यांचे साहित्यविश्व' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले.

'ज्ञानविषयाने झपाटलेले झाड' असा ढेरे यांचा गौरव करून डॉ. भवाळकर म्हणाल्या, ''अनेक संस्थांना अनेक वर्षे संशोधन करूनही जे काम जमणार नाही, ते काम ढेरे यांनी एकट्याने पूर्ण केले आहे. लोकसंस्कृती हा मानवी अस्तित्वाचा भाग आहे. लोकसमूहाचे जगणे, त्याची दैवते, उपासनापद्धती यातूनच संस्कृती घडत असते, हे त्यांनी सिद्ध केले आहे. ग्रंथ, प्रवास, टिपणे, लोकपरंपरेतील मौखिक साहित्य यासह मानववंशशास्त्र, इतिहास, भूगोल... अशा समग्र अभ्यासातून ढेरे यांची प्रतिभाप्रज्ञा आकलनाचा नवा पैस निर्माण करत जाते. 'मिथकां'भोवतीचे वास्तव ते मोकळे करून दाखवतात.'

प्रा. रा. ग. जाधव म्हणाले, 'स्वत:च्या संशोधनातून डॉ. ढेरे यांनी नव्या युगातील संशोधनाचे नवे निकष निर्माण केले आहेत. कविमनाच्या ढेरे यांनी समग्र मराठी संशोधन व्यवहाराचा कलात्मक, साहित्यिक, बौद्धिक कळस गाठला आहे. संशोधन, संशोधक आणि समाज यांतील भिंती त्यांनी उघडल्या आहेत.'

## * 'तुळजाभवानी'चे प्रकाशन

'कोणताही संस्थात्मक पाठिंबा नसतानाही स्वत: झीज सोसून डॉ. रा. चिं. ढेरे यांनी जे काम उभे केले आहे, त्याबद्दल आदर वाटतो,'' अशी भावना अमेरिकन नागरिक व मराठी संस्कृतीच्या अभ्यासक ॲन फेल्डहाऊस यांनी पुणे येथे व्यक्त केली. डॉ. ढेरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या 'श्री तुळजाभवानी ग्रंथ'चे प्रकाशन २१ जुलै रोजी झाले.

त्या म्हणाल्या, 'डॉ. ढेरे यांनी अत्यंत उच्च प्रतीचे संशोधन केले आहे. जो विषय वस्तुनिष्ठपणे आणि नि:पक्षपातीपणे शिकला जात नाही किंवा फक्त क्वचितच शिकला जातो त्या विषयांचा उत्तम अभ्यास डॉ. ढेरे करतात.'

## * बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. विजया वाड

विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षा डॉ. विजया वाड यांची २१ व्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. डॉ. वाड यांनी बालवाचकांसाठी ९ कादंबऱ्या, १२ कथासंग्रह, चार चरित्रे लिहिली आहेत. त्यांची १० बालनाट्ये रंगभूमीवर आली आहेत. त्यांना आजवर २५ पुरस्कार मिळाले आहेत. लहान मुलांसाठी त्यांनी आठ कॅसेट्सची निर्मिती केली आहे.

एकविसावे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन डिसेंबरमध्ये सांगलीत होणार आहे.

सांगलीचे माजी महापौर आणि लट्ठे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुरेश पाटील संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. संमेलनाच्या उद्घाटनास उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील उपस्थित राहणार आहेत.

## * कोलटकरांच्या अप्रकाशित कविता

अरुण कोलटकरांनी तुकोबांच्या निवडक अभंगांचा इंग्रजी अनुवाद साठच्या दशकात केला होता. नामदेव आणि जनाबाई या संतकवींच्या काही रचनाही त्यांनी इंग्रजीत आणल्या. या अप्रकाशित कविता 'बोट राईड ॲण्ड अदर पोएम्स' या नावाने प्रास प्रकाशनतर्फे निघणार आहेत. 'बोट राईड' या दीर्घकवितेसह कोलटकरांच्या ७० अप्रकाशित इंग्रजी कविता आणि अनुवाद समाविष्ट केले आहेत.

अमेरिकेतील कॉमनवेल्थ पुरस्कार मिळालेल्या कोलटकरांच्या 'जेजुरी' या दीर्घकाव्यावर अतुल दोडिया या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या चित्रकाराने चीनमध्ये पेंटिंग्ज काढली आहेत.

## * 'व्याकरण महाभाष्य' ग्रंथाचे प्रकाशन

संस्कृत विद्या परिसंस्था आणि संस्कृत पाठशाला यांच्या विद्यमाने पतञ्जली विरचित 'व्याकरण महाभाष्य' या सात खंडात्मक महाग्रंथाचे प्रकाशन पं. शिवरामशास्त्री जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी वैदिक संशोधन मंडळ आणि विद्यमान अध्यक्ष डॉ. चिं. ना. धर्माधिकारी, श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज

संस्थान अध्यक्ष प्राचार्य व. कृ. नूलकर, वि. ना. दीक्षित आदी उपस्थित होते.

पं. शास्त्री म्हणाले, ज्ञानाचा भांडार असलेले हे महाभाष्य अतिशय वाचनीय आहे. ज्ञानशास्त्र आणि प्रमाणशास्त्र यांचा अभ्यास अभ्यंकर यांनी करून महाग्रंथाची रचना केली आहे संस्कृत भाषेचा अभ्यास आणि संस्कृत परिसंस्थेच्या उपक्रमामुळे संस्कृत भाषेला चालना मिळेल. प्राचार्य व. कृ. नूलकर म्हणाले, हा ग्रंथ म्हणजे पुण्याचे भूषण होय. अपार आनंद देणारे तत्त्वज्ञान यामध्ये आहे. पं. वसंत गाडगीळ म्हणाले, व्याकरण महाभाष्याचे प्रकाशन ही संस्कृत भाषेसाठी अभिमानाची गोष्ट आहे. असे काम महाराष्ट्रात केवळ पुण्यातच होऊ शकते. कारण ज्ञानाची जाण याच ठिकाणी आहे.

### * 'मैत्र' वाढविण्यासाठी इंटरनेट!

मित्रांबरोबर तासन्‌तास कट्ट्यांवर गप्पा मारणे, 'कटिंग' चहाबरोबर खरपूस गप्पांचा आस्वाद घेणे, हे सगळीकडच्याच तरुणाईचे आवडते काम असले, तरी सध्या जगभरातल्या तरुणाईला आकर्षित करताहेत ते संगणक कट्टे! 'ऑर्कुट'पासून 'माय स्पेस'पर्यंत आणि 'टॅग वर्ल्ड'पासून 'माय बर्थ डे'पर्यंत कितीतरी सोशल नेटवर्किंग वेबसाइट्स जगभरातल्या तरुणाईमध्ये मैत्रबंध निर्माण करण्याचे काम करीत आहेत.

पाच ऑगस्ट या जागतिक मैत्रीदिनाच्या निमित्ताने मैत्रीचा उत्सव साजरा झाला. इंटरनेटवर त्याचा जल्लोष विशेषच जाणवला. कॉलेजमधील 'बेंचमेट'पासून आतापर्यंत कधीही न भेटलेल्या मित्रमंडळींपर्यंत 'नेटवर्क' वाढवण्यासाठी या वेबसाइट्स मदत करतात. एकमेकांना निरोप देणे, मित्र-मैत्रिणीबाबतच्या भावना व्यक्त करणे, वेगवेगळ्या विषयावर मते व्यक्त करणे, एकमेकांना ध्वनिफिती आणि चित्रफिती पाठवणे, गप्पा मारणे, छायाचित्रे शेअर करणे अशा कितीतरी माध्यमांतून या वेबसाइट्स मैत्रीचे बंध निर्माण करत आहेत.

'ऑर्कुट' या वेबसाइटने हा 'नेटवर्किंग'चा मार्ग भारतातील तरुणांना दाखवला. मात्र, आता 'नेटवर्किंग'ची व्याप्ती फक्त 'ऑर्कुट'पुरती मर्यादित नाही. 'मायस्पेस', 'फ्रेंडस्टर', 'टॅगवर्ल्ड', 'क्लासमेट्स डॉट कॉम', 'हाय फाइव्ह', फेसबुक', 'याहू थ्री सिक्स्टी' अशा शेकडो वेबसाइट्स सध्या ही सेवा पुरवत आहेत. एका वेबसाइटमुळे मिळालेल्या मित्राला दुसऱ्या वेबसाइटच्या 'नेटवर्क'मध्ये घेतले जाते. मग नेहमी भेटणाऱ्या मित्राच्या मित्रांना आपले मित्र बनवणे, वेबसाइटवरील 'प्रोफाइल' वाचून अपरिचित व्यक्तींनाही मैत्रीसाठी आमंत्रित करणे अशी ही मैत्रीची गुंतागुंत वाढत जाते. 'ब्लॉग्ज' वाचून एकमेकांशी संपर्क केला जातो. वेगवेगळ्या विषयाच्या 'कम्युनिटी' तयार केल्या जातात. अशा 'कम्युनिटी'च्या माध्यमातूनही मैत्रीजाल वाढत जाते.

'सोशल नेटवर्किंग'च्या सुरुवातीच्या टप्प्यातल्या वेबसाइट्स या परदेशी नागरिकांनी तयार केलेल्या होत्या. आता त्यात अनेक देशी वेबसाइट्सही उतरायला लागल्या आहेत.



### * 'बालभारती' संशोधन प्रकल्प

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) वतीने प्राथमिक शालेय अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके याविषयीचे संशोधन प्रकल्प वैयक्तिक आणि संस्थात्मक पातळीवर देण्यात येणार आहेत. प्राथमिक, माध्यमिक शिक्षक तसेच महाविद्यालयीन व शिक्षण-प्रशिक्षण संस्थांमधील अध्यापक आणि प्राध्यापकांना हे प्रकल्प घेता येतील अशी माहिती 'बालभारती'चे संचालक डॉ. वसंत काळपांडे यांनी दिली.

प्राथमिक शालेय अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तक याविषयीचे हे प्रकल्प असून, वैयक्तिक स्तरावरील प्रकल्पांसाठी मंडळाच्या वतीने पाच हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. काही प्रकल्प हे संस्थास्तरावर दिले जाणार असून, त्यासाठी दहा हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. वैयक्तिक पातळीवर प्रकल्पाचा कालावधी एक वर्ष तर संस्थास्तरावरील प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी दोन वर्षांचा राहील.

यासंबंधी अधिक माहिती संशोधन अधिकारी, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे यांच्याकडे मिळेल. प्रकल्पासाठी अर्ज मागविण्याची मुदत- सप्टेंबर २००७. अर्ज भरून पाठवण्याची मुदत- ३१ ऑक्टोबर २००७ आहे.

### * 'ग्राफिटी'चा प्रवास

'ग्राफिटी' सुचते कशी यापासून ते तिच्या निर्मितीमागील विविध आठवणींचा प्रवास उलगडून दाखवणारा कार्यक्रम 'साधना मीडिया सेंटर'च्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी 'ग्राफिटी'चे लेखक अभिजीत पेंढारकर आणि 'कॅलिग्राफर' प्रभाकर भोसले यांच्याशी सिद्धार्थ केळकर यांनी संवाद साधला. 'सकाळ'चे सुरेशचंद्र पाध्ये याप्रसंगी उपस्थित होते.

ग्राफिटीच्या निर्मितीची प्रक्रिया सांगताना त्यादरम्यान घडणारे अनेक रंगतदार किस्सेही पेंढारकर आणि भोसले यांनी कथन केले.

'रोजच्या जीवनात अनेक 'ग्राफिटी' घडत असल्याने त्याचा साठा कधी संपणार नाही,' असा विश्वासही पेंढारकर यांनी व्यक्त केला.

पाध्ये म्हणाले, 'दैनिकाच्या रोजच्या अंकातल्या एका छोट्या कोपऱ्यात 'ग्राफिटी' येत असली, तरी तिच्यामागे प्रचंड मेहनत आणि परिश्रम आहेत. एका वाक्यातून आणि प्रसंगी मोजक्या शब्दांतून व्यक्त होणारा आशय परिपूर्ण असतो.'

### * डी. डी. कोसंबी जन्मशताब्दी

'प्रा. दामोदर कोसंबी यांनी इतिहासाला सन-सनावळ्यांमधून बाहेर काढून कृषी आणि नाणकशास्त्रांसारख्या विषयांपर्यंत नेले. प्राचीन भारतीय इतिहासाच्या तर्कशुद्ध पुनर्मांडणीचे काम प्रा. कोसंबी यांनी केले,' असे मत ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ

प्रा. रोमिला थापर यांनी व्यक्त केले.

दिवंगत गणिततज्ज्ञ, इतिहासाचे अभ्यासक प्रा. दामोदर कोसंबी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रा. थापर यांचे 'भारताच्या प्राचीन इतिहासाचे संशोधन निरूपण- प्रा. दामोदर कासेंबींचा वारसा' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव होते. व्यासपीठावर जन्मशताब्दी समितीच्या अध्यक्षा मीरा कोसंबी, प्रा. राजा दीक्षित, रा. प. नेने उपस्थित होते. 'उत्पादनाच्या आशियाई पद्धतीबद्दलचा कार्ल मार्क्सचा सिद्धांत प्रा. कोसंबींना अमान्य होता,' असे नमूद करून प्रा. थापर म्हणाल्या, 'त्यांच्याकडे मार्क्सवादी दृष्टिकोनाचा साक्षेपी वेध घेण्याची क्षमता होती. प्राचीन भारतीय इतिहासाच्या सरंजामशाही रचनेत कसा बदल होत गेला, हे स्पष्ट करण्यासाठी प्रा. कोसंबींनी नाणकशास्त्राचा वापर केला. राजा-रजवाड्यांपुरते मर्यादित न राहता थेट शेतकऱ्याच्या नांगराशी त्यांनी इतिहासाचा संबंध जोडला, तर तंत्रज्ञानाच्या आधारे निर्माण झालेल्या शस्त्रांचा संबंध प्रा. कोसंबींनी सामाजिक बदलांशी जोडला. गुलामगिरीचे ग्रीक 'मॉडेल' भारतीय संदर्भात गैरलागू आहे, असे कोसंबी यांचे म्हणणे होते आणि या मुद्द्यावर ते मार्क्सवादी सिद्धांताशी सहमत नव्हते.'

प्रा. थापर म्हणाल्या, 'जात आणि जमात यांतील देवाणघेवाण, बौद्ध धर्म आणि व्यापार तसेच भारतातील सरंजामशाही या तीन विषयांवर कोसंबी यांनी मूलगामी सिद्धांत मांडले. कोसंबी यांनी जातीकडे स्थायी स्वरूपाची गोष्ट म्हणून पाहिले नाही.'

पुणे विद्यापीठात सुरू होत असलेल्या 'प्रा. कोसंबी अध्यासना'स एक कोटी रुपयांचा निधी केंद्राकडून मिळाल्याची माहिती डॉ. जाधव यांनी दिली. जन्मशताब्दी वर्षात प्रा. कोसंबी यांच्यावर मराठी गौरवग्रंथ तयार केला जाईल, असेही ते म्हणाले. 'प्रा. रोमिला थापर लवकरच पुणे विद्यापीठामध्ये नवी जबाबदारी सांभाळतील,' असे सूतोवाचही कुलगुरूंनी केले.

### * अर्थच्छटाकोशाचे प्रकाशन

'भाषेचा विकास हे आव्हानात्मक काम आहे. सर्व प्रकारची आव्हाने पेलण्यास तयार असलेली सध्याची पिढी भाषाविकासाचे आव्हान पेलण्यास का तयार नाही? 'सातच्या आत घरात' येऊ पाहणारा मराठी माणूस भाषेचा काय विकास करणार?' असाही प्रश्न प्रा. रा. ग. जाधव जाधव यांनी कै. मो. वि. भाटवडेकर यांनी लिहिलेल्या 'अर्थच्छटा कोशा'चे प्रकाशन करताना विचारला. अध्यक्षस्थानी भालचंद्र कुलकर्णी होते. व्यासपीठावर लेखकाच्या कन्या डॉ. रंजिता कुलकर्णी, 'स्नेहवर्धन प्रकाशन'च्या डॉ. स्नेहल तावरे होत्या.

'मराठी समाजाकडे भाषिक संवेदनशीलता नाही,' अशी खंत व्यक्त करून प्रा. जाधव म्हणाले, 'भाषेला संवादाचे माध्यम म्हणायचे, तर तिला संपर्कभाषा



म्हणून विकसित करण्याचेही काम करावे लागेल. भाषा ही कुठल्या विशिष्ट समाजाची मालमत्ता नसते. तो अवघ्या मानवजातीचा सामाईक ठेवा असतो. आपल्याकडे विविध समाजघटक आपापल्या सांस्कृतिक जबाबदाऱ्या एकमेकांवर ढकलतात, हे वाईट आहे.'

'जगातील कोणतेही दोन शब्द समानार्थी नसतात. याची सामान्य वाचकाला जाणीव करून देणारा अर्थच्छटा कोश हा ग्रंथ आहे,' असे नमूद करून प्रा. जाधव म्हणाले, 'भाटवडेकरांची अख्खी पिढी विविध ज्ञानशाखांचे एकाच वेळी अध्ययन करीत होती. या पिढीचे सांस्कृतिक भान मोठे होते. आजचे अभ्यासक फक्त आपापल्या विषयापुरते तज्ज्ञ असतात. नव्या युगात अभ्यासकांना याप्रकारे हस्तिदंती मनोऱ्यात बसून चालणार नाही. आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन ही आपली जीवनशैली असली पाहिजे.'

### * प्रा. हातकणंगलेकर यांच्यासाठी सांगलीकरांचा आग्रह

तब्बल ६४ वर्षांनंतर सांगलीला साहित्य संमेलनाच्या आयोजनाचा मान मिळाल्यानंतर आता संमेलनाध्यक्षपदाचा सन्मानही सांगलीच्याच ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर यांना मिळावा, अशी इच्छा व्यक्त होऊ लागली आहे.

यापूर्वी म्हणजे साधारणपणे चार वर्षांपूर्वी प्रा. हातकणंगलेकर यांनी अध्यक्षपदाची निवडणूक लढविली होती. पण त्यावेळी राजेंद्र बनहट्टी निवडून आले. यावेळी साहित्य संमेलन सांगलीत होत आहे. त्यामुळे जर त्यांना अध्यक्षपदाचा हा बहुमान मिळाला तर, साहित्य संमेलनाच्या इतिहासातील तो एक दुर्मिळ योग ठरेल. सांगलीकरांचाही मान त्यामुळे राखला जाणार आहे. विशेष म्हणजे प्रा. हातकणंगलेकर यांची विपुल साहित्यसंपदा पाहिल्यास सांगलीकरांच्या इच्छेला मजबूत आधारही मिळत आहे. 'साहित्यातील अधोरेखिते, वाङ्मयीन शैली व तंत्र, लघुकथा : रूप आणि परिसर, साहित्य विवेक, साहित्य सोबती, उघडझाप, मराठी साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा (संपादन), डोहकाळिमा (संपादन), श्री. दा. पानवलकरांच्या कथा (संपादन) याशिवाय डॉ. वि. रा. करंदीकर यांच्या मराठी ग्रंथांचा इंग्रजी अनुवाद, जी. ए. कुलकर्णी यांचा कथासंग्रह व पत्रव्यवहार खंडाचे संपादन त्यांनी केले आहे. उगवाई हे नियतकालिक त्यांनी चालविले होते. सत्यकथा, समाप्रबोधन पत्रिका, नवभारत, वसंत, वीणा, महाद्वारमधून लेखनही केले. प्रा. हातकणंगलेकर यांनी साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ, कराड साहित्य पुरस्कार, साहित्य अकादमी, ज्ञानपीठ, मराठी समिती यांसारख्या मानाच्या सदस्य म्हणून काम केले आहे. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.

### * 'टाइम'चा भारत विशेषांक

आर्थिक महासत्ता म्हणून जगाच्या क्षितिजावर भारताचा उदय होत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा हत्ती दमदार पावले टाकीत असून, लक्षावधींच्या आयुष्यात नवा प्रकाश येत आहे, अशा शब्दांत टाइम नियतकालिकाने भारतीय अर्थव्यवस्थेचा गौरव केला आहे.

भारतीय स्वातंत्र्य आता 'साठी'त आले आहे. या कालखंडात भारताने केलेल्या नेत्रदीपक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी 'टाइम'ने १३ ऑगस्टला विशेषांक प्रसिद्ध केला आहे. 'अ यंग जायंट अवेकस!' मध्ये भारताचा मध्यमवर्ग, धर्म, राजकारण, अर्थव्यवस्थेचे परिवर्तन; तसेच संघर्षबिंदू, नवे कल, कलाटणी देणाऱ्या घटना असा विशाल पट मांडण्यात आला आहे.

'टाइम'ने म्हटले आहे की वीस वर्षांपूर्वी उर्वरित जग भारताकडे 'कंगालां'चा देश म्हणून पाहत होते. हाच देश आज सॉफ्टवेअर इंजिनिअर, बॉलिवूड स्टार, जागतिक कीर्तीचे लेखक आणि 'पोलादी' उद्योगपती यामुळे ख्याती पावला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रभाव आता आंतरराष्ट्रीय स्तरावर दिसू लागला आहे. वसाहतवादी शक्तींचे आगमन होण्यापूर्वी असलेले 'जागतिक व्यापार महासत्ता' हे स्थान भारत पुन्हा प्राप्त करीत आहे.

### * 'माझा प्रवास' नवीन आवृत्ती

'देशाच्या पहिल्या स्वातंत्र्यलढ्याचे गोडसे भटजींनी प्रत्यक्ष अनुभवांवर केलेले लिखाण ऐतिहासिक पुरावा म्हणून महत्त्वाचे आहे,' असे प्रतिपादन निनाद बेडेकर यांनी केले.

'व्हीनस प्रकाशना'च्या वतीने गोडसे भटजीलिखित 'माझा प्रवास' या पुस्तकाच्या आठव्या आवृत्तीचे प्रकाशन त्यांच्या हस्ते ३१ जुलै रोजी झाले.

'माझा प्रवास' हे पुस्तक म्हणजे मराठीतील पहिले प्रवासवर्णन असल्याचे गौरवोद्गार काढून बेडेकर म्हणाले, 'झाशीच्या किल्ल्याचे नाव 'शंकरगड' असल्याची माहिती या पुस्तकातूनच सर्वप्रथम मिळाली. १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील इंग्रजांचा, मुस्लिमांचा आणि सामान्य माणसाचाही दृष्टिकोन लक्षात घेण्याची आवश्यकता असून, त्या अनुषंगाने काही नवीन माहिती उपलब्ध होते का, याचाही शोध घ्यायला हवा.'

'केवळ इतिहासातील प्रसंग आणि घटना यांच्यापुरते मर्यादित न राहता मनुष्य स्वभावाचे, सामाजिक स्थितीचे आणि जगण्याच्या पद्धतीचे चित्रणही या पुस्तकातून झाले आहे. 'माझा प्रवास' हे पुस्तक अनेक पिढ्या घडविणारे आहे,' असे मत सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले.

### * विज्ञानाची माहिती रंजक पद्धतीने देण्याची गरज

'ज्ञानगंगा'च्या ज्ञानोत्सव या पुस्तकांच्या प्रदर्शनाचे डॉ. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते २ ऑगस्ट रोजी उद्घाटन झाले. या प्रसंगी सुधीर गाडगीळ यांनी मुलाखत घेतली. तसेच डॉ. गोडबोले यांच्या 'किमयागार' या पुस्तकाच्या दुसऱ्या,



तर 'नादवेध'च्या चौथ्या आवृत्तीचे यावेळी प्रकाशन करण्यात आले. व्यासपीठावर मृण्मयी अलूरकर, डॉ. सदानंद बोरसे, 'ज्ञानगंगा'चे उमेश पाटील उपस्थित होते.

डॉ. गोडबोले म्हणाले, 'मराठीतील बहुतांश विज्ञान साहित्य दोन प्रकारचे असते. एक चरित्रात्मक, तर दुसरे सैद्धान्तिक. त्यामुळे विज्ञानाकडे मराठी वाचक शक्यतो वळत नाहीत. इंग्रजीमध्ये असणाऱ्या 'पॉप्युलर सायन्स' या प्रकारामुळे विज्ञानातील गमतीजमती, नवीन शोध, शास्त्रज्ञांची चरित्रे लोक आवडीने वाचतात. याचा परिणाम म्हणून लहान मुले, विद्यार्थी विज्ञानाकडे आकर्षित होतात. भारताला नोबेल पारितोषिक का मिळत नाही, हा प्रश्न मला सतत पडायचा. विज्ञानाविषयी अनास्था हेच त्यामागचे कारण आहे. विज्ञान मनोरंजक पद्धतीने वाचायला दिले, तर ही परिस्थिती बदलेल, असे मला वाटते. 'किमयागार' हा त्यातलाच प्रयत्न आहे.'

### * युवा शास्त्रज्ञ अतीश दाभोलकर यांना फ्रान्सची संशोधन वृत्ती

प्रख्यात कृषिशास्त्रज्ञ डॉ. श्री. अ. दाभोलकर यांचे सुपुत्र डॉ. अतीश दाभोलकर 'शांतिस्वरूप भटनागर' राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी आहेत. त्यांच्या भौतिकशास्त्रातील मूलभूत संशोधनाची दखल घेऊन फ्रान्स सरकारने 'एएनआर' संस्थेत अध्यापनाचे पद (चेअर ऑफ एक्सलन्स) बहाल केले आहे. त्यांना चार वर्षांसाठी संशोधन व प्रवासासाठी पाच लाख अमेरिकन डॉलर मंजूर केले आहेत. त्याशिवाय पॅरिसमध्ये 'सीएनआरएस' या संस्थेच्या संशोधन विभागाच्या संचालकपदी एक वर्षासाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सप्टेंबरपासून ते आपल्या नवीन संशोधनकार्यासाठी फ्रान्सला जात आहेत.

गारगोटी येथे बालपण गेलेल्या अतीश यांनी १९७८ मध्ये एस.एस.सी. बोर्डात तिसरा क्रमांक पटकावला. १९८५ साली आय.आय.टी. कानपूरमधून त्यांनी एम.एस्सी. केले. त्यानंतर विन्स्टन विद्यापीठात पीएच.डी. केली.

१९९० ते १९९६ या कालावधीत डॉ. अतीश दाभोलकर यांनी रुटगर्स, हॉवर्ड व कॅलटेक अशा मान्यवर संस्थांमध्ये संशोधन केले. त्यांचा शोधनिबंध 'स्ट्रिंग थिअरी'च्या विश्वात महत्त्वाचा गणला गेला आहे. त्यांनी कॅलटेकमध्ये सीनिअर रिसर्च फेलो म्हणून काम करीत असताना तेथील अधिक पैसा कमावण्याची संधी नाकारून भारतात येणे पसंत केले.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च (टीआयएफआर) मध्ये प्रोफेसर म्हणून ते काम करीत होते.

### * इंग्लंडमध्ये धर्म आणि विज्ञानावर आंतरराष्ट्रीय परिषद

विज्ञान आणि धर्म या विषयांचा विविध अंगांनी वेध घेणारी आंतरराष्ट्रीय परिषद लॅन्केस्टर युनिव्हर्सिटीमध्ये नुकतीच संपन्न झाली. प्रा. जॉन हॅडली ब्रूक यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेत इंग्लंडसह अमेरिका,

दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इराण, रशिया आदी देशांतील १५४ प्रतिनिधी हजर होते. विज्ञान आणि धर्म या विषयांबाबतचा ऐतिहासिक दृष्टिकोन आणि वर्तमानकालीन दृष्टिकोन यावर तसेच शास्त्रीय क्रांतीचे नव्याने झालेले आकलन, नॅचरल थिऑलॉजी, धर्म आणि सामाजिक शास्त्रे यामधील परस्पर संबंध थिऑलॉजी आणि न्यूरोसायन्स अशा विविध विषयांवर चर्चासत्रे झाली.

ज्या ब्रूक यांच्या सन्मानार्थ ही आंतरराष्ट्रीय परिषद झाली, ते लॅन्केस्टर विद्यापीठात विज्ञानाचा इतिहास हा विषय शिकवत असत. 'सायन्स अँड रिलीजन : सम हिस्टॉरिकल परस्पेक्टिव्हज्' या विषयावर त्यांनी ग्रंथही लिहिला आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठात ते सायन्स आणि रिलीजन हा विषय शिकवत असत. त्यांचा सन्मान करण्यासाठी केंब्रिज, ऑक्सफर्ड, नॉर्थ-वेस्ट युनिव्हर्सिटी साऊथ आफ्रिका, युनिव्हर्सिटी ऑफ झिम्बाब्वे, युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साऊथ वेल्स आदी विद्यापीठांतील इतिहास, तत्त्वज्ञान या विषयाचे प्राध्यापक आणि शास्त्रज्ञ लॅन्केस्टर विद्यापीठात जमले होते.

### * रंगभूमी हे माझ्या दृष्टीने कॉलेज-कँटीन- दाभोळकर

'रंगभूमी हा माझा छंदविषय आहे. रंगभूमीचा विकास हा माझा प्रांत नाही. रंगभूमी हे माझ्या दृष्टीने कॉलेज-कँटीन आहे,' असे मत प्रसिद्ध अभिनेते आणि जाहिरात-व्यावसायिक भरत दाभोळकर यांनी 'ईएमडीआय' शैक्षणिक संस्थेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले. 'मराठी कलाकारांना घेऊन इंग्रजी नाटक करण्याचा मी केलेला प्रयोग यशस्वी झाला,' असे सांगून दाभोळकर म्हणाले, 'अमराठी प्रेक्षकांपर्यंत मराठीतील दर्जेदार साहित्य पोहोचवण्याच्या प्रयत्नातून मी ही नाटके रंगभूमीवर आणली. पुलंच्या 'तुझे आहे तुजपाशी'चे इंग्रजी रूपांतर 'इट्स ऑल युवर जनाब'ला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. हरिश पटेल, आत्माराम भेंडे, किशोर प्रधान अशी कलाकारांची 'टीम' होती. अलीकडे विनय आपटे, शिल्पा तुळसकर, सुहास जोशी यांना घेऊन जयवंत दळवींचे 'पुरुष' नाटक केले. अलीकडे मूळ इंग्रजी नाटकांपेक्षा 'हिंग्लिश' नाटकेच जास्त चालतात. प्रतिसाद वाढला असला, तरी स्थानिक संयोजकांनी निरुत्साह दाखवल्यामुळे ही नाटके पुण्यात दाखविणे शक्य होत नाही. 'पुरुष'सारख्या नाटकाला प्रायोजक मिळत नाहीत. गेल्या वीस वर्षांत मी २७ इंग्रजी नाटके केली. त्यातील फक्त चारच मराठी नाटकांवरून बेतलेली होती. रंगभूमीला आज नावीन्याची गरज आहे.'

दाभोळकर यांनी अलीकडेच 'गॉट टु बी ऐश्वर्या' आणि 'कॅरी ऑन हेवन' ही नाटके रंगभूमीवर आणली आहेत. दोन्हींचे मिळून २५०० हून अधिक प्रयोग झाले आहेत.

### * महागडे पुस्तक

स्टार पेले यांचे पुस्तक दीड लाख रुपयांचे आहे. दिग्गज मुष्टियोद्धे महम्मद



अली यांचे आत्मचरित्र सर्वात महागडे आहे. त्याची किंमत आहे फक्त पाच लाख रुपये. भारतातील सर्वात श्रीमंत क्रीडापटू सचिन तेंडुलकर यांच्याकडे हे पुस्तक आहे.

महम्मद अली यांच्या आत्मचरित्राचे नाव आहे 'गोट'. त्याची किंमत आहे १२ हजार ५०० डॉलर; अर्थात पाच लाख पाच हजार २०० रुपये. सचिनकडे या पुस्तकाची प्रत आहे. लंडनमधील एका चाहत्याने सचिनला ही भेट दिल्याचे 'न्यू केरला' या संकेतस्थळाच्या वृत्तात नमूद करण्यात आले आहे. पेलेच्या आत्मचरित्राचे वजन १८ किलो आहे; तर महम्मद अलींच्या पुस्तकाचे वजन ३४ किलो होते.

पेले यांच्या एक लाख ३७ हजार रुपये किमतीच्या पुस्तकाची भारतातील विक्री काही दिवसांतच दुहेरी आकड्यात जाण्याची शक्यता आहे. 'मरीन स्पोर्टस'चे थिओ ब्रॅगन्झा यांनी स्वत:साठी आणलेल्या पुस्तकाचीही खरेदी कोलकत्यातील एका व्यक्तीने केली आहे. एवढेच नव्हे, तर या पुस्तकासाठी अतिरिक्त सहा प्रतींची नोंदणी झाली आहे, असे ब्रॅगन्झा यांनी सांगितले. भारतात मुष्टियुद्धापेक्षा फुटबॉल लोकप्रिय आहे. त्यामुळे महम्मद अलीपेक्षा पेलेच्या पुस्तकास प्रतिसाद लाभेल असा अंदाज होता. आता पेलेच्या पुस्तकाबाबत काही सूट आहे का, अशी विचारणा केल्यावर ब्रॅगन्झा यांनी या पुस्तकाच्या विक्रीतून मिळणारा नफा खूपच कमी असल्यामुळे सवलत अशक्य असल्याचे सांगितले.

### * 'संपूर्ण जीवनरहस्य'चे प्रकाशन

'भगवद्‌गीता हा संकटांना सामोरा जाणारा 'जीवनग्रंथ' आहे, तर 'संपूर्ण जीवनरहस्य' या पुस्तकातील पाच रहस्ये अनेकांच्या जीवनाला दिशा देणारी ठरणार आहेत,' असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व एमआयटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांनी केले.

तेजग्यान फाउंडेशनच्या वतीने, 'संपूर्ण जीवनरहस्य' या शंकर सारडा यांनी अनुवादित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर तेजगुरू सरश्री तेजपारखींच्या व्याख्यानांचे संकलन करणाऱ्या प्रेमा भटेवरा, सकाळचे संपादक यमाजी मालकर, डॉ. कराड, शंकर सारडा उपस्थित होते.

कराड म्हणाले, 'वैज्ञानिक व आध्यात्मिक विचार मांडताना तेजगुरूंनी वर्तमानात रहायला शिका, भूतकाळ व भविष्याचा विचार करू नका, याची पुस्तकात सोपी उदाहरणे दिली आहेत. अतिशय लहान वयात सरश्रींना परमेश्वराची अनुभूती आली, अशा सद्‌गुरूंची समाजाला आज गरज आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे मूर्तिमंत दर्शन घडत आहे.'

'भारत हा बुद्धिमान लोकांचा देश आहे. पण त्याबरोबरच चारित्र्यवान माणसे असणेही आवश्यक आहे. या पुस्तकाच्या वाचनातून 'सत्‌चित आनंद' व योग्य

दिशा मिळेल, असे मला वाटते,' असेही कराड यांनी सांगितले.

शंकर सारडा म्हणाले की, जीवनाचा समग्र विचार व्यक्त करणारे सरश्रींचे ज्ञान आपल्याला मानसिक व शारीरिक बळ व अंतिम समाधान देणारे आहे.

यमाजी मालकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. मकरंद परांजपे यांनी केले.

### * मुलांना साहित्याची गोडी लावणारी सीडी

मुलांमधील स्वाभाविक संवेदनशीलता जोपासण्याचे कार्य साहित्य करते. बालसुलभ गीतांमधून त्यांना संगीताचे प्राथमिक धडे मिळतात. मात्र सध्याच्या दणदणाटी चित्रपट संगीतामुळे मुलांच्या भावविश्वावरही परिणाम होताना दिसून येतो. दर्जेदार काव्य व संगीताचा आस्वाद घेण्यापासून ती वंचित राहतात. या पार्श्वभूमीवर फाउंटन म्युझिकनिर्मित व डॉ. संगीता बर्वे लिखित दिग्दर्शित 'या रे या, सारे गाऊ या' ही सीडी मुलांना भाषा व संगीताचा आनंद देण्यासाठी बाजारात आली आहे. तिचे प्रकाशन 'आशय सांस्कृतिक'तर्फे अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.

'पाथफाइंडर'मध्ये झालेल्या या कार्यक्रमात मृणाल कुलकर्णी म्हणाल्या की 'दूरचित्रवाणीमुळे मुले पुस्तके वाचेनाशी झाली आहेत. त्यामुळे कविता व इतर साहित्यप्रकारांपासून ती वंचित राहतात. साहित्यातील नवे-नवे त्यांच्यापर्यंत पोहोचवले जायला हवे. डॉ. बर्वे यांनी यावेळी सांगितले की कवितेतील गंमत मुलांना कळावी व शब्दांची ओळख व्हावी, तसेच भाषेचा संस्कार व्हावा, या हेतूने या सीडीची निर्मिती करण्यात आली आहे.

सीडीतील गीते डॉ. सलील कुलकर्णी, राजीव बर्वे, आशिष मुजुमदार, डॉ. आशुतोष जावडेकर व डॉ. नीरज करंदीकर यांनी संगीतबद्ध केलेली आहेत.

### * 'कलाकारांचा भुर्दंड दूर करा'

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह आणि गणेश कला क्रीडा मंचासाठी पुणे महापालिकेने पोलिस परवानाच काढलेला नाही. त्यामुळे कलाकारांना पडत असलेला भुर्दंड दूर करण्याची सूचना पालकमंत्री अजित पवार यांनी महापालिकेचे आयुक्त प्रवीणसिंह परदेशी यांना दिली.

अन्य प्रकल्पांसाठी आरक्षित भूखंडांवर ही दोन्ही संकुले उभारण्यात आली आहेत. राज्य सरकारने अद्याप त्यांना परवानगी दिलेली नाही. त्यामुळे महापालिकेला पोलिस परवाना मिळू शकलेला नाही. त्यामुळे नाट्यनिर्माते आणि अन्य संस्थांना प्रत्येक प्रयोगासाठी एक हजार रुपये शुल्क भरावे लागत आहे. यासंदर्भात काही नाट्यकर्मींनी पवार यांची भेट घेतली. मनोहर कुलकर्णी, वि. भा. देशपांडे, भाग्यश्री देसाई, शुभांगी दामले, अशोककुमार सराफ, प्रकाश भोंडे, सुनील



महाजन व निकिता मोघे यावेळी उपस्थित होते.

### * 'हृदय'संवादाची 'ग्रेस'फुल अनुभूती

अनोख्या शब्दकळेसह काव्यनिर्मितीची प्रेरणा आणि प्रक्रिया याविषयी मार्मिक भाष्य करणाऱ्या 'हृदय'संवादाची 'ग्रेस'फुल अनुभूती रसिकांना आली.

कविवर्य ग्रेस यांच्या वाणीतून उत्फुल्ल आविष्काराचे सहजसुंदर चित्र रेखाटले गेले, तसेच त्यांच्या कथनातून अंतरात्म्याचा आकांत आणि आक्रोशही तरल संवेदनांचा अनुभव देऊन गेला.

शिरीष थिएटर्सतर्फे कविवर्य ग्रेस आणि ज्येष्ठ संगीतकार-गायक पं. हृदयनाथ मंगेशकर शब्द-सुरांच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. मानवी जीवनातील अनुभवविश्वाचे विविध पदर ग्रेस यांनी उलगडले. पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी संत मीराबाई, गालिब यांच्या रचनांसह 'भय इथले संपत नाही', 'वाऱ्याने हलते रान', 'घर थकलेले संन्यासी' आणि 'ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता' या ग्रेस यांच्या कवितांचे गायन करून रसिकांना जिंकले.

मत्सर आणि विद्वेषाचा त्याग करून शिडी चढल्यानंतर चतुर आणि फितुर माणसे त्या शिडीचा त्याग करतात. पण मत्सराचा, विद्वेषाचा त्याग करीत नाहीत असे मानवी वृत्तीवर भाष्य करीत ग्रेस म्हणाले, भूतकाळासंबंधी बोलणं एका दृष्टीने सोपे असते. कारण त्याबद्दल कोणी मोबदला देत नाही आणि कोणी बदला घेत नाही. पण समकालीनांविषयी बोलणे ही कसोटी असते. त्यामध्ये केवळ माणूस दुखावला जातो असे नाही, तर दोघांच्या संबंधांतील मूल्यांची दिशाही दाखवावी लागते. काव्यातील सुबोधता आणि प्रासादिक मांडणी ही वाटाड्याचे काम करून त्या अनुभवाच्या जटिलतेची वीण उलगडणार असेल, तर त्या प्रासादिकतेला माझा कुर्निसात आहे. कविता दुर्बोध नसते, दुर्बोध तुमच्याभोवतीचे वास्तव असते. वास्तवाशी संगनमत केल्याशिवाय तुम्ही सुरक्षित जगू शकत नाही, या वास्तवावर प्रकाशझोत टाकताना ग्रेस यांनी खरी कविता कधीच नष्ट होत नाही, अशी टिप्पणी केली. कलावंतांच्या निर्मितीतील व्यक्तित्व आणि रसिकांच्या आस्वादकतेतील व्यक्तित्व याची जोडबांधणी झाल्याशिवाय संवाद होऊ शकत नाही, असेही ग्रेस म्हणाले.

*मी हलेन अश्रुपुरता*
*मी निजेन स्वप्नाकाठी*
*द्रौपदी सजवते चिंधी*
*जशी कृष्ण करंगळीसाठी*
*जात्यातला जीव मित्राप्रमाणे झुरावे*
*असे काय झाले मला*
*नको रडू स्फुंदुनी असा रे*

*जरा निज तू मृत्तिकेच्या फुला*

या काव्यमय शब्दांत ग्रेस यांनी आपले 'मृत्युपत्र' मांडले. माझे पहिले प्रेम भूगोल, दुसरे प्रेम संगीत आणि तिसरे प्रेम साहित्य. याअर्थाने मी तृतीय श्रेणीचा प्राध्यापक. शब्दांची कशी गंमत असते? थर्ड क्लास म्हटलं की वाईट वाटते. पण तृतीय वर्गात बसलो म्हटलं की कसं बाल्कनीत बसल्यासारखे वाटते, अशा शब्दांच्या खेळाची गंमत उलगडून दाखवताना ग्रेस यांनी मराठीच्या सद्य:स्थितीवर भाष्य केले. आमच्या शिक्षकी व्यवसायाचा जयजयकार आहे. गेल्या पन्नास वर्षांत आम्ही मराठीचे किती शत्रू निर्माण केले? आणि मराठीच्या सत्यनाशाचा कैवार राजकीय पुढारी घेतात, यासारखा दुसरा मोठा विनोद नाही. याला सुसंगती म्हणावं की विसंगती? असा सवाल ग्रेस यांनी उपस्थित केला. 'पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती' ही संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांची रचना सादर करून पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी या मैफलीची सांगता केली.

'भय इथले संपत नाही' या गीत म्हणून लोकप्रिय झालेल्या कवितेविषयी भाष्य करताना ग्रेस म्हणाले, मी भित्रा आहे; पण भ्याड नाही. कुणी नास्तिक झाला, तर त्याचे मला भय नाही. पण कुणी मूल्यहीन झाला, तर तो अधिक घातक. कुठल्याच नात्यावर श्रद्धा न ठेवणारा तो मूल्यहीन.

## * अण्णाभाऊ साठे गौरव अंकाचे प्रकाशन

'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य जितके वास्तववादी आहे, तितकेच जीवनवादी आहे,' असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी काढले.

पुणे विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे गौरव अंका'चे प्रकाशन प्रा. ढोबळे यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाई वैद्य, डॉ. मा. प. मंगुडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख डॉ. रावसाहेब कसबे उपस्थित होते.

प्रा. ढोबळे म्हणाले, 'मराठीतील १९६० च्या दशकापर्यंतचे साहित्य हे शेवाळ्यासारखे बनले होते. त्यात भक्कमपणा उरला नव्हता. अण्णा भाऊंनी लेखन हे केवळ मनोरंजन किंवा अगदी प्रबोधनासाठी केले नाही, तर वेदनेचा हुंकार जन्माला येत असताना त्याच्याशी प्रामाणिक राहणारे लेखन केले. प्रतिमेला वास्तवाचे भान त्यांनी दिले. हेच लेखन पुढे आंबेडकरांच्या चळवळीशी नाते सांगू लागले. अण्णा भाऊ हे जात व धर्म यांच्या पलीकडे गेलेले साहित्यिक होते. आंबेडकर, अण्णा भाऊंची जयंती साजरी करायची असेल, तर काही चांगले संकल्प सोडावे लागतील. चांगल्यातून चांगल्याची सुरुवात करावी लागेल. जयंतीच्या दिवशी दारूमुक्तीसाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मागे उभे राहण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे.''

प्रा. कसबे म्हणाले, 'अण्णा भाऊंचे साहित्य नव्या परिवर्तनाचे, नवी नीतिमूल्ये देणारे व नव्या माणसाचे साहित्य आहे.'

दलित साहित्याचे अग्रदूत म्हणजे अण्णा भाऊ साठे, असे सांगून कृतिशील लेखक हीच अण्णा भाऊंची खरी ओळख आहे, असे मत मंगुडकर यांनी व्यक्त केले.

कुलगुरू डॉ. जाधव म्हणाले, 'अण्णा भाऊंचे अप्रकाशित साहित्य जतन करून ते प्रकाशित करण्याचा विद्यापीठाचा निर्धार आहे. हे साहित्य परिवर्तनाच्या चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरू शकेल.' पुणे विद्यापीठातील अण्णा भाऊंचे अध्यासन हे लोकचळवळीला प्रेरणा देणारे केंद्र बनावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख रामनाथ चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

## * सर्वप्रथम स्त्रीमुक्ती

''जगात सर्वप्रथम अहिंसेच्या मार्गाने बौद्ध स्त्रियांनी स्त्रीमुक्तीची चळवळ केली. स्त्रीमुक्तीच्या चळवळीचा उगम बौद्ध तत्त्वज्ञानापासून झाला आहे,'' असे मत प्रा. डॉ. लता छत्रे यांनी व्यक्त केले. पुणे विद्यापीठातील बौद्ध सहाय्यक संघात 'बौद्ध धम्मातील स्त्रियांचे स्थान' या विषयावर त्या बोलत होत्या. डॉ. विलास आढाव, थायलंडचे बौद्ध भिक्खू, भन्ते विरात, समचन, नागघोष, सुगत, बौद्ध सहाय्यक संधाचे अध्यक्ष रमेश आढाव, जी. डी. भोसले आदी यावेळी उपस्थित होते.

## * 'ताठ कणा'चे लेखक डॉ. रामाणी

तरुणांमध्ये वाचनाची आवड कमी असून ती वाढविण्यासाठी जुन्या पिढीने त्यांना वाचनाचे महत्त्व सांगावे, असा सल्ला आंतरराष्ट्रीय कीर्तीचे न्यूरोस्पायनल सर्जन डॉ. पी. एस. रामाणी यांनी दिला आहे.

ज्ञानगंगा पुस्तक प्रदर्शनादरम्यान 'लेखक तुमच्या भेटीला' या कार्यक्रमात वाचकांशी संवाद साधण्यासाठी ते आले होते.

डॉ. रामाणी म्हणाले, आजच्या मल्टिमीडिया युगात नागरिकांजवळ अजिबात वेळ नाही. फॅशनच्या अधिक आहारी न जाता 'वाचाल तरच वाचाल' हा मंत्र लक्षात ठेवल्यास पुढचं जीवन आनंदी आणि समाधानाने जाईल असे त्यांनी सांगितले. 'ताठ कणा' या पुस्तकाची आठवी आवृत्ती तयार होत आहे. या पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती 'स्टँडिंग टॉल' गेल्या महिन्यात 'साऊथ अमेरिका (कोलंबो)' येथे प्रकाशित झाली आहे.

नेहमीच्या शस्त्रक्रिया या पुस्तकाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार, 'बाल मेंदूचा

क्षयरोग' याला गोवा सरकार पुरस्कार मिळविलेले डॉ. रामाणी यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी वाहिले आहे. ग्रंथालीने 'ताठ कणा' या पुस्तकाचा सारांश देणारी 'सीडी' प्रकाशित केली आहे. याप्रसंगी ग्रंथालीचे प्रकाशक सुदेश हिंगलासपूरकर, ज्ञानगंगा प्रदर्शनाचे आयोजक उमेश पाटील, उदय पाटील, डॉ. सुशील पाटणकर उपस्थित होते.

### * 'कर्मात्मा आणि कर्मसिद्धान्त'चे प्रकाशन

'समाजहिताची कामे करणाऱ्याला कर्मबंधनातून मुक्ती मिळते,' असे प्रतिपादन ज्येष्ठ आयुर्वेदतज्ज्ञ आणि अध्यात्मशास्त्राचे अभ्यासक डॉ. श्री. बालाजी तांबे यांनी केले.

तेजज्ञान फाउंडेशनच्या 'कर्मात्मा आणि कर्मसिद्धान्त' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. शंकर सारडा यांनी या पुस्तकाचा अनुवाद केला आहे. त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

प्रख्यात प्रवचनकार डॉ. शंकर अभ्यंकर प्रमुख पाहुणे होते.

डॉ. तांबे म्हणाले, ''कर्मबंधनातून मुक्ती मिळणे हे माणसाच्या आयुष्यातील ध्येय असते. गीतेत कर्मबंधनातून मुक्ती मिळवण्याचा मार्ग सांगण्यात आला आहे. एकमेकांचा फायदा होईल आणि दुसऱ्यांना आवडेल असे कोणतेही चांगले कार्य हे कर्मबंधनातून मुक्ती मिळवून देणारे ठरते. म्हणून लोककल्याणाचा हेतू मनात ठेवून आणि लोकसंग्रहासह काम करायला हवे.' मनाला वश करून बुद्धीचे काम चालते. त्यासाठी शरीरयात्रा नीट चालली पाहिजे. जो शरीरशुद्धी राखून शरीरयात्रा नीट चालवतो तो सिद्ध मनुष्य. शरीर, मन व हेतू शुद्ध ठेवून लोककल्याणाचे काम केले, तर कर्मबंधनातून मुक्ती मिळणे अशक्य नाही, असेही डॉ. तांबे म्हणाले.

### * नव्या प्रकाशकांचा नवा झपाटा

मराठी ग्रंथव्यवहारात सध्या नवनवीन प्रकल्पांना अनुकूल वातावरण दिसत आहे. अत्रे सभागृहात श्रीशुभमने भरविलेल्या ग्रंथप्रदर्शनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यानंतर सध्या पाटील एंटरप्रायझेसतर्फे भरवण्यात आलेल्या ज्ञानगंगा प्रदर्शनालाही तुफान गर्दी दिसते आहे. पुस्तकांची विविधता बघताना खरोखरच आश्चर्य वाटत होते.

मराठीत नवीन पुस्तकेही मोठ्या प्रमाणावर निघत आहेत; आणि त्यांचा उठावही चांगला होत आहे.

गेल्या वर्ष-सहा महिन्यांत काही नवीन प्रकाशनसंस्थांनीही नावीन्यपूर्ण उपक्रमांना आरंभ केला आहे. नितीन कोतापल्ले यांनी 'सायन पब्लिकेशन्स प्रा. लि.' ही संस्था सुरू करून सहा महिन्यांत वीस पुस्तके बाजारात आणली आहेत. 'मॅकमिलन'सारख्या आंतरराष्ट्रीय प्रकाशनसंस्थेतील अनुभव गाठीला असल्याने मराठीबरोबर इंग्रजी-हिंदीतही पुस्तके काढण्याचा त्यांचा मानस आहे. मराठी वाचकापुरतेच आपले कार्यक्षेत्र सीमित न ठेवता, भारतीय पातळीवर आपला व्यवहार नेण्याची त्यांची योजना आहे. तेजग्यान फाउंडेशनच्या सरश्री तेजगुरू, तेजपारखीजी यांच्या पुस्तकांचा इंग्लिश अनुवाद 'वन प्लस वन इक्वल्स इलेव्हन' हा त्यांनी १५ ऑगस्टला बाजारात आणला... गणेश कला क्रीडा मंदिरात सरश्रींच्या साक्षात्कार दिनानिमित्त आयोजित प्रकाशन कार्यक्रमात 'कर्मात्मा आणि कर्मसिद्धांत' या सरश्रींच्या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचेही प्रकाशन डॉ. शंकर अभ्यंकर आणि डॉ. बालाजी तांबे यांच्या हस्ते झाले. तीन हजार रसिकांच्या उपस्थितीत सरश्रींच्या या दोन पुस्तकांचे देखण्या समारंभात विमोचन झाले... कोतापल्ले यांनी डॉ. विश्वास येवले यांच्या आळंदी ते पंढरपूर या जलमार्गाने केलेल्या जलदिंडीवर लिहिलेले 'उवाच' हे पुस्तकही प्रसिद्ध केले आहे...

अप्पा परचुरे यांचे चिरंजीव नरेन परचुरे यांनी 'कॉन्सेप्ट बुक्स'च्या रूपात नव्या धडाडीने नवीन पुस्तके काढण्यास आरंभ केला आहे, तर आनंद अंतरकर यांनी 'द ब्ल्यू बर्ड बुक्स'द्वारे गदिमांची अनेक पुस्तके नव्या स्वरूपात बाजारात आणली आहेत. 'डायमंड बुक्स'च्या दत्तात्रय पाष्टे यांनी ॲकॅडमिक आणि संदर्भ पुस्तकांचा झपाटा लावला आहे. इतर प्रकाशक बिचकून राहतात अशा पुस्तकांचाही मालिका त्यांनी धामधूम करीत काढल्या आहेत. राष्ट्रपती म्हणून निवडून आलेल्या डॉ. प्रतिभा पाटील यांच्यावर अवघ्या पंधरा दिवसांत पुस्तक काढण्याची गतिमानताही त्यांनी दाखवली आहे.

### * समरसता साहित्य परिषद, पुणे तर्फे कविसंमेलन.

समरसता साहित्य परिषद, पुणे शाखेतर्फे नुकतेच महाविद्यालयीन तरुणांचे कविसंमेलन आयेजित करण्यात आले. 'असे उपक्रम नवसाहित्यिकांसाठी प्रेरणादायी आहेत',असे प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री आणि कविसंमेलनाच्या अध्यक्षा प्रभा सोनवणे केले.

'आज नवीन साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध होण्यासाठी, रसिकांसमोर येण्यासाठी प्रयत्न करावे लागतात, आज या तरुणांनी सादर केलेल्या कविता ऐकून यांचा आणि पर्यायाने कवितेचाही भविष्यकाळ उज्जवल आहे असे वाटते. यातूनच विंदा करंदीकर, कवी ग्रेस, इंद्रजित भालेराव यांसारखे दर्जेदार कवी उदयास येतील. समरसता साहित्य परिषदेने असे उपक्रम राबवून तरुणांना प्रोत्साहन द्यावे, अशी अपेक्षा सोनवणे यांनी व्यक्त केली.

आरंभी मसापचे दिवंगत कार्याध्यक्ष ग.ना.जोगळेकर, बालसाहित्यकार सुधाकर प्रभू यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमास उत्तम बंडु तुपे, विकास मठकरी आदी मान्यवर उपस्थित होते.

❐

जाहिरात




वाचकमित्रहो..........

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या सभासद परिवारात सामील व्हा
आणि येत्या दीपावलीत दर्जेदार पुस्तकांची लयलूट करा.

**खास मेहता पब्लिशिंग हाऊसच्या सभासदांसाठी**
**( मेहता मराठी ग्रंथजगत आणि टी बुक क्लब )**

दिवाळीनिमित्त आम्ही

**दीपयोजना**

सादर करीत आहोत.
ही दीप योजना असणार आहे कूपन्सची.
कमीतकमी **रु.१०००** किंमतीची पुस्तके खरेदी करुन
**रु.६००** चे कूपन मिळवा म्हणजेच
**रु.२००/-** ची स्वतंत्र तीन कूपन्स भेट मिळवा.
ही कूपन्स आपण आपल्या
मित्र परिवारानांही दिवाळीची भेट म्हणून देऊ शकाल.
याचप्रमाणे **रु.२०००** च्या खरेदीवर
**रु.२००/-** ची सहा कूपन्स भेट मिळवा.

मग चला तर...
या योजनेचा लाभ घेण्यासाठी
लवकरात लवकर सभासद व्हा आणि
**अक्षरदीपावली** साजरी करा...

## सुधाकर प्रभूंचे बालसाहित्यक्षेत्रातील योगदान



ज्येष्ठ बालसाहित्यकार सुधाकर प्रभू यांचे ३१ जुलै रोजी सायंकाळी निधन झाले. बालकुमार साहित्य संमेलन संस्थेचे संस्थापक म्हणून त्यांनी केलेल्या कार्याला तोड नाही.

ज्या बालसाहित्यकारांनी गेल्या चाळीस-पन्नास वर्षांत आपल्या कथाकादंबऱ्यांनी मराठी मुलामुलींचे भावविश्व फुलविले, त्यांना विश्वसाहित्याचा वारकरी बनवले, त्यांच्या कल्पनाशक्तीला आणि कल्पकतेला नवे पंख दिले, त्यामध्ये सुधाकर प्रभू यांचे नाव आदराने घ्यावे लागते. वा. गो. आपटे, सानेगुरुजी, ना. धों. ताम्हनकर, पं. महादेवशास्त्री जोशी यांनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मराठी बालसाहित्य समृद्ध केले. सानेगुरुजींनी श्यामची आई, गोड गोष्टी (१० भाग), आवडत्या गोष्टी (५ भाग), सोनसाखळी, अमोल गोष्टी, भारतीय संस्कृती वगैरे पुस्तके आजही बालवाचकांना प्रभावित करतात. ताम्हनकरांच्या गोट्या आणि चिंगी या शाळकरी नायकांनी एकेकाळी कुमार-कुमारींपुढे रोल मॉडेल, आदर्श ठेवले. पं. महादेवशास्त्री जोशी यांनी भारतीय इतिहासातील, पुराणातील अनेक कथांचे रसाळ निरूपण केले. मुलांचा संस्कृतिकोश त्यांनी सिद्ध केला. गो. नी. दांडेकर यांनीही 'आईची देणगी'द्वारे संस्कारकथांचे दालन सजवले.

विसाव्या शतकाचा उत्तरार्ध गाजवला तो 'फास्टर फेणे'चे जनक 'भा. रा. भागवत' यांनी. 'फास्टर फेणे' या कुमार नायकाच्या धडपड्या व साहसी पराक्रमाच्या कथा ते १९६२ पासून १९९९ पर्यंत लिहीत होते. त्या कथांचे तब्बल २० भाग निघाले आहेत. त्यावरची कॉमिक्स इंग्रजी-हिंदीतही प्रसिद्ध झाली. बिपिन बुकलवार या बुकलव्हर (पुस्तकवेड्या) कुमाराच्या निमित्ताने उत्तम पाश्चात्त्य कथांचे परिचय त्यांनी करून दिले. ज्युल व्हर्नच्या गाजलेल्या विज्ञानकथांचे मराठीकरणही त्यांनी चटकदारपणे केले. चंद्रावर स्वारी, झपाटलेला प्रवासी यांना तुफान प्रतिसाद मिळाला. यदुनाथ थत्ते, लीलावती भागवत, मालती दांडेकर, रत्नाकर मतकरी, राजा मंगळवेढेकर, सुमती पायगावकर यांनीही विपुल लेखन केले.

याच काळात सुधाकर प्रभू यांनी बालसाहित्यात आपला ठसा उमटवला. पुण्याच्या एस. एम. जोशी हिंदी हायस्कूलमध्ये अध्यापन करीत असताना बालसाहित्याच्या प्रसाराचा, वाचनसंस्कृतीच्या विकासाचा ध्यास त्यांनी घेतला. अमरेंद्र गाडगीळ यांनी त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित केली. भाषांतर-अनुवाद यात गुंतून न पडता त्यांनी 'राजू प्रधान' या कुमार नायकाची निर्मिती केली आणि त्याला वेगवेगळ्या साहसांमध्ये आपली कल्पकता आणि हुशारी दाखवायची



संधी त्यांनी दिली. प्रजासत्ताकदिनाला राजधानी दिल्लीत विशेष साहस दाखवणाऱ्या मुलामुलींचा राष्ट्रपती गौरव करतात. त्या मुलांच्या साहसाच्या कथाही त्यांनी प्रत्यक्ष माहिती घेऊन लिहिल्या. त्या कथांचे संग्रह प्रसिद्ध केले. जोशी लोखंडे प्रकाशनच्या दिग्विजय लोखंडे यांच्या सहकार्याने पुण्यात गोखले हॉलमध्ये १९६५ साली बालसाहित्य जत्रेचे आयोजन त्यांनी केले आणि त्यानंतर दरवर्षी अशा ग्रंथजत्रा घेऊन मुलामुलींच्या हाती अधिकाधिक पुस्तके जात राहावी असा प्रयत्न त्यांनी केला. वेगवेगळ्या शाळांचे सहकार्यही मिळवले. शाळाशाळांत पुस्तकांची प्रदर्शने भरवली. पुस्तके मुलांना सहजपणे घेता यावी म्हणून सारसबागेतही ते बटाटेवड्याच्या स्टॉलशेजारी पुस्तके विकण्यासाठी उभे राहिले. बहुसंख्य लोक बटाटेवडे घेतात, पण पुस्तकांकडे वळत नाहीत असे त्यांना दिसले. तरी त्यांनी चिकाटी सोडली नाही. मुले कुठली पुस्तके घेतात हे त्यांनी न्याहाळले. 'जादूची बायको' ह्या पुस्तकाला एकदा मुलांकडून मागणी आली. तेव्हा ते चक्रावले. अद्‌भुताचे आकर्षण मुलांना असते हे त्यांच्या लक्षात आले. पुस्तकजत्रेत कथाकथन, काव्यवाचन वगैरे कार्यक्रम करून मुलांना आकृष्ट करायचे तंत्र त्यांनी विकसित केले. तसे कार्यकर्ते, कथाकथनकार त्यांनी तयार केले. १९६५ ते ७४ या दशकात ग्रंथप्रदर्शनाचे अनेक कार्यक्रम त्यांनी राबवले. बालकुमार साहित्याच्या प्रसारासाठी एखादी संघटना हवी असे त्यांना वाटू लागले.

त्यावेळी अमरेंद्र गाडगीळ हे वोरा आणि कंपनी पब्लिशर्सच्या मराठी विभागाचे काम पाहत. गोकुळ हे बालमासिक चालवत. आनंद मासिकाच्या संपादिका श्यामला शिरोळकर मुंबईतील शाळाशाळांमधून कथाकथन करून आनंदसाठी वर्गणीदार मिळवीत. सुधाकर प्रभू यांनी या दोघांशी सल्लामसलत करून 'मराठी बालकुमार साहित्य संमेलन संस्था' स्थापन करायचे ठरवले. पहिलेच संमेलन पुण्यात आयोजित केले. 'फास्टर फेणे'कार भा. रा. भागवत यांना त्याचे अध्यक्षपद दिले. बालसाहित्याला त्यामुळे स्वत:चे वेगळे संघटनात्मक अधिष्ठान लाभले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून बालसाहित्यकार आवर्जून उपस्थित राहिले. सोलापूर (१९७६), जळगाव (१९७७), इचलकरंजी (१९७८), वेंगुर्ला (१९८९) ही संमेलने झोकात, झटपट झाली. पुढे पाचसहा वर्षे संमेलने खंडित झाली. दोन-दोन वर्षांनी तरी संमेलने व्हावी असे ठरले. पुणे (१९८५), कऱ्हाड (१९८७), पुणे (१९८९), कोल्हापूर (१९९१) ही संमेलने दोन-दोन वर्षांनी झाली. त्यापैकी १९८९ मधील संमेलन हे अखिल भारतीय बहुभाषिक बालसाहित्यकारांचे संमेलन होते. अमरचित्रकथांचे संपादक अनंत पै हे त्याचे अध्यक्ष होते. हिंदी, गुजराती, कन्नड, बंगाली, उडिया, तमिळ, तेलगू वगैरे भाषांतील बालसाहित्यकारांमुळे या संमेलनाचे आयोजनही प्रभावशाली ठरले. सुधाकर प्रभू यांनी आपल्या हायस्कूलच्याच प्रांगणात सर्व व्यवस्था केली. त्यानंतरही कमीअधिक नियमितपणे संमेलने होत राहिली आहेत.

अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे कार्यालय एस. एम. जोशी विद्यालयातच राहिले. ते तेथे मुख्याध्यापक असल्याने त्याबाबत काहीच अडचण आली नाही. पुढे ते निवृत्त होण्याची वेळ आली तेव्हा संस्थेकरिता स्वतंत्र जागा हवी असा विचार कार्यकारिणीत मांडला गेला. त्यांनी हिरीरीने इमारतनिधीसाठी देणग्या गोळा करण्याचा चंग बांधला. काही ठेवीही बँकेत ठेवल्या. बालकुमार साहित्य संमेलन संस्थेने घरंदाज व्हावे हा संकल्प मात्र अजूनही तडीला गेलेला नाही.

गेली आठनऊ वर्षे कंपवाताने त्यांना ग्रासलेले होते. त्यामुळे घराबाहेर पडणे मुश्किल झाले. गोवा कला अकादमीने त्यांचा साहित्यसेवेबद्दल जीवनगौरव सुवर्णपदक देऊन गौरव केला. परंतु त्या कार्यक्रमालाही ते जाऊ शकले नाहीत. त्यांचा अमृतमहोत्सव ८ नोव्हेंबर २००५ रोजी साजरा झाला. त्यानिमित्ताने त्यांच्या दीर्घकालीन स्नेहीजनांच्या गाठीभेटी झाल्या. मात्र अखेर ३१ जुलै २००७ रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

बालकुमार साहित्य संमेलन संस्था, राजू प्रधान या कुमार नायकाची निर्मिती, एस. एम. जोशी विद्यालयातील अध्यापन कार्य आणि गावोगाव तयार केलेली कार्यकर्त्यांची मांदियाळी यामुळे सुधाकर प्रभू यांचे स्मरण होत राहील.

**—शंकर सारडा**

**नवे कोरे**

**मांजराची सावली**

**जयश्री कुलकर्णी**




या कथासंग्रहातील प्रत्येक कथेतला थरार आणि भयनाट्य काळजाचा ठोका चुकवणारे आहे. व्यक्तीच्या मनातील ताणाचे आणि भयाचे प्रक्षेप आपल्याही मनावर येऊन आदळतात असे कथा वाचताना जाणवते.

**किंमत : १३० रु.**
पोस्टेज : २५ रु.



# दखल




एका मराठी पुस्तकाचा सध्या अमेरिका-कॅनडात प्रचंड बोलबाला आहे. प्रत्येक अमेरिकन, कॅनेडिअन मराठी घरात हे पुस्तक मनोभावे वाचलं जातंय... कारण ते पुस्तक 'त्यांचं' आहे. त्यांच्या स्थलांतराच्या कहाण्या सांगणारं आहे. चार दशकांपूर्वी महासागर ओलांडून उत्तर अमेरिकेत गेलेल्या मराठी माणसांच्या देशांतराचं सविस्तर वर्णन करणारं हे छान पुस्तक. अपर्णा वेलणकरने लिहिलेलं आणि मेहता प्रकाशनने प्रसिद्ध केलेलं– 'फॉर हिअर, ऑर टू गो?'

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सिॲटल अधिवेशनात हे पुस्तक प्रसिद्ध झालं. हे पुस्तक बीएमएम स्पॉन्सर्ड असल्याचंही तिथे बोललं जात होतं.

इथे या पुस्तकाचा अजून फार बोलबाला नाही तर कुजबूज जोरात आहे. विशेषत: साहित्यवर्तुळात त्यातली काही पानं एकमेकांना चवीनं वाचून दाखवली जाताहेत. अमेरिकेतील मराठी कुटुंबांचा यथेच्छ पाहुणचार उपभोगून वर तिथल्या जीवनाचं 'एकरंगी' चित्रण करण्याचा 'लेखी अपराध' काही मराठी लेखकांनी केला होता. अजूनही त्या जखमा भळभळताहेत. रमेश मंत्रींनी दर्यापारच्या सहोदरांशी गप्पा मारून त्यांच्या जीवनाबद्दल न लिहिता गोऱ्या अमेरिकन पोरींची चावट वर्णनं, तिथल्या सेक्स शोची आंबट वर्णनं असं रंगेल चित्रण केलं, त्याचा संताप तिथले मराठी लोक कसा व्यक्त करतात हे फारच बोल्ड वाक्यांत लेखिकेने मांडलंय.

सुभाष भेंडे यांच्या 'गड्या आपुला गाव बरा'मध्ये काढलेल्या निष्कर्षाचाही समाचार या पुस्तकात घेतला गेलाय. अमेरिकेचा 'निदर्य, खुनशी, एककल्ली आणि चक्रम' असा भेंडे यांनी केलेला उल्लेख त्या मराठी लोकांना फारच

डाचला होता. बाळ सामंत यांच्या ‘अमेरिकेतील मराठी माणसं : कथा आणि व्यथा’ या लेखातील टीकाही त्या मंडळींना फारच झोंबली होती. या तिन्ही लेखकांबद्दलचा अमेरिकन मराठी माणसांचा संताप लेखिकेने या पुस्तकात तितक्याच तीव्रतेने शब्दबद्ध केलाय– अगदी त्या मराठीजनांच्या फणकाऱ्यांसह! पुलंनीही असं ‘लेखी पाप’ केलं होतं, पण त्याचं परिमार्जन करण्याची संधी त्यांना बीएमएमच्याच एका अधिवेशनात मिळाली आणि त्यात त्यांनी स्वत:ची चूक पद्धतशीर निस्तरलीही. ते भाग्य या बाकीच्या तीन लेखकांना कुठलं मिळायला? एव्हाना विस्मृतीतही गेलेले त्यांचे शब्द असे या पुस्तकातून रिटर्न गिफ्टच्या रूपाने पुनश्च जागे झाले.

बाकी या पुस्तकात तिथल्या मराठीजनांच्या जगण्याचं, आव्हानांचं, भावभावनांचं मनस्वी आणि वास्तवपूर्ण चित्रण आहे. पण सध्या मराठी सारस्वतांत कुजबूज होतेय या चार पानांची!

**– साभार**

**– ‘सांस्कृतिक कट्टा’ ‘दै. लोकसत्ता’**

**दिनांक -१० ऑगस्ट २००७**




**किंमत २२५ रु.**

पोस्टेज २५ रु.



# सुवर्णसंधी

**इयत्ता अकरावीत प्रवेश घेतलेल्या उमद्या युवा वर्गासाठी ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’तर्फे एक अभिनव योजना.....**

## ‘यंग रीडर्स बुक क्लब’

**काय आहे ही योजना...?**

* नाममात्र रु.१००/- भरुन केवळ **अकरावीचे** विद्यार्थी **तीन वर्षांसाठी** या योजनेचे सभासद होऊ शकतात.

* सभासद झाल्यास तीन वर्षासाठी **५०% सवलतीत** मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेली सर्व पुस्तके उपलब्ध असतील.

* शिवाय ‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे महाराष्ट्राच्या साहित्यिक-सांस्कृतिक घडामोडींबाबत अद्ययावत माहिती देणारे मासिक तीन वर्षासाठी मोफत घरपोच दिले जाईल.

**योजनेच्या अटी-**

* कॉलेजचे ओळखपत्र दाखवणे आवश्यक.
* पासपोर्ट साईज स्वतंत्र फोटो आवश्यक.

- संपर्क -
**मेहता पब्लिशिंग हाऊस,**
१९४१, सदाशिव पेठ, माडिवाले कॉलनी, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, पुणे - ४११ ०३०.
दूरध्वनी - २४४६३०४८ / २४४७६९२४.
**Website: www.mehtapublishinghouse.com**
**Email: info@mehtapublishinghouse.com**




**दोन अण्वस्त्रे घेऊन प्रशिक्षणासाठी निघालेले विमान पळवण्यात येते, आणि-**

# थंडरबॉल

**इयान फ्लेमिंग**

**अनु. जयंत कर्णिक**

'थंडर बॉल' ही जेम्स बाँडची कादंबरी १९६१ मध्ये प्रसिद्ध झाली.

अमेरिका-रशिया यांच्यातील शीतयुद्धाचा तो काळ. रशियातील केजीबी व स्मर्श या गुप्तहेर यंत्रणा आणि अमेरिकेतील एफबीआय आणि सीआयए या गुप्तहेर यंत्रणा यांची एकमेकावर कुरघोडी करण्याची जणू स्पर्धाच लागली होती.

त्या काळातील हेरगिरीचे अत्यंत रोमांचकारक नमुने जेम्स बाँडच्या रूपाने इयान फ्लेमिंगचे आपल्या थरारकथांमधून प्रकट केले. गुप्तहेर म्हणून जेम्स बाँडची एक धीरोदात्त, हिकमती, साहसी, चाणाक्ष अशी व्यक्तिरेखा तर अधोरेखित केलीच, त्याच जोडीने मदिरा आणि मदिराक्षी यांच्यामध्ये रस असणारा, खाद्यपदार्थांबाबत चोखंदळ असणारा, नवनवीन अद्ययावत शस्त्रे-उपकरणे वापरण्यात कुशल, अनेक आघात सोसूनही आत्मबळ न गमावणारा, पुरुषार्थाचा व पराक्रमाचा एक भव्य आदर्श अशी अचाट, लार्जर दॅन लाइफ व्यक्तिरेखा इयान फ्लेमिंगने मूर्तिमंत साकार केली.

आधुनिक काळातील पराक्रमाचा आणि पौरुषाचा हा बेडर आदर्श जगभर लोकमान्य झाला. चित्रपटांमध्ये सीन कॉनेरी सारख्या अभिनेत्यांनी थरारकथांमधील या काल्पनिक व्यक्तिरेखेला विलक्षण जिवंत करून रसिक प्रेक्षकांच्या हृदयसिंहासनावर मानाने बसवले.

अवघ्या चौदा पुस्तकांद्वारे साठच्या दशकात इयान फ्लेमिंगने जेम्स बाँडला अजरामर करून ठेवले. त्याचे शेवटचे पुस्तक १९६५ मध्ये बाजारात आले; परंतु त्यानंतरच्या चाळीस वर्षांत जेम्स बाँडची पुस्तके सतत बेस्टसेलर म्हणून आपले स्थान टिकवून आहेत. त्याच्या पुस्तकांच्या सुमारे चार कोटी प्रती खपलेल्या आहेत आणि त्याच्यावरच्या चित्रपटांचे नायक वेगवेगळे असले तरी, तेही बॉक्स



ऑफिसवर आपली कमाल दाखवत आहेत.

'थंडर बॉल' या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना ही अत्यंत रोमहर्षक आहे.

ग्रेट ब्रिटनच्या पंतप्रधानांच्या नावाने एक पत्र येते.

"दोन अण्वस्त्रे असलेले एक ब्रिटिश विमान २ जूनच्या रात्री दहापासून प्रशिक्षण उड्डाणावरून परत आलेले नाही हे आपणास हवाई दलप्रमुखांशी संपर्क साधल्यास कळेलच.

**दोन अण्वस्त्रांसह हे विमान आमच्या संघटनेच्या ताब्यात आहे. हे विमान व अण्वस्त्रे आपणास परत मिळवायची असतील तर दहा कोटी पौंड किंमतीचे शुद्ध सोने लगडीच्या रूपात आम्ही सांगू तेथे पोहोचवावे लागेल.**

बॉस्कोम्ब डाऊनच्या शाही हवाईदलाच्या पाचव्या प्रायोगिक तळावरून उड्डाण केलेले हे विमान– आहे. अण्वस्त्रांवर पुरवठा विभागाचे अमुक अमुक क्रमांक आहेत.

त्यात पाच कर्मचारी आणि एक निरीक्षक होता. दहा तास उड्डाण करण्याएवढे इंधन त्यात होते.

दोन अण्वस्त्रांसह हे विमान आमच्या संघटनेच्या ताब्यात आहे.

हे विमान व अण्वस्त्रे आपणास परत मिळवायची असतील तर दहा कोटी पौंड किंमतीचे शुद्ध सोने लगडीच्या रूपात आम्ही सांगू तेथे पोहोचवावे लागेल. (त्याच्या सूचना सोबतच्या पत्रात आहेत.) सोने ताब्यात घेणे आणि त्यानंतर त्याची विल्हेवाट लावणे यामध्ये कुठलाही अडथळा येता कामा नये; तसेच आमच्या संघटनेला आणि तिच्या सदस्यांना आपण व अमेरिकेचे अध्यक्ष यांचे पूर्ण माफीपत्र मिळायला हवे.

दिनांक ३ जून १९५९ सायं. ५ वाजल्यापासून सात दिवसांच्या आत म्हणजे १० जून १९५९ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत आमच्या अटींची पूर्तता व्हावी. ती न झाल्यास पुढील बाबींना तोंड द्यावे लागेल.

१) पाश्चात्त्य शक्तींच्या ताब्यातील किमान दहा कोटी पौंड किंमतीची मालमत्ता नष्ट करण्यात येईल.

२) त्यानंतर ४८ तासांत पूर्वसूचनेशिवाय कुठल्यातरी देशातील एक शहर नष्ट होईल. जीवितहानीही होईल.

३) या दोन घटनांच्या दरम्यानच्या काळात म्हणजे ४८ तासांत सगळ्या जगाला ही घटना कळवण्याचा हक्क आमची संघटना राखून ठेवत आहे. मोठ्या शहरांत त्यामुळे घबराट माजू शकेल याची नोंद घ्यावी.

संदेश एकमेव आणि अंतिम आहे. सोळा मेगा सायकल रेडिओ ध्वनिलहरीवर दर तासाला आपल्या उत्तराची वाट आम्ही पाहत असू.

स्वाक्षरी- स्पेक्टर

The special Executive for Counter intelligence, Terrorism, Revenge and Extortion.

सोबतच्या दुसऱ्या पत्रात हे सोने प्रत्येकी पाव टन वजनाच्या एक फूट जाडीच्या फोममध्ये बांधलेल्या पार्सलच्या रूपात हवे; त्याला किमान ३ पॅराशूट जोडलेले हवेत; उड्डाणाचे वेळापत्रक १६ मेगासायकल रेडिओ लहरीवर देण्यात यावे; याविरुद्ध उचललेले कोणतेही पाऊल म्हणजे करारभंग समजला जाऊन, अण्वस्त्र क्र. १ किंवा २ यापैकी कुठल्याही अण्वस्त्राचा स्फोट करण्यात येईल...'

ही दोन्ही पत्रे ग्रेट ब्रिटनच्या एम १६ या गुप्तहेर विभागाकडे येतात; एम १६ या विभागाचे प्रमुख आणि जेम्स बाँडचे बॉस असतात एम.

एम लगेच जेम्स बाँडला बोलावून घेतात.

त्या पत्रातील मजकुराचा शहानिशा केला जातो.

दोन अण्वस्त्रे वाहून नेणारे विमान खरोखरच बेपत्ता झालेले असते. 'रडार'वरून शोध घेता ते बॉस्टनपासून ५०० मैल पूर्वेकडे आयडलवाइल्डच्या मार्गावर दक्षिणेकडे वळले. बर्म्युडा, बहामा आणि दक्षिण अमेरिका हा मार्ग खूप वर्दळ असणारा आहे. त्यामुळे डिस्टन्स अर्ली वॉर्नर सिस्टिमला ते बीओएसीचे किंवा ट्रॅन्स कॅनडाचे विमान आहे असे वाटले. अटलांटिकच्या किनाऱ्याचा ५०० मैलावरचा काही भाग रडारच्या कक्षेबाहेर आहे; त्यामुळे ते विमान नंतर कुठे गेले हे लक्षात आले नाही.

या विमानातील अण्वस्त्रे त्यांची यंत्रणा कार्यान्वित करेपर्यंत पूर्णतया सुरक्षित असून, हा बॉम्ब सरळ जमिनीवर आपटला तर टीएनटी यंत्रणेचा स्फोट होईल; परंतु प्लुटोनियम अण्वस्त्राचा स्फोट होणार नाही. त्यासाठी टीएनटी स्फोटकाला टाइमबॉम्बसदृश यंत्रणा जोडावी लागते. हे बॉम्ब गोल्फ बॅगेच्या दुप्पट आकाराच्या बॅगेत, सूटकेसमध्ये राहू शकतात. कारमध्येही डिकीत ठेवता येतात.

अशी साधकबाधक चर्चा झाल्यावर 'ऑपरेशन थंडरबॉल'साठी मित्रराष्ट्रांच्या गुप्तहेर संघटनेला तैनात करण्यात येते. त्या विमानाचा शोध घेणे, अण्वस्त्रे ताब्यात घेणे, ते विमान पळवणाऱ्यांचा शोध लावणे ही 'ऑपरेशन थंडरबॉल'ची

**या विमानातील अण्वस्त्रे त्यांची यंत्रणा कार्यान्वित करेपर्यंत पूर्णतया सुरक्षित असून, हा बॉम्ब सरळ जमिनीवर आपटला तर टीएनटी यंत्रणेचा स्फोट होईल; परंतु प्लुटोनियम अण्वस्त्राचा स्फोट होणार नाही.**



कार्यकक्षा ठरते.

अशी साधकबाधक चर्चा झाल्यावर 'ऑपरेशन थंडर बॉल'साठी मित्रराष्ट्रांच्या गुप्तहेर संघटनेला तैनात करण्यात येते. त्या विमानाचा शोध घेणे, अण्वस्त्रे ताब्यात घेणे, ते विमान पळवणाऱ्यांचा शोध लावणे ही 'ऑपरेशन थंडर बॉल'ची कार्यकक्षा ठरते.

जेम्स बाँड रडारवरून विमान जेथे अदृश्य झाले त्या भागाचा नकाशा अभ्यासून काही निष्कर्ष काढतो. बर्म्युडा आणि बहामा येथील समुद्रकिनाऱ्याचा भाग त्याला यादृष्टीने महत्त्वपूर्ण वाटतो. दहा कोटी पौंडाची मालमत्ता– ही युरोपपेक्षा अमेरिकेचा निर्देश करते असेही त्याला वाटते. अमेरिकेच्या सागरी किनाऱ्यावर रडारचे जाळे विस्तृत आहे; तेव्हा बहामा बेटांचा बहुतांश निर्जन समुद्रकिनारा हा अमेरिकेपासून त्यामानाने जवळ आहे, तेव्हा विमानाच्या शोधासाठी तिकडे जायचा निर्णय जेम्स बाँड घेतो. अमेरिकन सीआयएचा प्रतिनिधीही तेथे यावा असे ठरते.

स्पेक्टर ह्या संघटनेबद्दल त्यावेळी फारशी माहिती कोणाला नसते. रशियाने कदाचित स्पेक्टर या नावाने धूळफेक करण्याचा प्रयत्न केला असावा अशी शंकाही घेण्यात येते.

परंतु स्पेक्टरने पाठवलेले हे पत्र म्हणजे आपल्या पोटात मारलेला जबरदस्त गुद्दा आहे हे लक्षात घेऊन जगभर या विमानाचा शोध घ्यावा म्हणून वेगवेगळ्या यंत्रणांना सावध केले जाते. आठवडाभराचीच मुदत असल्याने सर्व हालचाली जलद होण्याची गरज असते.

स्पेक्टर या संघटनेचीही माहिती वाचकांना याच जोडीने देण्यात येते.

या नाहीशा झालेल्या विमानात असणारा एक निरीक्षक गिसेप्पे पेटाच्ची हा इटालियन सहवैमानिक असतो. हा माणूस स्पेक्टरचा सदस्य असतो हेही आपल्याला कळते आणि या प्रकाराचे गांभीर्य गडद होते.

स्पेक्टरची सदस्यसंख्या वीस असून अर्नेस्ट स्टॅव्हरो ब्लोफेल्ड ( हा ब्लोफेल्ड 'यू ओन्ली लिव्ह ट्वाइस'मध्येही पुन्हा दिसतो.) हा या संघटनेचा संस्थापक असतो. त्याची नजर म्हणजे एक सूक्ष्मदर्शक यंत्र होते. अथांग काळ्या डोहाप्रमाणे असणारे हे डोळे पूर्ण तणावमुक्त असत; आश्वासक शांतता व विश्वास प्रकट

**स्पेक्टरची सदस्यसंख्या वीस असून अर्नेस्ट ब्लोफेल्ड (हा ब्लोफेल्ड 'यू ओन्ली लिव्ह ट्वाइस'मध्येही पुन्हा दिसतो.) हा या संघटनेचा संस्थापक असतो. त्याची नजर म्हणजे एक सूक्ष्मदर्शक यंत्र होते.**

**चरबीयुक्त हनुवटीपर्यंतचा अधिकारदर्शक जबडा, जाड बसके नाक, तत्त्ववेत्त्यासारखी चेहऱ्याची ठेवण; पण ओबडधोबड व्रणासारखी, पातळ आणि काळसर जिवणी- क्रौर्य दर्शवणारी. वजन ३८० पौंड... वेटलिफ्टर... पण आता थुलथुलीत...**

करीत. परंतु गुन्हेगार व खोटे बोलणाऱ्याच्या डोळ्यातील चलबिचल नेमकी हेरत. मासे ठेवलेल्या काचेच्या भांड्याप्रमाणे पारदर्शक बनून ते त्या माणसाचा वेध घेत.

चरबीयुक्त हनुवटीपर्यंतचा अधिकारदर्शक जबडा, जाड बसके नाक, तत्त्ववेत्त्यासारखी चेहऱ्याची ठेवण; पण ओबडधोबड व्रणासारखी, पातळ आणि काळसर जिवणी– क्रौर्य दर्शवणारी. वजन ३८० पौंड... वेटलिफ्टर... पण आता थुलथुलीत... गरगरीत ढेरी... घेरदार पँट... कातडी डबलकोट... धूम्रपान, मद्यपान किंवा मदिराक्षी यापासून दूर...

कोट्झे आणि मॉसलाव्ह हे दोन शास्त्रज्ञ स्पेक्टरमध्ये होते.

उरलेले अठरा सदस्य सहा राष्ट्रांचे, प्रत्येकी तीन तीन.

जगातील सहा मोठ्या गुन्हेगार आणि घातपाती संघटनांचे सदस्य.

तीन सिसिलियन.

तीन कॉर्सिकन फ्रेंच.

स्मर्श या रशियन संघटनेचे तीन माजी सदस्य.

सॉन्डर डायन्स्टचे (गेस्टापो) तीन सदस्य.

तीन युगोस्लाव्ह हस्तक.

तीन तुर्की-बैरुतमधील अफूवाहक यंत्रणेचे सदस्य.

कारस्थाने करणे, गुप्त संपर्क यंत्रणा चालवणे, यातील ते सर्वजण जाणकार तज्ज्ञ होते.

या प्रत्येकाकडे वैध पासपोर्ट होता. इंटरपोल आणि त्यांच्या त्यांच्या देशांचे पोलिसखाते यात त्यांचे रेकॉर्ड अगदी स्वच्छ होते.

मोठमोठाले गुन्हे करूनही स्वच्छ रेकॉर्ड हवे ही स्पेक्टरच्या सदस्यत्वाची अटच होती.

या अण्वस्त्र-अपहरण मोहिमेला 'प्लॅन ओमेगा' असे नाव देऊन त्याचे तपशील देण्यासाठी ब्लोफेल्ड एक बैठक घेतो. हे सर्वजण त्या बैठकीला उपस्थित असतात.

आरंभी तो गेल्या तीन वर्षातील कमाईचा तपशील देतो.

* जर्मन विभाग- मॉंडसीकडून हिमलरची रत्ने मिळवली. तुर्की विभागाने



त्यांची विल्हेवाट लावली. उत्पन्न साडेसात लाख पौंड.

**खंडणीचे सोने घेऊन येणारी पाच वाहतूक विमाने- ब्रांटे गावाच्या जवळच्या दोन चौरस किमी क्षेत्रात सोने टाकले जाईल... त्या क्षेत्राच्या मध्यावर डेक्का एअर क्राफ्ट होमिंग सिग्नल लावण्यात येईल...**

पूर्व बर्लिन मुख्यालय- रशियन विभागाने तिजोरी गायब करून अमेरिकेच्या सीआयएला विकली. उत्पन्न पाच लाख डॉलर्स.

* पॅस्टोरी साखळीतील १ हजार औंस हेरॉइन नेपल्समध्ये अडवून एंजेलिसमध्ये विकले. उत्पन्न- ८ लाख डॉलर्स.

* झेक जैविक अस्त्र कुपी ब्रिटिश सिक्रेट सर्व्हिसला दिल्या– एक लाख पौंड.

* फ्रेंच गुप्तहेर संस्थेकडून– १ अब्ज फ्रँक. फ्रेंच अणुशास्त्रज्ञाला ठार केल्याबद्दल.

या रकमेचे वाटप कसे करायचे याचे तपशीलही तो देतो.

कॉर्सिकन क्रमांक १२ ने एका अपहरण प्रकरणात एका मुलीला पालकांकडे पोहोचवताना आगळीक केली... त्याला समज देण्यासाठी– एक कळ दाबून ३००० व्होल्टचा झटका दिला जातो. भाजलेले मांस... जळलेले कपडे. ''स्पेक्टर हा एक समर्पित गट आहे. स्वयंशिस्तीपलीकडे तिच्यात कुठलीही शिस्त नाही. एका सदस्याची कमजोरीही पूर्ण यंत्रणेची मृत्यूघंटा ठरू शकते... जेव्हा स्वच्छता करण्याची गरज भासली तेव्हा आपण माझ्या कारवाईला मान्यता दिलेली आहे.'' हे त्यावरचे त्याचे स्पष्टीकरण.

...तर हा ब्लोफेल्ड आपल्या ओमेगाप्लॅनचे धागेदोरे समजावून सांगतो.

खंडणीचे सोने घेऊन येणारी पाच वाहतूक विमाने– ब्रांटे गावाच्या जवळच्या दोन चौरस किमी क्षेत्रात सोने टाकले जाईल... त्या क्षेत्राच्या मध्यावर डेक्का एअर क्राफ्ट होमिंग सिग्नल लावण्यात येईल... सोन्याचे एकेक पार्सल उचलायला एकापेक्षा जास्त पॅराशूटस लागतील... सोने ताब्यात घेऊन कॅटानिआमधील गोदामात सुरक्षित पोहोचवण्याची कामगिरी त्या भागातील माफिया प्रमुखावर सोपवण्यात आली आहे...

या सोन्याची विल्हेवाट कशी लावणार?

मर्क्युरिअल जहाजावर हे सोने चढवून सुवेझमार्गे गोव्याकडे रवाना होईल. अरबी आखातात पूर्वनियोजित स्थळी मुंबईचे सोने दलालांचे जहाज येईल. त्यावर हे सोने लादले जाईल. त्याची किंमत स्वीस फ्रँकमध्ये घेऊन गोव्याहून खास

**लार्गोचे हे गुप्त खजिना शोधण्याचे प्रकरण पूर्णतया वैध असते. त्यासाठी त्याने डिस्को व्होलांटे ही एक आलिशान नौका आणलेली असते. दोन शक्तिशाली इंजिने, हायड्रोफॉइलची रचना अशा सोयी त्यात असतील.**

विमानाने (झुरिचमधील) २२ स्वीस बँकांत जमा होईल... स्वीस बँकांत ही रक्कम जमा होईपर्यंत अण्वस्त्रे निकामी करण्याची गरज भासणार नाही... माझा मृत्यू झाला वा मी निकामी झालो तर क्रमांक १ हा माझा उत्तराधिकारी असेल... मी मुख्यालयात थांबणार आहे. त्यामुळे क्रमांक १ त्या क्षेत्रामध्ये सर्वेसर्वा सुप्रीम कमांडर असेल...''

हे सर्व ठरवून ती बैठक समाप्त होते.

जेम्स बाँड त्या बहामा बेटावर येऊन पोहोचतो. बहामाची राजधानी असते नासाऊ.

आल्या आल्याच त्याची गाठ डोमिनो व्हिटालो या इटालियन तरुणीशी पडते. इंग्लंडमध्ये शिक्षण झाल्याने ती इंग्लिश उत्तम बोलते. नाटकातही कामे करते. पण आता ती एमिलिओ लार्गो या समुद्रातील गुप्त खजिना शोधायला आलेल्या नौका मालकाबरोबर राहत असते. त्याच्याच बरोबर ती नासाऊला आलेली असते.

लार्गोचे हे गुप्त खजिना शोधण्याचे प्रकरण पूर्णतया वैध असते. त्यासाठी त्याने डिस्को व्होलांटे ही एक आलिशान नौका आणलेली असते. दोन शक्तिशाली इंजिने, हायड्रोफॉइलची रचना (जमिनीवरून व पाण्यात– दोन्हीवर चालण्याची क्षमता), पाण्यावर चालणारे व उडू शकणारे छोटे विमान, इत्यादी सोयी तिच्यात असतात. उडती तबकडीच म्हणा ना!

या बोटीवर तळघरात अण्वस्त्रे आहेत का असा प्रश्न बाँडला पडतो. कारण तो भाग लार्गो त्याला दाखवत नाही. पाणबुड्याचा पोशाख घालून बाँड त्या तळघराचा शोध घेण्याचे ठरवतो...

त्याच्या मदतीस सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सीचा लार्कीन येतो. नायब राज्यपाल, पोलिस आयुक्त, कस्टम ऑफिसर वगैरेंशी बाँडची चर्चा होते.

...लार्गोशी तेथील कॅसिनोमध्ये पत्ते खेळून बाँड सोळाशे डॉलर जिंकतो. ''मला टेबलाजवळ येता येता स्पेक्टर म्हणजे पिशाच्च दिसले'' असे वाक्य बाँड सहजपणे उच्चारतो. त्याचा परिणाम– लार्गोच्या चेहऱ्यावरचे स्मितहास्य नाहीसे होते. बाँड सावरून घेतो– ''पराभवाचे भूत म्हणायचेय मला.''

''तुमचे पिशाच्च विरुद्ध माझे पिशाच्च'' म्हणून बाँड आणखी एक डाव खेळायला लार्गोला प्रवृत्त करतो. तो डावही बाँड जिंकतो. लार्गोने त्यादिवशी



जिंकलेले सर्व पैसे बाँडला मिळतात.

...एमिलिओ लार्गो हा साहसी पण संशयास्पद बदमाश होता. पण त्याचे रेकॉर्ड स्वच्छ होते. डिस्कोच्या खरेदीसाठी त्याने स्वीस फ्रँकमध्ये रक्कम दिलेली असते...

पाणबुडीतून जाऊन बाँड त्या नौकेच्या तळाचा व परिसराचा शोध घेतो.

नौदलाचे प्रशिक्षित ऑफिसर्सही मार्क-सी पाणबुडी घेऊन येतात.

त्यांचे नेतृत्व करणारा फेलिक्स लीटर त्या नौकेचा पाठलाग करण्याची योजना आखतात. पाण्याखाली धुमश्चक्री करण्यासाठी बगळ्यांच्या व्ही आकाराच्या माळेप्रमाणे तीन तीन सैनिकांचा गट तयार करतात. प्रवाळाच्या खडकांमधून जातानाही प्रत्येकाने आपल्या पुढच्या क्रमांकाच्या मागे जायचे– त्यामुळे कोणीही मार्ग चुकणार नाही– अशी दक्षता घेतली जाते.

**शेवटच्या प्रकरणात आपल्याला कळते की, दोन्ही बॉम्ब ताब्यात आले आहेत. स्पेक्टर हा बड्या बदमाशांचा गट आहे. स्मर्श, माफिया, गेस्टापो इत्यादी संघटनांमधील माजी सदस्य या गटात आहेत, त्यांचा प्रमुख ब्लोफेल्ड आहे.**

...खूप धुमश्चक्री होते.

शेवटच्या प्रकरणात आपल्याला कळते की, दोन्ही बॉम्ब ताब्यात आले आहेत.

स्पेक्टर हा बड्या बदमाशांचा गट आहे, स्मर्श, माफिया, गेस्टापो इत्यादी संघटनांमधील माजी सदस्य या गटात आहेत, त्यांचा प्रमुख ब्लोफेल्ड आहे. तो मात्र हाती लागलेला नाही.

बाँड हा हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहे. नासाऊचे डॉ. स्टेनगेल बाँडला सांगतात, ''तुम्ही विश्रांती घ्यायला हवी. दर सहा तासांनी झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागतील. भरपूर झोप हवी. मग खडखडीत बरे व्हाल.''

बाँड विचारतो, ''मिस व्हिटाली कशी आहे?''

''ती व्यवस्थित आहे... तिला थोडं भाजलं आहे. पण आतून ती ठणठणीत आहे. शेजारच्या रूममध्येच ती आहे. तुम्ही तिला भेटू शकाल. पण फक्त एक मिनिट... नंतर ती झोपेल. तुम्हीही झोपा.''

त्या रूममध्ये गेल्यावर व्हिटाली म्हणते, ''तुम्ही कुठेही दूर जाऊ नका. इथंच थांबा. कळलं ना?...''

बाँड पलंगाच्या बाजूला जाजमावर कलंडतो. तो गाढ झोपेत असतो.

तीही आपले डोळे मिटून घेते.

स्पेक्टरने आखलेल्या अण्वस्त्रवाहक विमानाच्या अपहरणाची ही कहाणी

एम त्यावर त्याला कडक स्वरात सुनावतात, ''हीच तर तू मोठी चूक करतो आहेस. औषधाने रोग बरा होत नाही. फक्त त्याची लक्षणे दबतात... औषधे फक्त दुखणे लपवतात. आपल्या शरीरयंत्रणेला इजा पोहोचवतात.

बाँडच्या बुद्धिमत्तेची आणि धैर्याची कमाल दाखवतेच; विविध देशांच्या गुप्तहेर संघटनांच्या परस्पर सहाय्याचेही एक समंजस रूप प्रकट करते.

'थंडर बॉल'चा हा विलक्षण वादळी झपाटा वाचकाला सुन्न करणारा आहे.

'थंडर बॉल'च्या आरंभीची तीन प्रकरणे निसर्गोपचाराचे महात्म्य सांगण्यासाठी वापरली आहेत.

जेम्स बाँडबद्दल ताजा वैद्यकीय अहवाल त्याचे बॉस एमकडे आलेला असतो. त्यात म्हटलेले असते, ''सदर अधिकारी मूलतः शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आहेत. पण त्याची जीवनशैली दुर्दैवाने त्याला सुस्थितीत ठेवत नाही... दिवसाला ६० सिगारेट ओढतात... दिवसाला अर्धी बाटली मद्य रिचवतात. जीभ चरचरीत झाली आहे. रक्तदाब वाहून १६०/९० झाला आहे. यकृत हाताला जाणवत नाही. फायब्रोसायटीसच्या गुठळ्या हाताला लागतात... शरीरात तयार होणारे विषारी घटक त्यांच्या मूळ क्षमतेत बाधा आणतात... दोनतीन आठवडे संयमित जीवन जगल्यास, सबुरीने घेतल्यास ते पूर्णतया आपल्या अत्युच्च क्षमतेवर कार्यरत होऊ शकतील.''

जेम्स बाँड म्हणतो, ''मी पूर्ण तंदुरुस्त आहे, सर. डोकेदुखीचा प्रत्येकालाच त्रास होतो. गोल्फ खेळणाऱ्यांना फायब्रोसायटीस असतो. घामाघूम झाल्यावर वाऱ्यावर बसले की तो कोणालाही होतोच. ॲस्पिरिन आणि मलम लावले की झाले!''

एम त्यावर त्याला कडक स्वरात सुनावतात, ''हीच तर तू मोठी चूक करतो आहेस. औषधाने रोग बरा होत नाही. फक्त त्याची लक्षणे दबतात... औषधे फक्त दुखणे लपवतात. आपल्या शरीरयंत्रणेला इजा पोहोचवतात. आपण खात असलेल्या बहुतांश अन्नाबाबतही हे लागू पडते. कोंडारहित पांढरा ब्रेड, प्रक्रिया केलेली साखर, निर्जंतुकीकरणात उकळून सर्व जीवनसत्त्वे घालवलेले दूध प्रत्येक गोष्ट शिजवून, सत्त्वहीन केलेली असते... तुझ्या वैद्यकीय अहवालात आढळून आलेली विषारी घातक द्रव्ये तुझ्या अनैसर्गिक जीवनशैलीतून निर्माण झालेली आहेत... तेव्हा तू दोन आठवडे निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. जोशुआ वेन यांच्या श्रबलँडस या उपचारकेंद्रात जा. मी तुझ्याकरिता रिझर्वेशन करून ठेवले आहे.''

'''पण सर, मी एकदम ठीक आहे. निसर्गोपचार केंद्र आवश्यक आहे का?''

''आवश्यक नाही, अत्यावश्यक आहे. तू पूर्ण तंदुरुस्त असलास तरच



तुला शून्य शून्य विभागात मी ठेवू शकेन... नाहीतर–'

जेम्स बाँड खूप चिडतो... पण शेवटी श्रबलँडस केंद्रात जातो.

तेथे डॉ. वेन त्याला तपासून सांगतात, ''काळजीचं कारण नाही. रक्तदाब थोडा जास्त आहे... मणक्याच्या वरच्या बाजूला दुखापत आहे. तिच्यामुळे डोके दुखत असणार. उजवी बाजू जरा मागे दबल्यामुळे ताण येतो आहे– रक्तप्रवाहातील विषारी द्रव्य काढायला हवे. त्यासाठी आहारावर नियंत्रण हवे. मसाज, जलनेती, गरम व थंड सीटझ् बाथ, ऑस्टिओपॅथिक उपचार आणि थोडंफार ट्रॅक्शन घेतलं की मणक्याच्या तक्रारी दूर होतील.

तेथे डॉ. वेन त्याला तपासून सांगतात, ''काळजीचं कारण नाही. रक्तदाब थोडा जास्त आहे... मणक्याच्या वरच्या बाजूला दुखापत आहे. तिच्यामुळे डोके दुखत असणार. उजवी बाजू जरा मागे दबल्यामुळे ताण येतो आहे-

...बाँड निसर्गोपचार केंद्रात दोन आठवडे राहून, तेथील ट्रीटमेंटने खरोखरच तंदुरुस्त होतो. त्यालाही ते स्वतःला जाणवते. तो ऑफिसमध्ये कामाचा फडशा पाडतो. ड्यूक ऑफ डरहॅम ही कमी टार-निकोटिन असणारी सिगारेट पितो. मद्य टाळतो. तळकट अन्न– केक, कॉफी– टाळतो.

– आणि लगेच त्याला त्याचा बॉस ऑपरेशन थंडरबॉलवर रवाना करतो. शीतयुद्धाच्या काळातील एक जबरदस्त प्रकरण वाचकांना वाचायला मिळते.

**पृष्ठे : २२४ ● किंमत : १६० रु. ● सभासदांना : ११२ रु. ● पोस्टेज : २५रु.**

*देहविक्रय करणाऱ्या एका केरळीय महिलेची आत्मकथा*

**नलिनी जमीला**

**अनु. सुप्रिया वकील**

सेक्स वर्कर

**किंमत : १२० रु.**

पोस्टेज : २५ रु.

# साठोत्तरी

दोन वर्षांपूर्वी एका षष्ठ्यब्दीपूर्तीचं निमंत्रण आलं. पुण्याहून. प्रेषक : बलदोटा कुटुंबीय. कन्हय्यालाल बलदोटा. मारवाडी. व्यवसायाने बिल्डर. ('बिल्डर' व्यक्तीबद्दल आपल्याकडे 'धनदांडगे, राजकीय नेते, स्मगलर्स, बिल्डर्स' अशी होलसेल तिरस्काराची भावना असते. त्याबद्दल न बोललेलंच बरं!) माझा त्यांच्याशी परिचय वीसएक वर्षांपासूनचा. व्यवसायानिमित्त झालेला. अर्थात पुढे स्नेहात रूपांतरित झालेला. तरीही वयात फारसा फरक नसूनदेखील 'अरे-तुरे'च्या जवळिकीत न आलेला. त्यांच्या 'बिल्डरगिरी'बद्दल, त्यातल्या सचोटीबद्दल त्यांच्याशी व्यवहार करणाऱ्यांचा प्रत्यक्ष अनुभव असेलच; पण त्यापलीकडच्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल थोडंसं... 'साठोत्तरी'निमित्त!

शालेय शिक्षण मराठीतून झाल्यामुळे (पुढे ते मेकॅनिकल इंजिनिअर झाले!) मराठी वाचन दांडगं. त्यात पुन्हा आपण जे चांगलं वाचलं, ते इतरांनीदेखील वाचावं– ही भूमिका! त्यामुळे वाचलेल्याच्या झेरॉक्स प्रती काढून इतरांना पाठवणं, पुस्तकं विकत घेऊन ती काहीतरी निमित्ताने 'भेट' देणं– हादेखील उद्योग. तसंच काही चांगलं ऐकलं, की त्याच्या कॅसेट्स विकत घेऊन वाटणं– याचीही हौस. (त्यात सुधीर गाडगीळांपासून ओशोंच्या प्रवचनापर्यंत सारं काही आलं!) चांगली मराठी नाटकं, सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यासाठी इतरांना तिकिटं काढून आग्रहाने घेऊन जाणं, हे याच स्वभावाचं एक्स्टेंशन. गेल्या दिवाळीनंतर भेट झाली तेव्हा कामाआधी चर्चा...

'अहो, परवा 'दिवाळी पहाट'मध्ये तुमच्या मुंबईचा 'अशोक नायगावकर' ऐकला. एकदम भन्नाट!' असं सांगून त्यांचे तीन-चार किस्सेदेखील सांगितले. तेवढंच खळखळून हसून. हे हसणंदेखील टिपिकल! (नायगावकर भेटल्यावर हे त्यांना सांगितलं तेव्हा तेदेखील खुशीत येऊन मिशीतल्या मिशीत हसल्याचा 'भास' झाला!)

साठीपूर्वीच जेव्हा त्यांची 'बायपास' होती, त्याआधी दोनएक दिवस भेट झाली. निघताना विचारलं, 'एनी टेन्शन?'

'टेन्शन मी घेऊन काय फायदा? ऑपरेशन 'रुबी'मध्ये... जगताप डॉक्टर बेस्ट माणूस. टेन्शन त्यांनी घ्यायचं!'



'भेटू तिकडे नंतर.'

'नक्की. बरं, कुठं सोडायला सांगू?'

'अहो, कशाला? मी जाईन.'

'गाडी उभीच आहे. ड्रायव्हर बसून आहे. सोडेल तुम्हाला.'

हा संवाद जवळजवळ प्रत्येक भेटीशेवटी होतोच!

'रुबी'मध्ये एसी रूम... रूममध्ये टीव्ही वगैरे साऱ्याच सोयीसुविधा. त्याचबरोबर कमी बोलण्यासंबंधीची सूचना.

भेटल्यावर मंद हास्य. हातावर हात ठेवला. म्हटलं, 'इथं सोयी चांगल्या दिसतायत.'

'आयुष्यात एवढीच चैन! एरवी कमवायचं कशासाठी?'

पुन्हा मंद हास्य. जोरात हसायला बंदी.

तर अशा या माणसाची षष्ठ्यब्दीपूर्ती! पण तेव्हा जायला जमणार नव्हतं म्हणून एक कविता करून पाठवली. मिळाल्यावर लगेचच त्यांचा फोन–

'या वेळेसदेखील टांग मारणार वाटतं? कविता पाठवून दिली. बस्स?' असं म्हणून मोकळं हास्य.

समारंभाला सारे जवळचे नातेवाईक, मित्रमंडळी हजर होती, असं कळलं. दोन दिवसांनी इंदूरहून बलदोटांच्या बहिणीचा फोन आला.

'समारंभ छानच झाला. समारोप करताना तुमची कविता सर्वांसमक्ष वाचून दाखविताना त्याच्या डोळ्यांत पाणी आलं! त्याच्याबाबतीत असं सहसा कधी होत नाही.'

कविता होती...

'षष्ठ्यब्दीपूर्ती' हे केवळ निमित्त,<br>
जमविण्या सखे-सोयरे अन् आप्त ॥<br>
कुणी रक्ताचे, कुणी नात्याचे,<br>
सारे स्नेहभरल्या ऋणानुबंधांचे ॥<br>
सख्खे मित्र तर एकाहून एक थोर,<br>
साथ संगतीने झाली 'साठी' पार ॥<br>
छे, छे! कुठली साठी, अजून तरुण तुर्क<br>
'षष्ट्यब्दी इज जस्ट अ लँडमार्क!' ॥<br>
रोज नवे व्याप, अन् नाना उपाधी,<br>
येती कुठुनशा मुक्कामास व्याधी ॥<br>
कुणा बी.पी. वा कुणा डायबेटिस,<br>
कुणा 'प्लास्टी' वा कुणा 'बायपास' ॥<br>
एक कॅप्सूल सकाळी, रात्री एक टॅब्लेट,

साठीतल्या मुलांचे, हेच गोळ्या-चॉकलेट ॥
व्याधींपुढे कसली जीत, कसली हार,
हसत-खेळतच करू बेडा पार ॥
हर्षा-आनंदा नसो कुठली सीमा,
भाव-बंधनांची ही खरी गरिमा ॥
हे बंध रेशमाचे, वेढिती आज हृदया,
सुखद करिती अंतरीची 'संध्याछाया' ॥

नंतर आठवडाभरातच पुन्हा पुण्यात जेव्हा भेट झाली तेव्हा आधी हातात एक पुस्तक ठेवलं त्यांनी, अन् म्हणाले, ''त्या दिवशी सर्वांना दिलं, तुमचंच राहिलं होतं. कारण तुम्ही नेहमीप्रमाणे गैरहजर!

पुस्तकावर लेखकाचं नाव– सुरेश वसंत नाईक. अन् शीर्षक-'या सुखांनो' साठीपार होऊन संध्याछाया दिसू लागल्यावर वेगळं तरी काय म्हणायचं!

**प्रभाकर बोकील**
**साभार - दै. लोकसत्ता,**
**दिनांक.८.७.२००७**





# या सुखांनो

## सुरेश वसंत नाईक

**किंमत १७०रु.**
**पोस्टेज २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**





**मोटेलला आग लावून**
**विम्याचे पैसे उकळण्याचा**
**घाट घातला जातो, तेव्हा-**

**द स्पाय हू लव्हड् मी**

**इयान फ्लेमिंग**
**अनु. अजित ठाकूर**





'द स्पाय हू लव्हड् मी' ही कादंबरी जेम्स बाँडच्या इतर पुस्तकांपेक्षा एका दृष्टीने वेगळी आहे. १९६२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या प्रथमपुरुषी कादंबरीची निवेदिका विव्हियन मिचेल ही तरुणी आहे. इतर सर्व कादंबऱ्यांचा निवेदक 'लेखक' हा आहे. कथानिवेदन करणारा, जे घडले ते आपण त्यावेळी प्रत्यक्ष हजर होत अशा आविर्भावात सांगणारा तृतीय पुरुषी निवेदक हा सर्वसाक्षी असतो. तो प्रत्यक्ष घटनेचे वर्णन करतो, संबंधित व्यक्तींच्या मनात काय चालले आहे तेही ठामपणे सांगतो. क्वचित भाष्यही करतो.

'द स्पाय'ची निवेदिका तेवीस वर्षांची, साडेपाच फूट उंचीची, निळ्या डोळ्यांची, पिंगट केसांची आहे. ती म्हणजे, ''मला नेहमीच वाटायचे की माझा बांधा आकर्षक आहे. पण ॲस्टर हाऊसमधल्या माझ्याबरोबरच्या इंग्लिश मुलींनी मला सांगितले की माझा मागचा भाग जरा जास्तच उठून दिसतो आणि मी जरा घट्ट ब्रा घालायला पाहिजे तेव्हा माझा भ्रमनिरास झाला... माझे नाक फारच लहान आहे आणि जिवणी मोठी आहे. त्यामुळे मी जास्त सेक्सी दिसते... मी तशी आशावादी वृत्तीची आहे आणि दु:खाची झालर असलेल्या रोमँटिक स्वभावाची आहे... मी स्वतंत्र बाण्याची स्वच्छंदी मुलगी आहे...''

या विव्हियनच्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या क्षणी योगायोगाने जेम्स बाँड येतो आणि तो तिला वाचवतो. जेम्स बाँड हा स्पेक्टर संघटनेचा छडा लावण्याच्या प्रयत्नात असतो. मेकॅनिक्स टोळीतील आपला हस्तक बोरिस याला वाचवणे आणि स्पेक्टरच्या हॉर्स्ट डलमन या सदस्याला पकडणे ही कामे त्याजकडे असतात. पाठलाग करीत तो येथवर आलेला असतो.

लंडनमध्ये राहणारी ही तरुणी अर्धे जग ओलांडून न्यूयॉर्क संस्थानच्या उत्तरेकडील

**तिचा बॉस कुर्ट रेनर तिच्या प्रेमात पडतो. तिला दिवस गेल्यावर मात्र तो गर्भपाताचा आग्रह धरतो. त्यामुळे ती दुखावते. नोकरी सोडते. एक व्हेस्पा स्कूटर घेऊन कॅनडा-अमेरिकेच्या प्रवासाला निघते...**

लेक जॉर्ज या पर्यटनस्थळापासून दहा मैलांवर असणाऱ्या ड्रीमी पाइन्स मोटर कोर्ट येथे आलेली आहे. कॅनडाची हद्द येथून जवळ आहे; कॅनडाच्या सीमेपर्यंत हजारो पाइन आणि मेपल वृक्षांच्या रांगा पसरलेल्या आहेत. ती मूळची कॅनडामधील क्युबेक या फ्रेंच भाषक राज्यातील; फ्रेंच कॅनेडियन. पण लंडनमध्ये लेडी होण्यासाठी ती सोळाव्या वर्षी जाते. लंडनचा कंटाळवाणेपणा, तोचतोपणा, शिष्टपणा, कूपमंडूक वृत्तीतून आलेला घाबरटपणा, स्वत:चा नाकर्तेपणा, किशोरवयातील निरर्थक प्रेमप्रकरणे यापासून ती 'जीवघेण्या स्पर्धेत पुढे राहण्यासाठी', इंग्लंडमध्ये उसन्या घेतलेल्या अवतारापासून मुक्त होण्यासाठी आपल्या पूर्वायुष्यावर फुली मारून ती व्हेस्पा स्कूटरवरून प्रवासाला निघते. योगायोगाने एका मोटेलमध्ये स्वागतिका म्हणून काम करण्यासाठी तिला गळ घातली जाते.

ड्रीमी वॉटर्स या तलावाच्या जवळ असणाऱ्या या मोटेलच्या मुख्य इमारतीमागे चाळीस अर्धवर्तुळाकार खोल्या होत्या. पोहण्याचा तलाव, गोल्फचे मैदान, बालक्रीडांगण, स्वयंसेवा, उपाहारगृह... एकूण मोटेल आधुनिक व अद्ययावत होते.

जवळच्याच ट्रॉय या गावात राहणाऱ्या फॅन्सी दांपत्याकडे या मोटेलचे व्यवस्थापन होते. मोटेलचा मालक सॉंग्वीनेटी येथे क्वचितच येत असे. सप्टेंबरचा ऑफ सीझन असल्याने मोटेलमध्ये पर्यटकांचा शुकशुकाट होता. फोनही बंद केला गेला होता. वीजपुरवठाही थांबवला गेला होता.

डेरिक हा विव्हियनचा लंडनमधला प्रियकर. एकदा थिएटरमधल्या 'बॉक्स'मध्ये डेरिक व विव्हियन प्रणयाराधनात मग्न असताना मॅनेजर त्यांना पकडतो आणि पुन्हा थिएटरमध्ये आलात तर पोलिसांच्या ताब्यात देईन असा दम भरून हाकलून देतो. पुढं हा डेरिक ऑक्सफर्डला शिकायला जातो आणि तिला डच्चू देतो. ती तेथील एका वृत्तपत्राच्या कार्यालयात जाहिराती आणण्याचे काम स्वीकारते. पत्रकारितेतही जम बसवते. नंतर एका जर्मन वृत्तवितरणसंस्थेच्या लंडन ऑफिसमध्ये तिला बातम्यांचे संकलन करण्याचे काम मिळते. तिचा बॉस कुर्ट रेनर तिच्या प्रेमात पडतो. तिला दिवस गेल्यावर मात्र तो गर्भपाताचा आग्रह धरतो. त्यामुळे ती दुखावते. नोकरी सोडते. एक व्हेस्पा स्कूटर घेऊन कॅनडा-अमेरिकेच्या प्रवासाला



निघते... व्हेस्पा स्कूटर हे त्यावेळी बाजारात आलेले नवे वाहन होते. त्यामुळे ते चालवण्यातले थ्रील तरुणवर्गाला आवाहक वाटे... प्रवास करता करता विव्हियन ड्रीमी पाइन्स मोटेलमध्ये मुक्कामाला येते. तेव्हा सीझन संपायला आलेला असतो. व्यवस्थापक जेड फॅन्सी व त्याची बायको– दोघे त्या मोटेलची देखभाल करीत असतात. विव्हियनला जेड मोटेलमध्ये स्वागतिका म्हणून काम करायची गळ घालतो. चांगला पगार, भोजन निवास मोफत यांचे आमिष दाखवतो.

**''तुमची ओळखपत्रं दाखवा.'' असे ती म्हणते तेव्हा स्लग्सी बंदुकीची गोळी झाडून कॉफीचा डबा पाडतो. बरीच कॉफी खाली सांडते. ती घाबरते. हे दोघे गुंड आहेत हे तिच्या लक्षात येते.**

सीझन संपल्यावर हे फॅन्सी दांपत्य मोटेलची आवराआवर करून, विव्हियनला सांगते, ''उद्या मालक सॉंग्वीनेटी येऊन मोटेलचा चार्ज घेतील. तुझा पगारही तेच देतील.'' आणि ते दोघे मोटेलचे रजिस्टर, रोख रक्कम व खाद्यपदार्थांचा साठा घेऊन निघून जातात.

त्याच रात्री दोन प्रवासी मोटेलमध्ये येतात. मिस्टर थॉम्पसन आणि स्लग्सी. ''आम्ही विमा कंपनीकडून आलो आहोत. सगळ्या सामानाची यादी करायची आहे.''

''पण तुम्ही येणार असे फॅन्सीने मला सांगितले नव्हते.'' हे विव्हियनचे म्हणणे न जुमानता ते तिला अंड्याची भुर्जी करण्याची ऑर्डर सोडतात...

स्लग्सी तिच्याशी लगट करू पाहतो तेव्हा ती त्याला एक थप्पड ठेवून देते. त्याच्यावर खुर्ची उगारते. तेव्हा त्याचा सहकारी हॉरर म्हणतो, ''तू त्याला मारायला नको होतंस. सॅन क्यू तुरुंगातून तो सुटून आलाय. पक्का रानटी आहे... तशात आम्हाला इथं मालकानं पाठवलंय ते तुला सोबत करण्यासाठी.''

''तुमची ओळखपत्रं दाखवा.'' असे ती म्हणते तेव्हा स्लग्सी बंदुकीची गोळी झाडून कॉफीचा डबा पाडतो. बरीच कॉफी खाली सांडते.

ती घाबरते. हे दोघे गुंड आहेत हे तिच्या लक्षात येते. संधी साधून ती पळून जायचा प्रयत्न करते. पण हे दोघे तिला पकडून आणतात. तेवढ्यात मोटेलच्या दारावरची घंटी वाजते. ते दोघे घाबरतात. तिला म्हणतात, ''तू दार उघड.''

एक इंग्लिश माणूस समोर असतो. ''माझ्या गाडीचं चाक पंक्चर झालंय. मला रात्रीसाठी खोली मिळेल का? सकाळी मी जाईन.'' हा इंग्लिश माणूस म्हणजे जेम्स बॉंड. तो एका मोहिमेवर तेथे आलेला असतो.

**तेव्हा ते दोघे हबकतात. ''आम्ही विमा कंपनीकडून आलोय. इथल्या मॅनेजरकडून पैशाची अफरातफर झाल्याची तक्रार आलीय म्हणून चौकशीसाठी आम्ही आलोय.'' विव्हियन म्हणते, ''हे खोटं बोलताहेत.''**

हॉरर व स्लग्सी पुढे होऊन म्हणतात, ''मोटेल बंद झालेय. पण आम्ही हवं तर तुला चाक बदलायला मदत करतो.''

तो इंग्लिश माणूस म्हणतो, ''आता एवढ्या रात्री पंक्चर काढून मिळणार नाही. रात्री येथेच मुक्काम करावा लागेल.''

ते आढेवेढे घेतात तेव्हा तो दम भरतो, ''अल्बानीमध्ये अनेक उच्चपदस्थ माझे मित्र आहेत. तुम्हाला मोटेलचे लायसेन्स गमवायचे आहे का? मी दमलो आहे. मला खोली मिळायलाच हवी.''

तेव्हा त्याला खोली देणे क्रमप्राप्त ठरते. तो आपल्या कारमधून सामान आणायला जातो तेव्हा विव्हियन देखील त्याच्याबरोबर जाते. ती त्याला म्हणते, ''धन्यवाद. माझं नशीब म्हणून तुम्ही आलात. ते दोघे माझा खूनच करणार होते. त्यांना काय हवंय ते मला माहीत नाही. मी पळून जायचा प्रयत्न केला तर त्यांनी माझ्यावर गोळी झाडली.''

''त्यांच्याजवळ किती पिस्तुले आहेत?''

''ठाऊक नाही...''

तो एका सूटकेसमधून पिस्तूल व गोळ्या घेतो आणि तिला म्हणतो, ''मला तुझ्या शेजारची खोली दे. आपण या सगळ्यातून बाहेर पडेपर्यंत धीर धर.''

तो नाव नोंदण्यासाठी रजिस्टर मागतो. हॉरर त्याला नाव व व्यवसाय विचारतो. ''मी जेम्स बॉंड. पोलीस आहे.''

तेव्हा ते दोघे हबकतात. ''आम्ही विमा कंपनीकडून आलोय. इथल्या मॅनेजरकडून पैशाची अफरातफर झाल्याची तक्रार आलीय म्हणून चौकशीसाठी आम्ही आलोय.''

विव्हियन म्हणते, ''हे खोटं बोलताहेत. माझ्याशी लगट करू पाहताहेत– म्हणून मी याला थप्पड मारली तर त्यानं गोळी झाडली.''

''छे छे! अजिबात नाही...''

''नाही कसं?... मी स्वसंरक्षणासाठी तसं केलं. पैशांबद्दल म्हणशील तर मी पहिल्यांदाच ही गोष्ट ऐकतेय.''

जेम्स बॉंड त्यावर म्हणतो, ''मी वेळेवरच आलो की! शांतता प्रस्थापित करायला.''



जेम्स बॉंडसाठी मग विव्हियन अंडी, बेकन, कॉफी यांची सोय करते.

...

त्याच रात्री त्या मोटेलला ती गुंडांची दुक्कल आग लावते. मोटेलला आग लावून इन्शुरन्सचे पैसे मिळवण्याचा मालकाचा डाव असतो. त्यासाठीच व्यवस्थापक म्हणून काम करणाऱ्या 'फॅन्सी' दांपत्याने सर्व महत्त्वाची चीजवस्तू आणि मोटेलमधील पैसे घेऊन ते सोडलेले असते. विव्हियनला आगीबद्दल आणि पैशाच्या अपहाराबद्दल जबाबदार धरले जावे असाही मालकाचा डाव असतो. परंतु जेम्स बॉंड आगीची चाहूल लागल्याबरोबर विव्हियनला तिच्या खोलीतून बाहेर काढतो. ती बेशुद्ध अवस्थेत असते. ती भाजलेली असते. जेम्स बॉंड तिला सुरक्षित ठिकाणी नेतो आणि तिला वाचवतो. तिच्या डोक्यावर त्या गुंडांपैकी स्लग्सीने प्रहार केलेला असतो.

**काही झाले तरी हे दोघे व्यावसायिक गुंड आहेत... त्यांनी माझ्या खोलीत येऊन सायलेन्सर लावलेल्या पिस्तुलाने माझ्या बेडवर गोळ्या झाडल्या होत्या. मी मेलोय असे त्यांना वाटले असावे...**

या घटनेचा अर्थ कसा लावायचा?

''हे गुंड माझ्याशी ज्या पद्धतीने वागत होते, त्यावरून त्यांना माझी पर्वा नव्हती. माझं काहीही झालं असतं तरी त्यांना चाललं असतं. पण माझा उपयोग त्यांना कशासाठी तरी करायचा होता.'' असे विव्हियन म्हणते तेव्हा जेम्स बॉंड त्या घटनेचा संभाव्य अर्थ प्रकट करतो.

''आग लागण्याचं कारण म्हणजेच तू– हे त्यांना सिद्ध करायचं होतं... मोटेलचा मालक सॉंग्वीनेटी हा फॅन्सी दांपत्याला पुरावा म्हणून पुढे करून तुझ्यावर ठपका ठेवू शकला असता. मोटेल बंद करायचे असल्याने वीजपुरवठा बंद करायचा आदेश तुला दिला गेला. रात्रीसाठी कंदील वापर असे सुचवले होते. तू झोपली असताना कंदील लवंडला व आग लागली. इमारत लाकडी असल्याने लगेच पसरली. तशात वारा जास्त असल्याने सगळे काही जळून खाक झाले... काही झाले तरी हे दोघे व्यावसायिक गुंड आहेत... त्यांनी माझ्या खोलीत येऊन सायलेन्सर लावलेल्या पिस्तुलाने माझ्या बेडवर गोळ्या झाडल्या होत्या. मी मेलोय असे त्यांना वाटले असावे... पण मी बेडवर उशा वगैरे ठेवून कोणीतरी झोपलेय असा भास तयार केला होता. मी माझे सामान घेऊन दूर झाडात उभा होतो... ते फसले. तुझ्या खोलीत स्फोट झाल्याचा आवाज ऐकला म्हणून मी तिकडे धाव घेतली. तू बेशुद्ध होतीस... तुला उचलून येथे आणले.''

कॅ. स्टोनर तिला सांगतो, ''मिस मिशेल, कमांडर बाँडने झाल्या प्रकाराची कल्पना आम्हाला दिलेली आहे... मोटेलचा मालक साँग्वीनेटी मेक्सिकोला पळून गेला आहे... त्याच्यावर आम्ही मनुष्यवधाचा आरोप ठेवणार आहोत.''

तो तिला तेथेच थांबायला सांगतो. तिच्या हाती पिस्तूल देतो. ''मी हाक मारली तर लगेच ये. मला काही झालं तर तलावाच्या काठाने दूर जायचा प्रयत्न कर... सकाळी येथे परत ये. तोवर पोलीस येतील. त्यांना काय घडले ते सांग... त्यांनी वाद घातला तर मी कोण होतो एवढेच सांग. ००७. वॉशिंग्टनमध्ये सीआयएला फोन करून माहिती घ्या असेही हवे तर सांग.''

तेवढ्यात ते दोघे गुंड विव्हियनच्या व्हेस्पा स्कूटरजवळ येतात. त्यांच्या हातात टीव्ही असतो. तेव्हा जेम्स बाँड विव्हियनला म्हणतो, ''त्या दोघांजवळ जाऊन त्यांच्याकडची पिस्तुलं काढून घे.'' जेम्स बाँड त्यांच्यावर पिस्तूल रोखतो. हातातला टीव्ही टाकून स्लग्सी तिला पकडू पाहतो तेव्हा जेम्स बाँड त्याच्यावर गोळी झाडतो. ती त्याच्या पायाला चाटून जाते; ते पळ काढतात.

कारमध्ये बसून कार चालू करतात.

जेम्स गोळी झाडतो. ती ड्रायव्हरला लागते. कार तळ्यात कोसळते... ते दोघे गुंड तळ्यात बुडतात...

जेम्स बाँड विव्हियनला घेऊन एका न जळलेल्या खोलीत येतो... ती त्याच्या जखमांवर मलमपट्टी करते... शॉवर घेऊन ते दोघे पलंगावर पहुडतात.

सकाळी विव्हियनला जाग येते तेव्हा जेम्स बाँड शेजारी नसतो. पण त्याचे पत्र असते.

लेफ्टनंट मॉरो हा पोलिस अधिकारी चौकशीला येतो... कॅप्टन स्टोनरही येतो.

कॅ. स्टोनर तिला सांगतो, ''मिस मिशेल, कमांडर बाँडने झाल्या प्रकाराची कल्पना आम्हाला दिलेली आहे... मोटेलचा मालक साँग्वीनेटी मेक्सिकोला पळून गेला आहे... त्याच्यावर आम्ही मनुष्यवधाचा आरोप ठेवणार आहोत. फॅन्सी दांपत्यालाही ताब्यात घेतले आहे. हे दोघे गुंड आम्हाला बऱ्याच दिवसांपासून हवे होते. त्यांना पकडून देणाऱ्याला इनाम लावले होते. ते तुम्हाला मिळावे अशी शिफारस आम्ही करू... साक्षीसाठी तुम्हाला यावे लागेल... एवढेच. त्याचा खर्च आम्ही देऊ.''

विव्हियन आपले सामान स्कूटरवर लादते आणि पुढच्या प्रवासाला निघते...

जाता जाता कॅ. स्टोनर तिला एक संदेश देतो, ''तुम्हाला कमीत कमी त्रास



व्हावा असे कमांडर जेम्स बाँड यांनी सांगितले होते... तुम्ही शूर मुलीप्रमाणे वागलात... पोलीस आणि चोर किंवा गुप्तहेर आणि प्रतिहेर यांच्यात नेहमीच लढाई चालू असते... एक गट कायद्याचं रक्षण करणारा... दुसरा कायदा मोडणारा... या दोन्ही गटांच्या उच्चपदस्थ व्यक्तींच्या अंगी काही विशिष्ट कठोर गुण असतात... ते सर्व अतिशय कर्तव्यकठोर, थंड रक्ताचे, हृदयशून्य असतात. फक्त शत्रूच नव्हे तर आपले लोकही अशा प्रसंगी निर्घृणपणे वागतात... त्यांना तसं वागावंच लागतं... तू चुकून त्यांच्या जगात काही तास भरकटलीस... सुखरूप बाहेर पडलीस.. ससाणा आणि कबूतर यांच्यासारखाच त्यांच्यात व आपल्यात फरक आहे... तू आता आपल्या जगात जा... उगाच गोड स्वप्नं बघू नकोस किंवा झोपमोड करून घेऊ नकोस... बाय.''

पोलीस आणि चोर किंवा गुप्तहेर आणि प्रतिहेर यांच्यात नेहमीच लढाई चालू असते... एक गट कायद्याचं रक्षण करणारा... दुसरा कायदा मोडणारा... या दोन्ही गटांच्या उच्चपदस्थ व्यक्तींच्या अंगी काही विशिष्ट कठोर गुण असतात...

**पृष्ठे: १४४ ● किंमत : ११० रु. ● सभासदांना: ७७ रु. ● पोस्टेज: २० रु.**

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

## नवे कोरे

# भाषाशास्त्र परिचय




**डॉ. राजशेखर हिरेमठ**

**किंमत ८०रु.**
**पोस्टेज २०रु.**

*या पुस्तकामध्ये भाषा या विषयाच्या अनुषंगाने मराठी भाषेतल्या काही समस्यांचा सविस्तर विचार केला आहे.*

*भाषाशास्त्रातील इंग्रजी व मराठी अभ्यासकांची मते सांगून भाषा आणि भाषाशास्त्र यांतील महत्त्वाच्या प्रश्नांवर यात केलेली चर्चा वाचकांना उपयोगी ठरेल. विद्यार्थ्यांप्रमाणे सर्वसामान्य वाचकानांही भाषाशास्त्रावरील मते वाचून भाषाज्ञानाबद्दल जिज्ञासा निर्माण होईल. आणि भाषेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन प्राप्त होईल असे वाटते.*

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



## नुकतेच...

# भारतीय साहित्यिक




**डॉ. सुनीलकुमार लवटे**

**किंमत १२०रु.**
**पोस्टेज २५रु.**

*आजच्या जागतिकीकरणाच्या रेट्यात जोवर आपण आपली भाषा, संस्कृती, साहित्य टिकवून धरू तोवरच आपले स्वतंत्र अस्तित्व आणि अस्मिता सुरक्षित राहील. जागतिक स्तरावरील ज्ञानाचे संपादन हे आजच्या समग्र भाषा व साहित्य व्यवहाराचे उद्दिष्ट होऊ पहात आहे. ते उद्दिष्ट साध्य करताना आपणापुढे भारतीय ज्ञान, साहित्य, संस्कृती, भाषा जपण्याचे व ते सारे समृध्द करण्याचेही आव्हान आहे.*

*अखिल भारतीय अकादमीक समाजनिर्मिती हे एकविसाव्या शतकातील आपले साहित्यिक लक्ष्य आहे. त्यासाठी भारतीय भाषा व साहित्याचे एकसमवायी, समेकित (consolidet) रूप तयार करणे आवश्यक झाले आहे. त्याकरिता प्रत्येकात भारतीय भाषा व साहित्याची समृध्द जाण हवी. अशी जाण 'भारतीय साहित्यिक' हे पुस्तक तुमच्यात निर्माण करील. भारतासारख्या बहुभाषिक, बहुसांस्कृतिक देशात 'भारतीय साहित्यिक' सारखं पुस्तक आपल्या संग्रही असणं म्हणजे भारतीयतेचं स्पंदन आपल्या हृदयाशी जपण्यासारखंच!*

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# 'जेम्स बाँड' विशेष....

## बाँडच्या आवडत्या कार्स

१. सन बीम अल्पाइन सेरीज ५- जेम्स बाँडची पहिली कार

२. ॲस्टन मार्टिन डीबी ५- बुलेटप्रूफ काचा, फिरत्या नंबर प्लेटस, टायर्सना स्लॅशर ब्लेड. 'गोल्डफिंगर'मधील कार.

३. टोयोटा २००० जीटी कन्व्हर्टिबल- सीन कोनेरीला मागच्या कूपेमध्ये बसता यावे म्हणून या कारचे छत काढणे कार कंपनीला भाग पडले.

४. लोटस एस्प्रिट- 'दि स्पाय हू लव्हड् मी' मधील ही कार पाण्याखालील झटापटीसाठी पाणबुडीमध्ये परावर्तित होते.

५. सायट्रॉन २ सीव्ही- 'फॉर युवर आइज ओन्ली' या कादंबरीतील ही कार सामान्य असते. तिच्यात बाँडच्या इतर कारमध्ये असणारी आधुनिक उपकरणे वा आक्रमक-संरक्षक साधने नसतात.

६. ॲस्टन मार्टिन व्ही ८- क्षेपणास्त्रांनी युक्त अशी अग्निरोधक कार. टायर्स बर्फावरून प्रवास करण्याच्या दृष्टीने सोयीस्कर.

७. बीएमडब्ल्यू झेड ३- 'गोल्डन आय' या चित्रपटामुळे ही कार खूप लोकप्रिय झाली.

## बाँडच्या कादंबऱ्यांतील खलनायक

१. डॉ. ज्युलियस नो- भारी कलाकृतींची चोरी करणारा डॉ. नो याला पोलादाचे हात बसवलेले असतात.

२. ऑरिक गोल्डफिंगर- सोन्याचा प्रचंड साठा आणि चोरटा व्यापार गोल्डफिंगरला जेम्स बाँड हा सर्वात मोठा शत्रू वाटतो. त्याचा काटा काढण्यासाठी तो जंग जंग पछाडतो.

३. अर्न्स्ट स्टॅवरो ब्लोफेल्ड- 'थंडरबॉल', 'ऑन हर मॅजेस्टिज् सिक्रेट सर्व्हिस' आणि 'यू ओन्ली लिव्ह ट्वाइस' या तीन कादंबऱ्यांत हा खलनायक भेटतो. 'थंडरबॉल'मध्ये तो दोन अण्वस्त्रांसह प्रशिक्षणासाठी उड्डाण करणाऱ्या विमानांचे अपहरण करतो; 'ऑन हर मॅजेस्टिज् सर्व्हिस'मध्ये जेम्स बाँडच्या नवपरिणीत पत्नीला ठार मारतो आणि तिसऱ्या कादंबरीत जपानच्या एका बेटावर



विषारी वनस्पतींचे उद्यान काढून पाचशेवर जपान्यांच्या आत्महत्यांना मदत करतो. डॉ. शॅटरहँड या नावाने तो या उद्यानाची उभारणी करीत असतो.

४. ह्युगो ड्रॅक्स- मूनरेकर या कादंबरीत ड्रॅक्स हा नर्व्ह गॅसचे ५० गोल तयार करून जगातील सर्व लोकांना ठार मारण्याची योजना आखतो. जेम्स बाँड त्याला वेळीच थांबवतो.

५. मॅक्स झोरिन- गर्भावस्थेत असताना आपल्या पोटी सुपरमॅन जन्माला यावा म्हणून स्टेरॉइड इंजेक्शन घेणाऱ्या मिसेस झोरिनचा मॅक्स हा मुलगा. सुपरमॅनच्या ऐवजी एका विकृत मुलाचा जन्म होतो.

६. रेनार्ड- 'दि वर्ल्ड इज नॉट इनफ'मध्ये रेनार्ड हा दु:खवेदनांच्या पलीकडे गेलेला माणूस दाखवला आहे. ''मी आधीच मेलेलो आहे. मला कोणीच आता मारू शकत नाही'' असे तो म्हणतो.

७. सँचेस- जेम्स बाँडला भावनात्मक पातळीवर आव्हान देणारा व हवालदिल करणारा.

८. सॉग्वीनेटी- 'द स्पाय हू लव्हड् मी'मधील मोटेलचा मालक. हा कादंबरीत प्रत्यक्ष येत नाही. पण आपले मोटेल जाळून टाकून विम्याचे पैसे मिळवण्याचा घाट घालतो. जेम्स बाँडशी त्याचा प्रत्यक्ष सामना होत नाही. जेम्स बाँड ईटनच्या कॉलेजातील एक सहविद्यार्थी ९ स्कॅरामांगा नावाचा होता. त्याचे काही कारणाने जेम्स बाँडशी भांडण झाले असावे. त्याचे नाव जेम्स बाँडने या कादंबरीत वापरले असे जेम्स बाँडच्या एका ताज्या चरित्रात स्पष्ट केले आहे. 'द मॅन वुइथ गोल्डन गन'मधील स्कॅरामांगा प्रत्येक बळीसाठी दहा लाख डॉलर्सची फी आकारतो.

## जेम्स बाँडच्या कादंबऱ्यांतील नायिका

१. पुसी गॅलोअर- 'गोल्डफिंगर'मधील या मदनमस्त तरुणीने 'गोल्डफिंगर'च्या पत्त्यांच्या जुगारातले यशाचे गुपित प्रकट झाल्यावर जेम्स बाँडसाठी आपले सौंदर्य पणाला लावले.

२. टेरेसा डी व्हिसेन्झो- जेम्स बाँडशी विवाह करण्यापर्यंत मजल मारणारी एकमेव नायिका. 'ऑन हर मॅजेस्टीज् सिक्रेट सर्व्हिस'मध्ये विवाहानंतर अल्पावधीतच ब्लोफेल्ड तिला ठार मारतो. तिच्या या आकस्मिक निधनाने जेम्स बाँड सैरभैर होतो.

३. हनी रायडर- डॉ. नो. या चित्रपटात उर्सुला ॲनड्रेसने उभी केलेली हनी रायडर ही समुद्रातून अवतरणाऱ्या व्हीनससारखी भासते. ती जेम्स बाँडला विचारते, ''तू शंखशिंपले शोधत आहेस का?'' तो उत्तर देतो, ''नाही. मी फक्त बघतो आहे.'' हनी त्याच्याकडे बघून समंजस स्मित करते.

४. टिफिनी केस- 'डायमंडस आर फॉरएव्हर' या कादंबरीतील टिफनी केस ही बाँडच्या सर्व नायिकांमध्ये जास्त बुद्धिमान मानली जाते. तिचा बुद्ध्यांक

१६० पेक्षा जास्त आहे.

५. सॉलिटेअर- 'लिव्ह अँड लेट डाय'ची नायिका सॉलिटेअर टारोट कार्ड द्वारे भविष्य सांगू शकते. समोरचा माणूस जे सांगतो आहे ते खरे आहे की खोटे हे ती सांगू शकते. त्यामुळे मिस्टर बी हा तिच्याशी जवळीक ठेवतो.

६. जिंक्स जॉनसन- 'डाय अनदर डे'मध्ये जिंक्स ही बिकिनीत दिसते आणि बाँड तिच्यावर फिदा होतो.

७. वाइ लिन- 'टुमारो नेव्हर डाइज'मधील वाइ लिन एका गगनचुंबी इमारतीवरून उडी मारते आणि बाँडसारखीच बेदरकार साहस दाखवते. 'महिला बाँड'.

**बाँडची शस्त्रे**

१. निळा क्ष-किरण चष्मा- 'दि वर्ल्ड इज नॉट इनफ'मध्ये या चष्म्याच्या सहाय्याने जेम्स बाँड दडवलेल्या शस्त्रांचा (आणि लपवलेल्या अंतर्वस्त्रांचा देखील) छडा लावतो.

२. क्यूज पेट- जेम्स बाँडचे यंत्रमानवाचे स्वरूप. 'स्नूपर'.

३. कीचेन- पेनमधील डिटोनेशन प्रक्रियेला गती देणारी शीळ या कीचेनद्वारे वाजवता येते आणि स्फोट घडवून आणता येतो.

४. सोनेरी गन- सोन्याचा सिगारेट, लायटर, सोन्याची सिगारेट केस, सोन्याचे कफलिंक आणि सोन्याचे पेन अशा चार वस्तू एकत्र असणारी गन.

५. व्हाइस बॉक्स- 'डायमंडस आर फॉरएव्हर'मध्ये आपला आवाज बदलून इतरांसारखे आवाज काढण्यासाठी ही ध्वनी-पेटी वापरण्यात येते.

६. पाण्याखाली श्वसनासाठी उपकरण- थंडर बॉलमध्ये पाण्याखाली राहूनही चार मिनिटांसाठी ऑक्सिजन घेण्यासाठी उपयुक्त ठरलेले अंडरवॉटर ब्रेदर.

**बाँडच्या भूमिका करणारे अभिनेते**

१. सीन कोनेरी-

२. जॉर्ज लॅझेन्बाय- 'ऑन हर मॅजेस्टीज सिक्रेट सर्व्हिस' चित्रपटाचा नायक.

३. रॉजर मूर- बाँडचे मजेशीर, खेळकर व्यक्तिमत्त्व प्रकट करणारा, सर्वात जास्त वयाचा नट.

४. स्मिथी डाल्टन- भरधाव कार चालवण्याचा किंवा यांत्रिक साधने वापरण्याचा सोस नसलेला बाँड.

५. पियर्स ब्रोस्नान- सर्वात जास्त रोमँटिक बाँड.

६. डॅनिएल क्रेग- कॅसिनो रॉयल- स्त्रियांना भुरळ घालणारा.

❒



**सोन्याचे पिस्तूल बाळगणाऱ्या स्कॅरामांगाच्या संघटित गुन्हेगारीचा निःपात**

**द मॅन विथ द गोल्डन गन**

**इयान फ्लेमिंग**

**अनु. डॉ. देवदत्त केतकर**




इयान फ्लेमिंगची 'द मॅन वुइथ गोल्डन गन' ही कादंबरी त्याच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाली. ती त्याच्या इतर कादंबऱ्यांपेक्षा विस्ताराने कमी म्हणजे अवघ्या शंभर पृष्ठांची आहे. ती त्याला अधिक फुलवायची असावी; परंतु त्याच्या आकस्मिक निधनाने (१९६४) तिच्या प्रारंभीच्या खर्ड्याचेच व्यवस्थित संपादन करून ती प्रसिद्ध करणे भाग पडले. उण्यापुऱ्या दहा वर्षांच्या अवधीत त्याने लिहिलेल्या १२ कादंबऱ्या त्याच्या हयातीत प्रकाशित झाल्या. 'द मॅन वुइथ द गोल्डन गन' ही तेरावी कादंबरी १९६५ मध्ये निघाली. 'ऑक्टोपसी' ही दीघकथा त्यानंतरच्या वर्षी बाजारात आली.

'द मॅन वुइथ गोल्डन गन'चे कथानकही जेम्स बाँडच्या हरहुन्नरी चातुर्याची आणि पराक्रमाची आणखी एक रोमांचकारक झलक दाखवणारे आहे.

या कादंबरीची सुरुवात होते तीच मुळी अनपेक्षितपणे. ब्रिटिश हेरखात्याला ''मी जेम्स बाँड बोलतोय. मला थेट एमशी बोलायचे आहे'' असा फोन येतो. बाँड आपला सांकेतिक क्रमांकही सांगतो. परंतु फोन घेणारी मुलगी तो फोन एमकडे न देता, फोनची वैधता तपासणाऱ्या संपर्क अधिकाऱ्याकडे देते. कारण तिच्या माहितीप्रमाणे आणि वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांनुसार सुमारे वर्षापूर्वी जपानमध्ये एका कामगिरीवर असताना जेम्स बाँड मृत्यू पावलेला असतो. (हा कथाभाग 'यू ओन्ली लिव्ह ट्वाइस'मध्ये आला आहे.) त्यामुळे जेम्स बाँडच्या नावाने फोन करणारा हा कोणीतरी भंपक वा वेडपट माणूस असणार असे त्या फोन घेणाऱ्या मुलीला वाटते.

संपर्क अधिकारी कॅप्टन वॉकर स्कॉटलंड यार्डच्या विशेष अधिकाऱ्यांना सतर्क करतो; हा फोन कोठून येत आहे याचा छडा लावणारी यंत्रणा त्यामुळे

**या जेम्स बाँडला एका अवघड कामगिरीवर पाठवून खुशाल मरू द्यावे असा काही अधिकाऱ्यांचा डाव असतो. बाँडला देशद्रोही म्हणून आरोपपत्र देऊन कोर्ट मार्शल करावे असे मत व्यक्त करतात.**

कार्यान्वित होते.

कॅ. वॉकर फोन घेतो.

''मी कमांडर जेम्स बाँड क्र. ००७. मला कृपया एम किंवा त्यांची सेक्रेटरी मिस मनीपेनी यांच्याशी बोलू द्या...''

कॅ. वॉकर उत्तर देतो, ''मी ह्या दोन्ही व्यक्तींना ओळखत नाही. हा नंबर नक्की बरोबर आहे ना?''

जेम्स बाँड न चिडता गुप्तहेर खात्याचा बाहेरचा संपर्क क्रमांक- रीजंट नंबर सांगतो.

तो गेले काही महिने लेनिनग्राडच्या उपचार केंद्रात ट्रीटमेंट घेऊन आलेला असल्याने आणि त्याचा पासपोर्ट फ्रँक वेस्टमॅकॉट, कंपनी डायरेक्टर या नावाने असल्याने, फोनबाबत विचारणा होणे अपेक्षित व स्वाभाविक असते. पण वॉकर ''हे मि. एम ह्या मंत्रालयात तरी या नावाचं कुणी नाही'' असे म्हणतो तेव्हा बाँड म्हणतो, ''सगळं काही सविस्तर सांगू का? ही लाइन खुली आहे याची तुम्हाला जाणीव आहे ना?...''

''एम म्हणजे ॲडमिरल सर माइल्स मेसर्व्ही...'' वगैरे स्पष्ट केल्यावर अधिकाऱ्यांची आपापसात चर्चा होते. ''जेम्स बाँडचा मृत्यू हे गूढच होते– मृतदेह सापडला नव्हता... जपानी बेटावरचे लोक गुप्तता पाळत होते...

जेम्स बाँडला 'कठोर' पोलिसप्रमुख रॉबसनकडे पाठवण्यात येते... आणखी एक चाळणी...

''तुम्हाला मृत म्हणून घोषित केले आहे... टाइम्समध्ये मृत्यूलेख आला होता... तुम्ही फोटोसारखे दिसताय खरे... पण तरीही खात्री पटायला हवी.'' असे रॉबसन म्हणतो.

शेवटी हाच जेम्स बाँड असावा असे मत तो व्यक्त करतो.

या जेम्स बाँडला एका अवघड कामगिरीवर पाठवून खुशाल मरू द्यावे असा काही अधिकाऱ्यांचा डाव असतो.

बाँडला देशद्रोही म्हणून आरोपपत्र देऊन कोर्ट मार्शल करावे असे मत काहीजण व्यक्त करतात.

मधल्या काळातील घटना... विस्मरण... उपचार यांची माहिती जेम्स बाँड 'एम'ला देतो.



''रशियनांनी आपल्याला चांगली वागणूक दिली... युद्धखोरांना नष्ट करावं अशी प्रेरणा दिली... मी इथं येऊन शांततेसाठी लढावं असं मला वाटलं म्हणून मी आलो आहे'' असे जेम्स बाँड म्हणतो आणि एमवरच पिस्तूल रोखतो. त्याबरोबर एक चिलखती काचेचा पडदा वेगाने खाली येतो. त्यावर पिस्तुलातून उडालेल्या अतिविषारी सायनाइड द्रवाचा फवारा आदळतो... सुरक्षाप्रमुख बिल टॅनर जेम्सवर झडप घालतो. त्याला बेशुद्ध करतो... तरीही एम जेम्स बाँडबाबत सहानुभूती दाखवतो. जेम्स बाँडवरचा ब्रेन वॉशचा परिणाम दूर होईल... त्याची पूर्वीच्याच विभागात नेमणूक करतो... माझा सर्वोत्कृष्ट माणूस माझ्यावर सोडण्याची केजीबीची हिंमत असेल तर मीही तो डाव उलटवू शकतो... जेम्स बाँड पुन्हा उत्तम गुप्तहेर व्हायला हरकत नाही...'' आणि एम त्याच्यावर रशियन केजीबी या गुप्तहेर खात्यासाठी भाडोत्री मारेकरी म्हणून काम करणाऱ्या पॅको स्कॅरामांगा याचा बंदोबस्त करण्याची कामगिरी सोपवतो.

**हा स्कॅरामांगा क्युबाचा राजनैतिक पासपोर्ट वापरतो. त्याच्या नावावर कुठल्याही गुन्ह्याची नोंद नसते. तो सोन्याचा मुलामा दिलेले कोल्ट पिस्तूल वापरतो. त्यासाठी सोन्याच्या गोळ्या वापरतो. ब्रिटन-अमेरिकेच्या अनेक हेरांना त्याने मृत्यूमुखी पाठवलेले असते.**

हा स्कॅरामांगा क्युबाचा राजनैतिक पासपोर्ट वापरतो. त्याच्या नावावर कुठल्याही गुन्ह्याची नोंद नसते. तो सोन्याचा मुलामा दिलेले कोल्ट पिस्तूल वापरतो. त्यासाठी सोन्याच्या गोळ्या वापरतो. ब्रिटन-अमेरिकेच्या अनेक हेरांना त्याने मृत्युमुखी पाठवलेले असते. वय ३५. सव्वासहा फूट उंची, तपकिरी डोळे, चेहरा खप्पड... छातीच्या डावीकडे तिसरे स्तनाग्र (प्रचंड लैंगिक सामर्थ्याची खूण), स्त्रीलंपट (कोणालाही ठार करण्याआधी समागम केल्याने नजर सुधारते हा विश्वास).

सर्कशीत काम करीत अमेरिकेत आगमन. संघटित गुन्हेगार टोळीत पूर्णवेळ शूटर म्हणून बढती. हॉटेल व जुगारी अड्ड्यात 'त्रासदायक' लोकांचा निकाल लावण्यात वाकबगार... कॅरिबियन बेटात प्रचंड जमिनी व मळे यावर कब्जा. क्युबाच्या क्रांतीनंतर कॅस्ट्रोचा सहकारी... हा त्याचा पूर्वइतिहास.

जेम्स बाँड स्कॅरामांगाच्या मागावर निघतो.

सहा आठवड्यांच्या पाठलागानंतर तो जमैकामधील किंग्स्टन विमानतळावर येतो. तेथून हॅवानाला जायचे असते... वृत्तपत्रात एका मिळकतीच्या लिलावाची नोटीस वाचून तो क्र. साडेतीन लव्हलेन, सॅव्हाना ला मार या ठिकाणी लिलावाच्या वेळी हजर राहतो. तेथे स्कॅरामांगाची आणि त्याची गाठ पडते. स्कॅरामांगा तेथील

**स्कॅरामांगा तिरस्काराने म्हणतो, ''मी त्याची कशाला फिकीर करतोय? अशा गुप्तहेरांना मी कच्चा खातो. दहा दिवसांपूर्वीच मी त्यांच्या रॉस नावाच्या माणसाचा निकाल लावला. त्याचं प्रेम त्रिनिनादच्या डांबराच्या दलदलीत बुडतंय.''**

हॉटेलमधल्या पिंजऱ्यातून बाहेर पडलेल्या उडणाऱ्या दोन पक्ष्यांना आपल्या सोनेरी पिस्तुलातल्या गोळ्यांनी उडवतो. हॉटेलची मॅनेजर मिस टिफी त्यामुळे संतापते. स्कॅरामांगा तिला शंभर डॉलर्स देतो आणि नवे पक्षी आण म्हणतो.

स्कॅरामांगा जेम्स बॉंडला म्हणतो, ''ग्रीन आयलंड बंदराजवळ आम्ही एक हॉटेल बांधतोय. भागीदारांची बैठक आहे. थंडरबर्ड हॉटेलात ते सर्व उतरणार आहेत... नाच, गाणी, मुली– जय्यत तयारी आहे. नंतर ग्रीन आयलंडला छोट्या ट्रेनने फेरफटका मारायचा आहे... तू त्या सर्व भागीदारांवर लक्ष ठेवायचे. त्याबद्दल मी हजार डॉलर्स देईन... मुक्काम थंडरबर्डमध्येच कर... तो खर्च मी देईन...''

बॉंड तयार होतो. हॉटेलमधल्या त्याच्या रूममध्ये मायक्रोफोन असतो– तो काढून घेतो. इतर खोल्यांतही मायक्रोफोन असणारच हे त्याच्या लक्षात येते.

...आणि स्कॅरामांगाचे भागीदार एकेक करून हॉटेलात दाखल होतात.

मि. हेंड्रिक्स- डच. स्वित्झर्लंडमधून पैसे आणणारा.

सॅम बिनियन- उद्योजक. स्थावर मालमत्ता. दोन कोटी डॉलर्स संपत्ती.

ले रॉय जेंगरेला- मायामी. मनोरंजन उद्योगातले बडे प्रस्थ. रागीट. झटपट फायदा हवा.

रुबी रॉटकाफ- लास व्हेगॉसचा हॉटेल मालक.

हाल गॅर फिंकेल- शिकागो. कामगार संपर्क, संघटित गुन्हेगारी.

लुई पॅराडाइज- फिनिक्स. जुगाराचे अड्डे, कॅसिनो यांचा मालक.

त्या सर्वांच्या आतिथ्याकडे जेम्स बॉंड लक्ष पुरवतो.

मार्क हॅझार्ड. ट्रान्सवर्ल्ड कन्सॉर्टियमचा कर्मचारी– ब्रिटिश गयानाचा राजनैतिक पासपोर्ट-कुरिअर अशी त्याची येथील ओळख असते.

जेम्स बॉंड या सर्वांची बैठक ज्या खोलीत होणार असते तेथे एक मायक्रोफोन लावून ठेवतो. त्यामुळे आत चाललेल्या चर्चेचा तपशील त्याला कळू शकतो.

त्यात त्याला हेंड्रिक्सचे बोलणे ऐकू येते, ''आपल्या चेअरमनसाठी एक महत्त्वाचा निरोप आहे. ब्रिटिश हेरखात्याचा जेम्स बॉंड नामक हेर त्यांच्या मागावर आहे.''

स्कॅरामांगा तिरस्काराने म्हणतो, ''मी त्याची कशाला फिकीर करतोय? अशा गुप्तहेरांना मी कच्चा खातो. दहा दिवसांपूर्वीच मी त्यांच्या रॉस नावाच्या



माणसाचा निकाल लावला. त्याचं प्रेम त्रिनिनादच्या डांबराच्या दलदलीत बुडतंय.''

**स्कॅरामांगो सर्वांना सांगतो, ''ग्रीन आयलंड बंदर... वीस मैलांचा प्रवास... वाटेत उसाचे मळे दिसतील. पक्षी, पाणउंदीर, मगरीसुद्धा बघायला मिळतील. थोडी शिकार करू... ग्रीन आयलंड जेवण घेऊ. अगदी शँपेन, संगीत, मुली, सगळं तयार आहे.**

हॉटेलसाठी एक कोटी डॉलर्स कसे उभे करायचे याची चर्चा बैठकीत होते.

रुबी रॉटकॉफ म्हणतो, ''या प्रकल्पात नुकसान होणार. मी पैसे गुंतवणार नाही.''

स्कॅरामांगा विचारतो, ''हा तुझा अंतिम निर्णय आहे का?... मग तुझं मन वळवावं लागेल.''

आणि बंदुकीतील गोळी सुटते. एक किंकाळी. रॉटकॉफ खुर्चीसकट खाली कोसळतो...

स्कॅरामांगा बाहेर येऊन बॉंडला सांगतो, ''मॅनेजरकडे जा. त्याला सांग– रॉटकॉफ रात्री हॉटेल सोडेल. बाकी मी पाहतो... खोलीत एक फ्यूज जळल्याने स्फोट झालाय. दुरुस्तीला माणूस पाठव असंही मॅनेजरला सांग.''

...बॉंडला मेरी गुडनाइट ही त्याची पूर्वाश्रमीची सहकारी तरुणीही भेटते... ती कमांडर रॉसची सेक्रेटरी म्हणून तेथे काम करीत असते. ती त्याच्यासाठी गाडी, पैसा वगैरे व्यवस्था करते...

बैठकीनंतर ट्रेनचा फेरफटका.

स्कॅरामांगो सर्वांना सांगतो, ''ग्रीन आयलंड बंदर... वीस मैलांचा प्रवास... वाटेत उसाचे मळे दिसतील. पक्षी, पाणउंदीर, मगरीसुद्धा बघायला मिळतील. थोडी शिकार करू... ग्रीन आयलंडला जेवण घेऊ. अगदी शँपेन, संगीत, मुली, सगळं तयार आहे. मग बोटीची सफर. ज्यांना मासेमारीत रस नाही त्यांना पत्ते खेळता येतील. रात्री परत येऊ.''

पण हा प्रवास इतक्या सहजपणे होत नाही.

बॉंडला जाणवते, हा आपला शेवटचा प्रवास असावा अशा रीतीने सारे गुंड त्याच्याकडे बघताहेत. ड्रायव्हरदेखील.

स्कॅरामांगा पिस्तुलाने काही पक्षी उडवतो. एक गोळी बॉंडच्या डोक्याजवळून जाते. ती हेंड्रिक्सच्या पिस्तुलातून सुटलेली आहे हे त्याला दिसते.

थोडं पुढं गेल्यावर रुळावर एक विवस्त्र गुलाबी देह पडलेला दिसतो. डोक्यावर सोनेरी केस.

स्कॅरामांगा म्हणतो, ''समोर एक सरप्राइझ आहे... एक मुलगी रुळावर

"तू धरून पन्नासएक... पण माझ्याकडून तुला कुठलीही गुपितं समजणार नाहीत. मी खटल्याला सामोरा जाईन. माझ्यावर आरोप तरी काय ठेवणार?... तरीही मी तुला दहा लाख डॉलर्स देतो. आपण हे सगळं विसरून जाऊ."

पडलेली आहे. ज्या जेम्स बाँडबद्दल आपण बोलत होतो त्याची ही मैत्रीण आहे म्हणतात. तिला गुडनाइट म्हणायची वेळ आलीय... जेम्स बाँड गाडीत असता तर त्यानं हंबरडा फोडून दयेची भीक मागितली असती.."

...आणि जेम्स बाँड झडप घालून ॲक्सिलेटरचा दांडा खेचतो. गाडीचा वेग कमी होतो. हेंड्रिक्स बाँडवर गोळी झाडतो. बाँडची गोळी त्याच्या डोळ्यामध्ये शिरते.

स्कॅरामांगाही गोळी झाडतो... ड्रायव्हरचा ती मुडदा पाडते. बाँडच्या डाव्या खांद्यात आघात जाणवतो...

रुळावरचा देह इंजिनखाली चिरडला जातो... प्लॅस्टिकचे तुकडे सगळीकडे उडतात... ती एक प्लॅस्टिकची बाहुली असते... जेम्स बाँड धडपडत उभा राहून दांडा ढकलून गाडीचा वेग वाढवतो.

पुलाचा लोखंडी सांगाडा समोर येतो... कोणीतरी रेल्वेतून खाली उडी मारतो.

त्यापाठोपाठ स्कॅरामांगा... आणि नंतर जेम्स बाँड...

बिनड्रायव्हरची गाडी पुढे धावत राहते...

गाडी पुलावर जाते आणि स्फोट होऊन पूल कोसळतो. इंजिन नदीत पडते.

काही वेळाने बाँड झुडपांच्या बाजूने रांगत रांगत पुढे पुलाकडे जातो... भुकेने व तहानेने कासावीस... खांद्याची जखम ठणकत असते.

नदीजवळ त्याला स्कॅरामांगा उताणा पडलेला दिसतो. त्याच्या दिशेने एक मोठा साप सरपटत जाताना दिसतो... स्कॅरामांगा जवळचा चाकू त्या सापाला मारतो. तो सापाच्या फण्यातून आरपार जाऊन जमिनीत रोवला जातो.

स्कॅरामांगा त्या सापाला उचलून चाकूने त्याचे शरीर उभे कापतो; आणि एखाद्या भुकेल्या कुत्र्याप्रमाणे त्याच्या रक्तमांसावर ताव मारू लागतो.

जवळ आलेल्या बाँडला तो विचारतो, "माझ्यातलं थोडं जेवण घेणार का?"

बाँड म्हणतो, "नको. मी शिजवलेला साप खातो. कच्चा नाही. तुझं खाणं चालू दे."

"आतापर्यंत तू किती खून केलेस?" बाँड त्याला विचारतो.

"तू धरून पन्नासएक... पण माझ्याकडून तुला कुठलीही गुपितं समजणार नाहीत. मी खटल्याला सामोरा जाईन. माझ्यावर आरोप तरी काय ठेवणार?...



एका आठवड्याने बाँड शुद्धीवर येतो. आपण हॉस्पिटलमध्ये आहोत हे त्याला दिसते. डॉक्टर म्हणतात, "गोळी त्याच्या पोटाच्या स्नायूत घुसली. पण आतडी आणि किडनी थोडक्यात बचावली. त्या गोळीला सापाचं विष लावलेलं होतं.

तरीही मी तुला दहा लाख डॉलर्स देतो. आपण हे सगळं विसरून जाऊ."

बाँडला आपली शक्ती कमी होत आहे असे जाणवते. स्कॅरामांगाला संपवायलाच हवे– आताच– असे त्याला वाटते. तो कठोरपणे म्हणतो, "मी तुला शक्य तितक्या लवकर संपवतो."

"थांब जरा. मी कॅथॅलिक आहे. शेवटची प्रार्थना म्हणू दे..."

"ठीक आहे. एक मिनिट."

स्कॅरामांगा प्रार्थनेसाठी उजव्या हाताची बोटे चेहऱ्याकडून कानाकडे नेतो... आणि त्याचे सोनेरी पिस्तूल गरजते. बाँड जमिनीवर कोसळतो. स्कॉरामांगा त्याच्यापुढे मांजरीसारखा झेपावतो. चाकू उगारतो.

त्याचवेळी बाँडच्या पिस्तुलातून गोळ्या सुटतात... एक... दोन... पाच...

स्कॉरामांगा कोसळतो.

एका आठवड्याने बाँड शुद्धीवर येतो. आपण हॉस्पिटलमध्ये आहोत हे त्याला दिसते. डॉक्टर म्हणतात, "गोळी त्याच्या पोटाच्या स्नायूत घुसली. पण आतडी आणि किडनी थोडक्यात बचावली. त्या गोळीला सापाचं विष लावलेलं होतं... हा वाचला हा एक चमत्कारच आहे."

जमैकाचे पोलिसखाते जेम्स बाँडच्या संमतीने एक निवेदन जाहीर करते.

"नुकतीच थंडर बर्ड हॉटेलात एक मीटिंग झाली. तिला परदेशातले कुप्रसिद्ध गुंड, रशियन गुप्तचरखात्याचे प्रतिनिधी, माफिया आणि क्युबाचे गुप्त पोलीस हजर होते. जमैकातील ऊस उद्योगाची हानी करणे, बेकायदेशीर अफूचे उत्पादन करणे, जुगाराचे अड्डे सुरू करणे, येथील कायदा सुव्यवस्था बिघडवून जमैकाला बदनाम करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते... या भेटीची कल्पना येथील गुप्त पोलिसांना लागली... पंतप्रधानांना त्याबद्दल माहिती देण्यात आली... अमेरिका-ब्रिटन यांच्याशी संपर्क साधून जेम्स बाँड, निकलसन व लायटर यांनी जमैकाच्या गुप्तहेर खात्याच्या मदतीने माफियांच्या कारवायांचा पर्दाफाश करण्याची योजना आखली... शत्रूचे काही हस्तक मारले गेले. स्फोटकांच्या वापराने पूल कोसळून उरलेले सर्वजण मारले गेले. जेम्स बाँडच्या नेमबाजीमुळे हे शक्य झाले... काही गोळ्या त्यांच्या शरीरात शिरल्या. हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार चालू आहेत. पंतप्रधानांच्या आदेशानुसार हॉस्पिटलमध्ये न्यायालयीन चौकशी घेण्यात आली. कमांडर बाँड, फेलिक्स लायटर आणि न्यायमूर्ती कारगिल उपस्थित होते... कमांडर बाँड व

जेम्स बाँडच्या कादंबऱ्यांना नेहमी आढळणारा मालमसाला याही कादंबरीत आहे. आरंभी जेम्स बाँडची स्वतःची ओळख पटवून देण्याचा जो भाग आहे तो ब्रिटिश हेरखात्यातील कडेकोट सावधगिरीची व सुरक्षाव्यवस्थेची कल्पना देतो.

लायटर यांना उत्कृष्ट सेवेबद्दल जमैकाचे पोलीस पदक देऊन गौरविण्यात येत आहे.'' या अहवालावर सर्वांच्या सह्या घेऊन ते प्रसिद्धीस देण्यात आले.

आणखी आठ दिवसांनी ठणठणीत झालेला जेम्स बाँड मेरी गुडनाइटच्या बरोबर एका छान बंगलीत मुक्कामाला जातो...

जेम्स बाँडच्या कादंबऱ्यांना नेहमी आढळणारा मालमसाला याही कादंबरीत आहे. आरंभी जेम्स बाँडची स्वत:ची ओळख पटवून देण्याचा जो भाग आहे तो ब्रिटिश हेरखात्यातील कडेकोट सावधगिरीची व सुरक्षाव्यवस्थेची कल्पना देतो.

स्कॅरामांगा या सराईत भाडोत्री मारेकऱ्याचे जीवनचरित्रही अफलातून वाटावे असेच आहे. त्याचा पाताळयंत्रीपणा, दुष्टपणा, सावधपणा त्याद्वारे प्रकट होतो. त्याची आणि जेम्स बाँडची भेट होते तो प्रसंग मात्र त्यामानाने नाट्यपूर्ण वाटत नाही. काही आठवडे त्याच्या पाठलागावर असणारा जेम्स बाँड हा हॅवानाला जाताना वाटेत एका हॉटेलमध्ये थांबतो– तोही जमिनीच्या व्यवहाराची एक जाहिरात वाचून– आणि त्याच हॉटेलमध्ये स्कॅरामांगा येऊन थांबतो; एवढेच नव्हे तर जेम्स बाँडला आपल्या बैठकीच्या सुरक्षाव्यवस्थेचे काम देतो– हे आश्चर्यकारक वाटते. ज्या प्रकारच्या गुप्ततेने ही बैठक होणे अपेक्षित असते, तिच्या व्यवस्थेसाठी स्कॅरामांगाकडे त्याच्या विश्वासातील कोणी साथीदार, माणूस नसणे हे पटत नाही... पुढे रेल्वेप्रवासाचे जे वर्णन येते तेही विलक्षण असले तरी त्यातील तपशील त्या प्रवासातले सगळे नाट्य उभे करू शकत नाहीत... काही प्रसंगांची कारणमीमांसाही अधिक विस्तारपूर्वक आली असती तरी त्यामधली संघर्षाची धार अधिक तीव्र झाली असती... इयान फ्लेमिंगने तयार केलेला हा पहिला खर्डा... त्यावर पुन्हा हात फिरवण्याची संधी मिळाली असती तर त्यातील अनेक तपशील अधिक जिवंत आणि मर्मभेदक झाले असते. जेम्स बाँडच्या मिस्किल, उपरोधपूर्ण प्रतिक्रियांचीही धमाल उडाली असती. त्याच्या खाण्यापिण्याची वर्णने अधिक चटकदार आणि तोंडाला पाणी आणणारी झाली असती.

असे असले तरी जेम्स बाँडच्या व्यक्तिरेखेवर आणि पुरुषार्थावर लुब्ध असणाऱ्या वाचकांना ही कादंबरीही निश्चित आवडेल. एकदोन दिवसांच्या अवधीतील घटनांची अचाट मालिका थक्क करीत राहील.

**पृष्ठे:१०४ ● किंमत : ८० रु. ● सभासदांना :५६ रु. ● पोस्टेज :२०रु.**



**नवे कोरे**

**सर्व वयोगटांसाठी**

# योगसाधना आणि ध्यानधारणा

**बिजयालक्ष्मी होता**
**अनुवाद : प्रशांत तळणीकर**




**किंमत : ७०रु.** पोस्टेज : २०रु.

योगसाधना सुयोग्य पद्धतीने आणि सुरुवातीपासून केल्यास सर्व लहानमोठे आजार टाळता येऊ शकतात. या पुस्तकामध्ये

**बाल्यावस्था**

**पौंगडावस्था**

**प्रौढावस्था**

**वृध्दावस्था**

**आणि....गर्भारपण**

या सर्व शारीर अवस्थांमध्ये करण्यायोग्य आसनं, प्राणायाम, ध्यानधारणा आणि योगनिद्रा दिलेल्या आहेत.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**सतराव्या शतकातील सुवर्णाच्या नाण्यांचा प्रचंड खजिना विसाव्या शतकातल्या अमेरिकन गुंडांच्या हाती पडतो**

## लिव्ह अँड लेट डाय

**इयान फ्लेमिंग**

**अनु. अनिल काळे**

'लिव्ह अँड लेट डाय' या कादंबरीत जेम्स बाँडला अमेरिकेत गुप्तपणे विकल्या जाणाऱ्या जुन्या सुवर्णनाण्यांचा पुरवठा कुठून होतो हे शोधण्यासाठी पाचारण केले जाते.

बीओएसीचे स्ट्रॅटोक्रूझर आयडलवाइल्डच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरते; त्यातून उतरलेल्या जेम्स बाँडचे राजेशाही स्वागत होते. ब्रिटिश डिप्लोमॅटिक पासपोर्ट धारण करणाऱ्या जेम्सचे कस्टम व अन्य बाबींचे सोपस्कार झटपट पूर्ण करून पोलिस अधिकारी हॅलोरनद्वारे त्याला भल्यामोठ्या ब्यूकमध्ये बसवले जाते. त्याच्या सूटकेसेसही तिच्यात ठेवल्या जातात.

''यू आर व्हेरी वेल्कम, मिस्टर बाँड.'' म्हणून हॅलोरन लकी सिगारेटचे पाकिट उघडून त्याच्यापुढे धरतो. ''तुमची खास बडदास्त ठेवण्याचा आदेश मला देण्यात आला आहे. हॉटेलवर पोहोचल्यावर तेथील लोकांकडून आपली सर्व व्यवस्था पाहिली जाईल.'' जेम्स बाँडच्या पासपोर्टवर हॅलोरन अमेरिकेच्या व्हिसाच्या पानावर एक शिक्का उमटवतो. एक हजार डॉलर्सचे पाकिट जेम्सला देतो आणि ''हे पैसे खर्च करायला नकार देणे हे अमेरिकाविरोधी कृत्य मानले जाईल'' असा प्रेमळ दमही भरतो.

हॉटेल सेंट रेगीसवर कॅप्टन डेक्स्टर जेम्स बाँडचा चार्ज घेतो... जवळून गेलेली एक शेव्हरोलेट कार, ती सफाईने चालवणारी कृष्णवर्णीय तरुणी आणि मागे बसलेला एक जाडजूड निग्रो इसम– आपल्याकडे बघतोय असे जेम्स बाँडला जाणवते. हा मिस्टर बिग असेल का असा प्रश्नही त्याला पडतो. त्या सुवर्णनाण्यांच्या पुरवठ्यामागे हा मिस्टर बिग आहे अशी माहिती त्याला देण्यात



आलेली असते.

रूम नं. २१०० मध्ये गेल्यावर जेम्सला आणखी एक आश्चर्याचा धक्का बसतो.

त्याचा सीआयएमधला एक जुना सहकारी फेलिक्स लेईटर त्याच्या बेडजवळ फुलांचा गुच्छ ठेवत सीआयएचा सर्व्हिस वुइथ स्माइलची चुणूक दाखवतो.

पॅरिसहून त्याला मुद्दाम जेम्स बाँडबरोबर या मोहिमेत सहभागी होण्यासाठी बोलावण्यात आलेले असते. लेईटर पुढे माहिती देतो, ''या केसमधला अमेरिकेचा भाग एफबीआय बघणार आहे. तू जमैकामधला भाग सीआयएसाठी हाताळायचा आहेस. मी दोन्हींचा समन्वय साधणार आहे.''

**हैतीमध्ये त्याचा जन्म झाला. त्याची आई फ्रेंच होती. बाप निग्रो. त्यामुळे तो पूर्ण निग्रो नाही. मॉस्कोमध्ये त्याचे प्रशिक्षण झाले. मॉस्कोचा हस्तक म्हणूनच त्याला अमेरिकेला पाठवण्यात आले. गुन्हेगारी जगतात आपले एवढे मोठे साम्राज्य उभे करणारा दुसरा निग्रो कोणी नाही.**

...जेम्स बाँडला सिक्रेट सर्व्हिसच्या त्याच्या बॉसने या प्रकरणाची पार्श्वभूमी विशद करताना इ.स. सतराशेपूर्वी पाडलेली अनेक सोन्याची नाणी दाखवलेली असतात. ही नाणी अस्सल असतात आणि ती ब्लडी मॉर्गन या सागरी चाच्याच्या खजिन्यातली असावीत असे ब्रिटिश म्युझियमचे मत असते. ब्लडी मॉर्गनचा हा खजिना जमैकामध्ये आहे; त्यातील एकही नाणे १६५० नंतर पाडलेले नाही... जमैकापासून मेक्सिकोच्या आखातातून फ्लोरिडाकीज बेटातून फ्लोरिडाच्या पश्चिम किनाऱ्यावरील सेंट पीटर्सबर्ग या दरम्यान सिकॅटुर नावाची एक यॅट येजा करते आहे. ती मिस्टर बिगच्या मालकीची आहे. जमैकाजवळचे बेटही त्याच्या मालकीचे आहे. हा निग्रो गँगस्टर आहे. तो न्यूयॉर्कच्या हार्लेम या कृष्णवर्णीय वस्तीत राहतो. हा मिस्टर बिग ब्लडी मॉर्गनच्या खजिन्यातील सुवर्ण नाणी हळूहळू बाजारात आणून विकतो आहे आणि तो पैसा अमेरिकेतल्या रशियन हेरगिरीसाठी पुरवतो आहे असा एमचा कयास असतो. हा मिस्टर बिग निग्रोंमध्ये आदरणीय मानला जातो. तो निग्रो मांत्रिकांच्या ब्लॅक वुडू कल्टचा (Voodoo cult) प्रमुख आहे. निग्रो त्याला प्रत्यक्ष सरदार सामेदी म्हणून दैवत मानतात. ही सोन्याची नाणी निग्रो व्यक्तींच्याच माध्यमातून चलनात येत आहेत...'' मिस्टर बिगबाबत आणखीही अनेक तपशील सिक्रेट सर्व्हिसकडे असतात.

हैतीमध्ये त्याचा जन्म झाला. त्याची आई फ्रेंच होती. बाप निग्रो. त्यामुळे

**तो कुठल्याही गुन्ह्यात पकडला गेलेला नाही... वेश्यागृहांची एक शृंखला तो चालवतो... आपल्या हस्तकांना दरवर्षी २० हजार डॉलर्स मानधन देतो. बेइमानी करणाऱ्यांना ठार मारतो.**

तो पूर्ण निग्रो नाही. मॉस्कोमध्ये त्याचे प्रशिक्षण झाले. मॉस्कोचा हस्तक म्हणूनच त्याला अमेरिकेला पाठवण्यात आले. गुन्हेगारी जगतात आपले एवढे मोठे साम्राज्य उभे करणारा दुसरा निग्रो कोणी नाही. लहानपणापासून अजस्त्र देहयष्टीमुळे त्याला बिग बॉय म्हणत. त्याचे मिस्टर बिग असे पुढे रूपांतर झाले. हैतीमधल्या चर्चच्या रजिस्टरमध्ये त्याचे खरे नाव बोनापार्ट इग्नेस गॅलिया असे नोंदवलेले आहे. त्या नावाच्या आद्याक्षरामुळेही त्याला बिग हे नाव पडले असावे. तो पंचेचाळीस वर्षे वयाचा आहे. मद्यपान, धूम्रपान वगैरे कुठलेही व्यसन त्याला नाही. रतिक्रीडेत मात्र त्याला वैविध्य लागते. लहान वयातच निग्रो मंत्रतंत्र, जादूटोणा यांची शिकवण त्याला मिळाली. गोदीमध्ये ट्रक ड्रायव्हरचे काम करताना तो अमेरिकेत लेग्ज या हिऱ्यांच्या स्मगलिंग करणाऱ्या गँगमध्ये आपले कर्तृत्व दाखवतो. हार्लेममध्ये स्थायिक होतो. तेथे एका नाईट क्लबमध्ये पार्टनरशिप मिळवतो. फ्रेंच भाषेवर त्याचे प्रभुत्व असते. दुसऱ्या महायुद्धात तो अमेरिकेच्या ओएसएस या गुप्तहेर यंत्रणेत सहभागी होतो. फ्रान्समध्ये निग्रो गोदी कामगारांमध्ये सहजपणे मिसळून नौदलाची माहिती देत राहतो. त्याचवेळी रशियन गुप्तहेराशी संबंध आल्याने तो ती माहिती रशियाला देतो... तो कुठल्याही गुन्ह्यात पकडला गेलेला नाही... वेश्यागृहांची एक शृंखला तो चालवतो... आपल्या हस्तकांना दरवर्षी २० हजार डॉलर्स मानधन देतो. बेइमानी करणाऱ्यांना ठार मारतो. मंत्रतंत्रासाठी हार्लेममध्ये तो एक मंदिर बांधून स्वत:बाबत प्रिन्स डार्कनेस- सरदार सामेदीचे जिवंत प्रेत अशी आख्यायिका सर्वत्र पसरवतो. त्यामुळे सर्व निग्रो त्याला घाबरतात...

मिस्टर बिगचा रशियन स्मर्श या गुप्त घातपाती संघटनेशी संबंध असल्याचा निर्विवाद पुरावा जेम्स बाँडला मिळाल्यावर, त्याच्या मागावर जाण्याची खुमखुमी त्याला वाटू लागते.

जेम्स बाँडचे थोडेफार अमेरिकीकरण करण्यात येते. त्याचे केस मिलिटरी पद्धतीने कापले जातात. बोस्टनमधील गॅरंटी ट्रस्टच्या लंडन ऑफिसमध्ये अधिकारी अशी ओळख त्याला देण्यात येते. अमेरिकेत सुटीवर आलोय असे त्यामुळे सर्वांना सांगता येते.



त्याच्या खोलीत एक भेटवस्तूचे खोके येते. त्यातून टिक-टॉक आवाज ऐकू येत राहतो. तेव्हा तो सावध होतो.

पण तेवढ्यात त्या पार्सलचा स्फोट होतो. गन पावडरचा दर्प खोलीत भरून राहतो...

त्याच्या खोलीत लगेच बॉम्बविरोधी पथकाची माणसे येतात...

एक चिठ्ठी दारात सापडते.

...या घड्याळाचे हृदय बंद पडले आहे. तुझ्या हृदयाचे ठोकेही लवकरच बंद पडणार आहेत... मी काउंटडाऊन सुरू केला आहे...'' खाली सही– १ २ ३ ४ ५ ६ ७...''

**...या घड्याळाचे हृदय बंद पडले आहे. तुझ्या हृदयाचे ठोकेही लवकरच बंद पडणार आहेत... मी काउंटडाऊन सुरू केला आहे...'' खाली सही- १ २ ३ ४ ५ ६ ७...''**

जेम्स बाँड जमैका ते पीटर्सबर्ग वाहतूक करणाऱ्या सिर्कटूर बोटीची माहिती मिळवतो. ऑरोब्युरोज या कंपनीच्या व्हार्फला ती लागून उभी राहते. ही कंपनी फिशिंग क्लब्जना मासेमारीसाठी कृमी-कीटक पुरवते. गृहसजावटीसाठी प्रवाळ, शिंपले पुरवते. तिचा मालक पापागोस हा ग्रीक माणूस असतो... न्यूयॉर्कमध्ये आठवड्याला शंभरावर सोन्याची नाणी सापडल्याने जेम्स बाँड लगेच पीटर्सबर्गला जाण्याचा संदेश मिळतो...

बाँड पीटसर्गबर्गला जाण्याआधी हार्लेममधल्या मिस्टर बिगच्या नाइट क्लबला भेट देतो...

भरपूर टिप देऊन एका वेटरला तो सहज विचारतो, ''मिस्टर बिग आज कुठे असतील?''

तो वेटर कुजबुजतो, ''मला बायकापोरं आहेत, बॉस.''

दुसऱ्या रेस्टॉरंटमध्येही वेटरला तो तोच प्रश्न करतो.

''या नावाची कोणी व्यक्ती मला आठवत नाही, सर.'' उत्तर मिळते.

पण शेवटी 'द बोनयार्ड'मध्ये मिस्टर बी असल्याची माहिती मिळवण्यात यश येते.

त्या बारमध्ये जेम्स बाँड आणि लेइटर दोघे रात्री पाऊण वाजता जातात. त्यांना खास टेबल मिळते.

...नृत्याचा कार्यक्रम... अंधार...

आणि ते दोघे बसलेले टेबल लिफ्टप्रमाणे अलगद खाली... खाली जाते...

**बाँड शुद्धीवर आल्यावर मिस्टर बी म्हणतो, ''मी तुला थोडासा त्रास देऊन सोडून देतोय. मी जो काही पेशा पत्करलाय, त्यात आज सर्वोच्च स्थानावर आहे... माझ्या क्षेत्रात तरी मला आता जिंकण्यासारखे काही नाही... मी प्रसिद्धीपासून दूर असतो.**

तळमजल्याच्या खोलीतल्या जमिनीला टेकते. (समोर दोन निग्रो पिस्तूल रोखून उभे).

''तुमच्यापैकी ब्रिटिश कोण आहे?''

बाँडला ते मिस्टर बिगकडे घेऊन जातात.

''तू सिक्रेट सर्व्हिस- ००७ आहेस. होय ना?... तुला अमेरिकेत मलाच मारायला पाठवले आहे का?''

बाँड म्हणतो, ''अमेरिकेत सध्या जुन्या सुवर्ण नाण्यांचा सुळसुळाट झालाय. हार्लेममध्ये ती विकली जातात असे कळले. ती आणून देणारा कोणी ब्रिटिश माणूस असणार. म्हणून अमेरिकन ट्रेझरीच्या माणसाबरोबर इथे आलो आहे.''

''तू म्हणतोस हे खरे आहे का? समोरच्या माणसाच्या मनातले विचार ओळखणारी मिस सॉलिटेअर ही तरुणी माझ्याकडे आहे. तिला मी विचारतो. शारीरिक छळाचा मार्ग फार कटकटीचा आहे... ही मुलगी लोकांच्या मनात दडलेलं सत्य आपोआप ओळखू शकते... मी तिच्याशी लग्न करणार आहे...''

सॉलिटेअर बाँडकडे बघते. बाँडला पुन्हा आपल्या येण्याचे प्रयोजन सांगावे लागते.

ती म्हणते, ''हा माणूस खरे बोलतोय.''

मिस्टर बिग आपल्या असिस्टंटला सांगतो, ''त्या अमेरिकन माणसाला ठार करू नकोस. भरपूर मारहाण करून बेलव्ह्यू हॉस्पिटलजवळ टाकून दे.'' आणि जेम्स बाँडला म्हणतो, ''अमेरिकेत सीआयएला कसलेच अधिकार नाहीत. ते इथे काहीच करू शकत नाहीत.''

टीही या आपल्या दुसऱ्या सहकाऱ्याला तो सांगतो, ''या माणसाची डावी करंगळी मोड...'' टीही बाँडच्या हाताची करंगळी हळूहळू मनगटाकडे वाकवत नेतो. कट आवाज येतो... बाँडची शुद्ध हरपते... सॉलिटेअर डोळे मिटून घेते...

बाँड शुद्धीवर आल्यावर मिस्टर बी म्हणतो, ''मी तुला थोडासा त्रास देऊन सोडून देतोय. मी जो काही पेशा पत्करलाय, त्यात आज सर्वोच्च स्थानावर आहे... माझ्या क्षेत्रात तरी मला आता जिंकण्यासारखे काही नाही... मी प्रसिद्धीपासून दूर असतो. तुला मारलं तर तुझ्याबद्दल चौकशी करायला लोक येतील. मला



**सिर्कटूरची पाहणी करण्यासाठी मध्यरात्रीनंतर बाँड पोहत जातो. शार्क मासे त्याच्यावर हल्ला करतात... पुढे गेल्यावर एक गुहा लागते. गुहेत अनेक टॅक्स... सोन्याची नाणी... ब्लडी मॉर्गनचा खजिना... बाँड टाइमबॉम्ब त्या बोटीच्या तळाला लावतो.**

निष्कारण डोकेदुखी नकोय... तू हा देश सोडून जा. मला दुसऱ्या कामात जास्त रस आहे... पुन्हा मला दिसलास तर नक्कीच मरशील...''

तो आपल्या हस्तकांना म्हणतो, ''याला सेंट्रल पार्कमध्ये त्या कारंजाच्या पाण्यात फेकून द्या.''

टीही बाँडला पायऱ्यांकडे नेतो. बाँड उजवा पंजा लाकडासारखा ताठ करून टीहीच्या मांड्यांमध्ये पूर्ण वेगाने आदळतो. टीही कळवळतो. बाँड गॅरेजमधून बाहेर पडतो. उभ्या गाडीत बसून ती चालू करतो... ती बंद करून एक कॅब घेऊन हॉटेलवर पोहोचतो.

लेइटर त्याच्या खोलीत असतो. ''आपण दोघेही जिवंत आहोत तर-''

पहाटेच्या रेल्वेने पीटर्सबर्गला जाण्याची योजना असते...

तेवढ्यात सॉलिटेअरचा फोन येतो, ''मला इथून पळालंच पाहिजे. अन् तुलाही... मी तुला मदत करीन. तू मला घेऊन चल... माझ्यावर विश्वास ठेव.''

तो तिला सांगतो, ''पेनसिल्व्हानिया स्टेशनवर सहा वीसला ये... सिल्व्हर फँटम गाडीत कार नंबर २४५ मध्ये बस. कंपार्टमेंट एच. मिसेस ब्राइस नाव कंडक्टरला सांग. तेथे माझी वाट पाहा.''

सॉलिटेअरला रेल्वे प्लॅटफॉर्मवर पाहणारा एक निग्रो माणूस तिला ओळखतो. तो लगेच टेलिफोन बूथवर जाऊन फोन करतो...

जेम्स बाँड कंपार्टमेंटमध्ये पोहोचतो तेव्हा एक पोर्टर स्वागत करतो. ''मि. ब्राइस सर... मॅडम आत बसलेल्या आहेत.''

...त्यांचा प्रवास सुरू होतो.

वाटेत सॉलिटेअर आपली सर्व हकीकत सांगते...

पण बाँडवर मध्येच हल्ला होतो. सॉलिटेअरला पळवून नेले जाते.

पुढे पीटर्सबर्गमध्ये जाऊन बाँड तेथील धक्क्यावरच्या ऑरोब्युरोज वर्म अँड बेट कंपनीची माहिती मिळवतो. सिर्कटुर यॉटमध्ये भरण्यात येणाऱ्या टँक्सची पाहणी करतो. वरच्या भागात मासे- खाली सोन्याची नाणी... एका फेरीत अशा शंभर टँकची वाहतूक... हे त्याला कळून चुकते...

... आणि तेथून बाँड जमैकामध्ये विमानाने जातो.

सतराव्या शतकातील दर्यावर्दी लुटारू ब्लडी मार्गन- सर हेन्री मॉर्गन याने युरोपियन जहाजे लुटून जमवलेल्या अफाट संपत्तीचा- सोन्याच्या नाण्यांचा खजिना- ही घटना केंद्रस्थानी ठेवून एका निग्रो गुंडाकडून तो खजिना कसा लुटला जातो याभोवती उभारलेले हे थरारनाट्य

गुप्त खजिना असणाऱ्या शार्क बे बंदराला भेट देतो.

शार्क व बॅराकुडा हे मासे त्या भागात विपुल असतात.

सिर्कटूर बोट तेथे येते...

सिर्कटूरची पाहणी करण्यासाठी मध्यरात्रीनंतर बाँड पोहत जातो. शार्क मासे त्याच्यावर हल्ला करतात... पुढे गेल्यावर एक गुहा लागते. गुहेत अनेक टँक्स... सोन्याची नाणी... ब्लडी मॉर्गनचा खजिना... बाँड टाइमबॉम्ब त्या बोटीच्या तळाला लावतो. सकाळी साडेसहाला स्फोट व्हावा अशी योजना...

पण बाँडवर मिस्टर बीचा हल्ला होतो... बाँडला बांधून ठेवण्यात येते.

मिस्टर बिग सर्व नाण्यांचे टँक्स सिर्कटूरमध्ये भरून झाल्यावर बोट सुरू करतो... आणि बाँडने त्या बोटीच्या तळाशी लावलेल्या टाइमबॉम्बचा स्फोट होतो...

मिस्टर बीच्या चेहऱ्यावर प्राणांतिक वेदना दिसतात...

त्याचा अर्धा डावा हात पाण्यावर येतो... मनगट, पंजा मात्र गायब.

एक शार्क मासा बिगच्या धडावर झडप घालतो.

तेथील बाँडचा मदतनीस होडी घेऊन बाँडकडे येतो.

सिर्कटूरमधील सर्व माणसे स्फोटात गतप्राण होतात.

जेम्स बाँड– सॉलिटेअर यांना 'पॅशनेट लीव्ह' मंजूर केल्याचा फोन एमकडून येतो...

जगण्यात मजा असते. इतर कोणाला मरायचे असले तर मरू द्यावे.

लिव्ह अँड लेट डाय.

सतराव्या शतकातील दर्यावर्दी लुटारू ब्लडी मार्गन– सर हेन्री मॉर्गन याने युरोपियन जहाजे लुटून जमवलेल्या अफाट संपत्तीचा– सोन्याच्या नाण्यांचा खजिना– ही घटना केंद्रस्थानी ठेवून एका निग्रो गुंडाकडून तो खजिना कसा लुटला जातो याभोवती उभारलेले हे थरारनाट्य क्षणोक्षणी वाचकाला आश्चर्याचे, क्रौर्याचे धक्के देत राहते यात शंकाच नाही.

**पृष्ठे :२२४ ● किंमत:१६० रु. ● सभासदांना:११२ रु. ● पोस्टेज:२५रु.**



**नवे कोरे**

## सौंदर्य आणि तारुण्य टिकविण्यासाठी
# योगसाधना

**बिजयालक्ष्मी होता**
**अनुवाद : प्रशांत तळणीकर**




**किंमत : ७०रु.** पोस्टेज : २०रु.

योगसाधना आणि ध्यानधारणा शारीरिक कार्यांना नियमित करतात, उद्दीपित तसंच जीर्ण झालेल्या मज्जातंतूंना अनुक्रमे शांत आणि बळकट करणारा, मन:शांती देणारा, मनोवृत्तीतील सर्व नकारात्मक घटकांचा निचरा करतात आणि एक चांगली व्यक्ती म्हणून आपली उन्नती करतात, या गोष्टी आवश्यक आहेत अशा प्रकारचे घटक मिळवण्यासाठी योगिक, वैदिक, आयुर्वेदिक आणि पारंपारिक पद्धती या पुस्तकामध्ये सांगितलेल्या आहेत.

विजयालक्ष्मी होता या एक नामांकित योगचिकित्सक असून गेली पंचवीस वर्षे या क्षेत्रात काम करत आहेत. अस्थमा, सांधेदुखी, पाठदुखी इ. पासून ते विविध प्रकारच्या गाठी (ट्यूमर) आणि कर्करोगापासून अनेक आजारांवर त्यांनी यशस्वी उपचार केले आहेत.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## जपानमधल्या कुप्रसिद्ध मृत्यूचा बगीचा आणि बॉंडने केलेला विध्वंस

# यू ओन्ली लिव्ह ट्वाइस

**इयान फ्लेमिंग**
**अनु. जयवंत चुनेकर**

'यू ओन्ली लिव्ह ट्वाइस' या कादंबरीत इयान फ्लेमिंगने जपानच्या पार्श्वभूमीवरील कथावस्तू उभी केली आहे. जपानी जीवनशैली, मूल्यप्रणाली आणि संस्कृती यांचे एक अंतर्वेधक दर्शन या कादंबरीमुळे घडते.

या कादंबरीत जेम्स बॉंडचा सामना पुन्हा एकदा अर्न्स्ट स्टॉवरो ब्लोफेल्ड या खलपुरुषाशी होतो. 'थंडरबॉल'मध्ये त्याच्याशी बॉंडची पहिली चकमक होते. दोन अण्वस्त्रधारी विमानांचे अपहरण करण्यात ब्लोफेल्डचा हात असतो. 'ऑन हर मॅजेस्टिज् सिक्रेट सर्व्हिस'मध्ये बॉंडच्या नवपरिणीत पत्नीचा लग्नानंतर काही तासातच मृत्यू होतो आणि तो मृत्यू ब्लोफेल्डने घडवून आणलेला असल्याने बॉंडला त्याच्याबद्दल चीड असते.

जपानमधील एका विशिष्ट मोहिमेसाठी कमांडर जेम्स बॉंडला मुद्दाम पाठवण्याचे त्याचा बॉस ठरवतो. त्यावेळी जेम्स बॉंड मनाने खचलेला असतो, त्याच्या हातून काही अपघात घडलेले असतात, त्याला मज्जातंतू विकार असल्याचे निदान डॉक्टरांनी केलेले असते. परंतु त्याच्यावर उपचार करणारे डॉ. सर जेम्स मलोनी बॉंडच्या बॉसला, एमला सांगतात, ''त्याला एखादी वरवर अशक्य वाटणारी, त्याच्या बुद्धिकौशल्याला आव्हान देणारी कामगिरी सोपवा. त्यामुळे आपल्या वैयक्तिक दुःखाचा विसर त्याला पडेल...''

एम त्या सूचनेचा विचार करतात; आणि सुदैवाने योगायोगाने तशी एक कामगिरी त्यांना सापडते. जेम्स बॉंडला अखेरची संधी द्यायची असे ते ठरवतात.

जेम्स बॉंडला ते या कामगिरीची कल्पना देतात.

''हे बघ, तुला मी बोलावलेय ते तुला बढती दिलीय हे सांगण्यासाठी आणि एक महत्त्वाची जबाबदारी तुझ्यावर सोपवण्यासाठी!... मी तुला राजनैतिक



विभागात बढती देत आहे... तुझ्या पगारातही वाढ देत आहे... तुला एका आठवड्याच्या आत जपानला जायचे आहे... हे काम अगदी अशक्य आहे म्हणून मी तुला पाठवतो आहे. या खेपेस शस्त्रबळ वापरता येणार नाही. पिस्तुल वापरता येणार नाही. फक्त तुझा शहाणपणा, चातुर्य वापर... सोविएत युनियनबद्दल काही माहिती मिळवायची आहे... त्यासाठी तुला क्रिप्टोग्राफीचे, गुप्त लिपीतील संदेश वाचण्याचे ज्ञानही वापरावे लागेल... जपानी तज्ज्ञ तुला मदत करतील. जपानी हेरखात्याचा प्रमुख टायगर तानाका तुला भेटेल. हा टायगर तानाका कामाझाकी म्हणजे आत्मघातकी विमान चालक म्हणून दुसऱ्या महायुद्धात काम करीत होता. तो ऑक्सफर्डला शिकलेला आहे... त्याच्याकडून तुला माहिती मिळवायची आहे... १९५० पासून जपानमध्ये आपले केंद्र नाही. तेव्हा ऑस्ट्रेलियनांच्या हाताखाली तुला काम करायचे आहे.''

**हेंडरसन जपानी जीवनशैलीबद्दलची आपली निरीक्षणे त्याला हॉटेल ओकुराच्या वाटेवर असताना सांगते, ''हे येडपट जपानी लोक प्रत्येक गोष्ट जगाच्या उलटी करतात. प्रार्थनापुस्तकं उलटी वाचतात, दिव्यांची बटनं खाली दाबायच्या ऐवजी वर दाबतात.**

या कामाबद्दल आणखी तपशील गुप्तहेर खात्यातला त्याचा मित्र बिल टॅनर त्याला देतो.

''तुला ऑस्ट्रेलियाचा पासपोर्ट मिळेल. टोकियोमध्ये रिचर्ड हेंडरसन या ऑस्ट्रेलियन परराष्ट्र खात्यातील अधिकाऱ्याच्या हाताखाली तुला काम करायचे आहे. तुला राजनैतिक दर्जा मिळेल. काही माहिती मिळाली तर हेंडरसन मेलबर्नमार्गे ती आमच्याकडे पाठवील.''

टोकियो विमानतळावर जेम्स बॉंडला हेंडरसन भेटतो. प्रचंड देह. डुकराच्या मांडीच्या एखाद्या तुकड्यासारखा दिसणारा दांडगा हात. चेहऱ्यावर उंचवटे. कठोर, निळसर डोळे. खडबडीत नाक.

हेंडरसन जपानी जीवनशैलीबद्दलची आपली निरीक्षणे त्याला हॉटेल ओकुराच्या वाटेवर असताना सांगतो, ''हे येडपट जपानी लोक प्रत्येक गोष्ट जगाच्या उलटी करतात. प्रार्थनापुस्तकं उलटी वाचतात, दिव्यांची बटनं खाली दाबायच्या ऐवजी वर दाबतात. नळ डाव्या बाजूला फिरवतात. दरवाजाचं हॅंडलही.

रेसकोर्सवर रेसचे घोडे घड्याळाच्या काट्यांच्या दिशेनं पळवतात... टोकियोमध्ये भयंकर उकडतं तरी किंवा भयंकर थंडी तरी असते. पाऊसही मुसळधार कोसळतो. भूकंप रोजच होत असतात... इथली पहिली दहा वर्षं फार खराब जातात...

''हा टायगर तानाका कशा प्रकारचा इसम आहे? तुझा शत्रू आहे का मित्र?''
''दोन्हीही. कदाचित मित्र जास्त. मद्य आणि मदिराक्षी यांचा आनंद आम्ही दोघेही घेतो. तो जबरदस्त रतियोद्धा आहे. तो मैत्रीचे बंधन मानतो.

इथली भाषा माहिती हवी. खाली झुकायचं कधी आणि बूट काढायचं कधी याचंही शास्त्र आहे... पाश्चिमात्य पद्धतीनं इथं राहणं फार खर्चिक ठरतं.''

आपल्या कारचा पाठलाग होतोय हे त्याच्या लक्षात येते. हेंडरसन जेम्सला सांगतो, ''हा टायगरचा उद्योग. हॉटेलच्या खोलीत काळजी घे... एखादी पोरगी पाळतीवर असेल– तिच्याशी नम्रपणे बोल... मग ती झुकून अभिवादन करीत बाहेर जाईल.''

हेंडरसन टायगरबद्दलही माहिती देतो, ''उद्या सकाळी त्याला भेटायचं आहे. ब्युरो ऑफ ऑल एशियन फोकवेज् या संस्थेच्या कार्यालयात... तू इथे कशासाठी आला आहेस हे मला ठाऊक नाही. ते मला माहीत करून घ्यायचेही नाही. तुला टायगरकडून सीआयएला खबर लागू न देता काही संवेदनाक्षम माहिती काढून घ्यायची आहे. हे काम धोकादायक आहे. टायगर पक्का आतल्या गाठीचा आहे. जपानी माणसं तुझ्याकडे दोन दृष्टींनी बघतील. एक– तुझ्या भेटीचा उपयोग लगेच काय होणार? दोन– दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून तुझे महत्त्व आहे का? जपानी माणसे दिवस-महिने मोजत नाहीत. शतकाच्या भाषेत विचार करतात...''

''हा टायगर तानाका कशा प्रकारचा इसम आहे? तुझा शत्रू आहे का मित्र?''

''दोन्हीही. कदाचित मित्र जास्त. मद्य आणि मदिराक्षी यांचा आनंद आम्ही दोघेही घेतो. तो जबरदस्त रतियोद्धा आहे. तो मैत्रीचे बंधन मानतो. तुला लगेच भेटायची वेळ देऊन त्याने माझ्या मैत्रीची काही अंशी परतफेड केली आहे. प्रत्येक जपानी माणसाच्या आड सामुरी– योद्धा दडलेला असतो.''

'द ब्युरो ऑफ ऑल एशियन फोकवेज्' या संस्थेत अनेक सुरक्षा तपासण्या झाल्यावर बाँड आणि टायगर तानाका यांची भेट होते.

टायगर तानाका त्याला 'मॅजिक ४४' या ट्रेड मार्कच्या उपकरणाची माहिती देतो. रशियाचा एक गुप्त खलिता तो दाखवतो. ''दोनशे मेगॅटनचे अस्त्र आपल्या ताब्यात आहे. २० सप्टेंबर रोजी त्याची चाचणी घेतली जाईल... किरणोत्सर्गी कण पॅसिफिक-अलास्का प्रदेशात फैलावल्याने लोकक्षोभाची शक्यता आहे... आंतरखंडीय गुरुत्वाकर्षण बलप्रेरक क्षेपणास्त्राच्या मदतीने लंडनवर एक अस्त्र



सोडण्यात येईल... दुसरे अस्त्र ब्रिटन व आयर्लंड यांचा विनाश घडवील... अमेरिकेने तेथील आपला लष्करी तळ व संहारक अस्त्रे हटविण्याचे उद्दिष्ट... अँग्लो-अमेरिकन दोस्ती संपुष्टात आणणे... दहशतवाद पसरवणे– शत्रूची दिशाभूल करण्यासाठी काही क्लृप्त्या योजणे... सर्व प्रकरणे गुप्ततेने हाताळणे...''

जपानमध्ये हाराकिरीला कायदेशीर मान्यता आहे. तसेच डॉ. शॅटरहँड याने अधिकृतपणे शासकीय मान्यतेने हे उद्यान उभारलेले आहे. त्यामुळे जपानसरकार त्याबाबत काही कारवाई करण्याचे टाळत आहे.

ही माहिती त्वरेने मेलबर्नला पोहोचवून तेथून लंडनला पाठवण्याची व्यवस्था हेंडरसनने करायची असते.

...टायगर आणि जेम्स बाँड यांची चांगलीच गट्टी जमते.

मॅजिक ४४ ची माहिती देण्याच्या मोबदल्यात टायगर जेम्स बाँडवर एक कामगिरी सोपवतो. ती म्हणजे मृत्यूचा बगीचा चालवणाऱ्या एका कुशाग्र बुद्धीच्या शास्त्रज्ञाचा बंदोबस्त करणे... हा शास्त्रज्ञ म्हणजे डॉ. गुनत्राम शॅटरहँड. त्याची पत्नी फ्राऊ एमी... स्वीस पासपोर्टवर हे दोघे जपानमध्ये कायदेशीर मार्गाने आलेले असतात. सहा महिन्यांच्या अवधीत त्यांच्या संशोधन केंद्रात पाचशेवर जपानी माणसांच्या आत्महत्या झालेल्या असतात... एक कोटी पौंड खर्च करून डॉ. शॅटरहँड दांपत्याने जगातील दुर्मिळ वृक्षांची आयात करून एक बोटॅनिकल गार्डन उभारलेले असते... जपान सरकारची रीतसर परवानगी घेतलेली असते... जपानमधील क्यूशू या दक्षिणेकडील बेटावरच्या किनारपट्टीवरचा एक भग्नावस्थेतील किल्ला विकत घेऊन, तेथील ५०० एकरांत त्याने दुर्मिळ झाडाझुडपांची लागवड केलेली असते. त्याच्या या उद्यानात अनेक विषारी वनस्पतीही आहेत. शिवाय गंधकयुक्त वायू फेकणाऱ्या भेगा आहेत... त्याचे वीस कर्मचारी आहेत... या उद्यानाला भेट देणाऱ्या सुमारे पाचशे व्यक्तींनी येथे येऊन हाराकिरी (आत्महत्या) केल्या... मृत्यूचा बगीचा असे त्यामुळे या दुर्गाला नाव मिळाले आहे.

जपानमध्ये हाराकिरीला कायदेशीर मान्यता आहे. तसेच डॉ. शॅटरहँड याने अधिकृतपणे शासकीय मान्यतेने हे उद्यान उभारलेले आहे. त्यामुळे जपानसरकार त्याबाबत काही कारवाई करण्याचे टाळत आहे. विषारी वनस्पती, विषारी माशांनी भरलेले तलाव, साप, विंचू आणि विषारी कोळी यांमुळे हे उद्यान आत्महत्या करणाऱ्यांना सोयीचे वाटते.

तेथील कर्मचारी गुडघ्यापर्यंत रबरी बूट घालतात. तोंडावर मास्क चढवतात.

जेम्स बाँड म्हणतो,
''माझ्या वैयक्तिक जबाबदारीवर मी काहीही करीन.''
''ही बाब राष्ट्रीय गुपित राहील. तुझ्याशिवाय पंतप्रधान आणि मी- दोघांनाच ते ठाऊक असेल.'' असे आश्वासन तानाका देतो...

जंतुसंसर्ग टाळतात. तेथील तलावात नाटेरिरी हे हिंस्र मासे असून एका तासात संपूर्ण घोडा फस्त करण्याएवढी त्यांची क्षमता असते.

...डॉ. शॅटरहँडचा संबंध ब्लॅक ड्रॅगन या संघटनेशी असून, त्याच संघटनेच्या सदस्यांतून त्याने कर्मचारीवर्ग निवडलेला होता असेही टायगर तानाका उघड करतो. फॅसिस्ट गटाचा नेता फुकुआको आणि अराजक माजवणारा हिरोता– हे दोघे ब्लॅक ड्रॅगनचे नेते संघटित गुन्हेगारी टोळ्या चालवत असतात. शॅटरहँडला त्यांनी संरक्षण दिलेले असावे.

ही सर्व माहिती देऊन या शॅटरहँडचा बंदोबस्त जेम्स बाँडने करावा अशी टायगर तानाका मागणी करतो.

डॉक्टर शॅटरहँडच्या या उद्यानाला अनेक तपासणी पथकांनी भेट दिली. परंतु त्यांना आक्षेपार्ह वा बेकायदेशीर असे काही आढळले नाही असेही तानाका स्पष्ट करतो... आपण पाठवलेल्या विश्वासू सहकाऱ्याचे प्रेतच बघायला मिळाले त्यामुळे हे काम बाँडकडे सोपवण्याचे त्याने ठरवले असेही सांगण्यात येते.

जेम्स बाँड म्हणतो, ''माझ्या वैयक्तिक जबाबदारीवर मी काहीही करीन.''

''ही बाब राष्ट्रीय गुपित राहील. तुझ्याशिवाय पंतप्रधान आणि मी– दोघांनाच ते ठाऊक असेल.'' असे आश्वासन तानाका देतो...

'ब्रिटिशांबद्दल जपानचे मत वाईट आहे... सुएझ प्रश्नाच्या वेळी ब्रिटिशांचे वर्तन नामर्दपणाचे होते. त्यामुळे तुझ्याकडे हे काम सोपवताना पंतप्रधान साशंक आहेत...'' तानाकाचा आणखी एक तडाखा.

''राजकारणी काय करतात, कसे वागतात हे जाऊ दे... ब्रिटिश लोकांमध्ये काही बिघाड झालेला नाही...'' असे बाँड चिडून म्हणतो.

''ठीक तर... तू मृत्युदुर्गात प्रवेश करून त्यातील ड्रॅगनला ठार मारायचे आहेस.'' टायगर तानाका त्याला पुन्हा बजावतो...

कादंबरीचा उर्वरित भाग जेम्स बाँडने या अभेद्य मृत्युदुर्गात प्रवेश करण्यासाठी केलेली व्यूहरचना; त्यात प्रत्यक्ष शिरकाव करून घेताना विषारी माशांशी केलेला सामना, डॉ. शटरहँडला भेटून दूर केलेला त्याचा मुखवटा, ''तू तर ब्लोफेल्ड'' म्हणून उघड केलेले त्याचे सत्यस्वरूप आणि शेवटी त्याच्यावर केलेली मात



या तपशीलाने व्यापला आहे.

दुर्गात प्रवेश करण्यासाठी जपानी आदिवासी कोळ्यांच्या पुरोहिताची आणि त्याच्या तरुण मुलीची झालेली मदत कथानकाला थोडाफार रोमँटिक टच देते.

ब्लोफेल्डशी झालेल्या झटापटीत जेम्स बाँडच्या डोक्याला इजा होते. त्याची स्मृती जाते... त्याची शुश्रुषा करण्याचे काम किसी सुझुकी करते... ती म्हणते, ''माझं त्याच्यावर प्रेम आहे. मी त्याला ठेवून घेणार आहे. त्याची काळजी घेणार आहे... त्याला भूतकाळातलं काही आठवत नाही... ते तसंच राहावं... म्हणजे आम्हाला लग्न करता येईल. तो कायमचा इथं राहील.''

''जेम्स बाँडवर सोपवलेली अखेरची कामगिरी राष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाची होती. तो परत येणार नाही हे खरे, पण ही कामगिरी शंभर टक्के यशस्वी झाली आहे... या एकट्या माणसाच्या शौर्यामुळे देशाच्या सुरक्षितेला मोठी बळकटी आलेली आहे...''

'लंडन टाइम्स'मध्ये जेम्स बाँडवर मृत्यूलेख छापून येतो. तो एमने लिहिलेला असतो. ''जेम्स बाँडवर सोपवलेली अखेरची कामगिरी राष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाची होती. तो परत येणार नाही हे खरे, पण ही कामगिरी शंभर टक्के यशस्वी झाली आहे... या एकट्या माणसाच्या शौर्यामुळे देशाच्या सुरक्षितेला मोठी बळकटी आलेली आहे...''

**पृष्ठे : २२५ ● किंमतः १६० रु. ● सभासदांना : ११२ रु. ● पोस्टेज : २५रु.**

एका बिनधास्त बाबूच्या आठवणी

# न जलसा, न जल्लोष

जे. बी. डिसूझा अनुवाद - एस्. ए. वीरकर

स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे झाली तरी महासत्ता होण्याकडे वाटचाल करणारी अपेक्षित इच्छाशक्ती आपण दाखवू शकत नाही. मूलभूत गरजांपासून अनेक प्रश्न अद्यापही सुटणे बाकी आहे. लेखकाने या पुस्तकाद्वारे प्रत्यक्ष पुराव्यांसह जळजळीत वास्तव वाचकांसमोर ठेवले आहे.

**किंमत १५०रु.** पोस्टेज २५रु.

नवे कोरे

## पाठदुखी घालविण्यासाठी
# योगसाधना




**बिजयालक्ष्मी होता**
**अनुवाद : प्रशांत तळणीकर**

**किंमत : ७०रु.** पोस्टेज : २०रु.

पाठदुखीचे रुग्ण सातत्यानं जी वेदनाशामक औषधं घेत असतात, त्यांचे परिणाम शरीरावर होत असतातच. पचनसंस्था बिघडवून टाकतात आणि दुसरं म्हणजे त्यांच्यामुळे शरीरातील विषारी तत्त्वं वाढतात. ही औषधं शरीराला त्यांच्या अधीन करतात. शरीराची विषावस्था हळूहळू वाढतच जाते आणि त्यामुळे अनेक गंभीर आजारांना आमंत्रण मिळतं. पाठदुखीमुळे रुग्ण काही विशिष्ट आसनं करू शकत नसल्यामुळे, ती आसनं ज्या आजारांवरचा इलाज असतात, ते आजार उपचारांविना राहतात. याचा अर्थ, अशा गंभीर आजारांच्या रुग्णांना योगोपचार घेणं अशक्य होऊन बसतं. काही वेळा तर योगसाधनेचा जादूसारखा परिणाम होतो.

या पुस्तकामध्ये बायकांना मानेच्या मणक्यांना सूज येणं. स्लिप डिस्क, सायटिका प्रोलॅप्स, आतड्यांमधील वायुदोष आणि स्कोलिओसिस यांसारख्या विविध प्रकारच्या पाठीच्या दुखण्यासंबंधी आणि त्यावरील साध्या, सोप्या पण तरीही परिणामकारक योगिक आणि नैसर्गिक उपायांची माहिती मिळेल.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# पुरस्कार

## * डॉ. निर्मलकुमार फडकुले पुरस्कार

संत साहित्याचे अभ्यासक व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. निर्मलकुमार फडकुले हे वक्तृत्व आणि चिंतन यासाठी प्रसिद्ध होते, असे मत विधानपरिषदेचे माजी सभापती प्रा. ना. स. फरांदे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभेतर्फे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी व साहित्यिक डॉ. यशवंत पाठक यांना प्रा. फरांदे यांच्या हस्ते डॉ. निर्मलकुमार फडकुले स्मृती पारितोषिक प्रदान करण्यात आले.

प्रा. जोशी यांना रोख एक हजार रुपये व स्मृतिचिन्ह आणि डॉ. पाठक यांना दोन हजार एक रुपये आणि स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.

प्रा. फरांदे म्हणाले, डॉ. फडकुले यांचे साहित्य जीवन व विचार मूल्याधिष्ठित होते. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत मूल्यांची जपणूक करण्याची गरज आहे. ते साहित्य, वक्तृत्व, चिंतन, संतसाहित्य व जीवनातील तत्त्वांचे एक मुक्त विद्यापीठ होते. डॉ. फडकुले सरांनी विद्यार्थी घडविले. एकरूपता, कृती, उत्तम विचार, उच्चार, चांगली संगती हे प्रत्येकाच्या जीवनाचे सूत्र हवे, अशी त्यांची धारणा होती.

## * वसंत सोमण पुरस्कार

वसंत सोमण हे मराठी रंगभूमीवरचं हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व. प्रायोगिक नाटक, बालनाट्य आणि व्यावसायिक रंगभूमीवर त्यांनी मोजक्याच, पण संस्मरणीय भूमिका केल्या. त्यांचे आकस्मिक निधन झाल्यानंतर त्यांच्या मित्रांनी वसंत सोमण मित्र मंडळातर्फे दरवर्षी झगमगाटापासून दूर राहून महत्त्वाचे काम करणाऱ्या रंगकर्मींना 'वसंत सोमण पुरस्कार' देऊन गौरविण्याची प्रथा सुरू केली. या वर्षी या पुरस्कारासाठी जालन्याचे तरुण रंगकर्मी राजकुमार तांगडे यांची निवड करण्यात आली आहे.

राजकुमार तांगडे हे लेखक, दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते म्हणून रंगभूमीवर वावरत आहेत. ग्रामीण संवेदनशीलतेचा आणि शेतकऱ्यांच्या समस्यांना नाट्यमाध्यमातून वाचा फोडणारा लेखक अशी त्यांची ओळख करून देता येईल. त्यांची 'आकडा' ही ग्रामीण भागातील वीजटंचाईचा वेध घेणारी एकांकिका बहुचर्चित ठरली आहे. त्यांच्या साहित्यकृतीवर नंदू माधव यांनी 'श्वेतअंगार' हा लघुपट बनवला आहे.

## * विद्या व्यास पुरस्कार

विद्या सहकारी बँकेतर्फे दिला जाणारा यंदाचा 'विद्या व्यास पुरस्कार' ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर आणि पत्रकार शिवाजी राऊत यांना जाहीर करण्यात आला आहे.

विविध क्षेत्रांमध्ये गुरुतुल्य काम करून समाजाच्या उन्नतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या, गुरूसमान मार्गदर्शक ठरणाऱ्या ज्येष्ठ शिक्षकास त्याच्या आजपर्यंतच्या कार्याची पावती म्हणून हा पुरस्कार देण्यात येतो. रोख ३० हजार रुपये, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. शिक्षणक्षेत्रात अशाच प्रकारची दिशादर्शक कामगिरी बजावणाऱ्या तरुण शिक्षकासही प्रोत्साहनात्मक असा पुरस्कार दिला जातो. रोख २० हजार, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे.

बँकेच्या रौप्यमहोत्सवी वर्षापासून (१९९८) हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. पुरस्काराचे हे दहावे वर्ष आहे.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू, डॉ. विक्रम साराभाई अवकाश संशोधन केंद्राचे माजी संचालक, देशाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव, पंतप्रधानांचे विज्ञानविषयक सल्लागार अशा विविध महत्त्वाच्या पदांवर डॉ. गोवारीकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सध्या ते इस्रोचे प्राध्यापक असून राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन या संस्थेचे अध्यक्ष आहेत. देशाला मार्गदर्शक ठरणाऱ्या त्यांच्या या अद्वितीय कार्यासाठीच त्यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे.

तरुण मार्गदर्शक शिक्षकाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेले श्री. शिवाजी राऊत हे सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर गावचे रहिवासी असून पुणे जिल्ह्यातील पहिली साखर शाळा त्यांनी सुरू केली होती. माध्यमिक शिक्षक म्हणून काम करतानाच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देण्याचे कामही त्यांनी केले आहे. पत्रकारितेचा वापर समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी करण्याच्या उद्देशाने त्यांनी शिक्षकी पेशाबरोबरच मुक्त पत्रकारिता केली. माहितीच्या अधिकाराचा कार्यक्षमरीत्या वापर करून राज्याच्या वेगवेगळ्या योजनांमध्ये झालेला भ्रष्टाचार त्यांनी बाहेर काढला. त्यांच्या या कार्यासाठीच त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

## * पुण्यभूषण पुरस्कार

त्रिदल संस्थेचा पुण्यभूषण पुरस्कार डॉ. लागू यांना डॉ. गिरीश कर्नाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुण्याची भूमी सोन्याच्या फाळाने नांगरणाऱ्या बालशिवाजीची प्रतिकृती, एक लाख रुपये आणि पुणेरी पगडी असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

मराठी रंगभूमीचा १८४३ पासूनचा इतिहास लक्षात घेतला तर काही ठराविक वर्षांनी रंगभूमीला अनेकदा मंदीचा फटका बसला आहे. त्यामुळेच भविष्याची फुका चिंता करण्याची गरज नसून सध्याच्या तरुण पिढीची विलक्षण बुद्धिमत्ता आणि कल्पनाशक्ती वापरण्याची ताकद पाहता आपले भविष्य उज्ज्वल आहे, यात मला शंका नाही, असे मत ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केले.

'कलाकार हा वाद्यही असतो आणि वादकही. वाद्य जेवढे उत्तम असावे लागते तेवढ्याच ताकदीचा वादकही असणे आवश्यक असते. त्यामुळेच कलाकाराने या दोन्ही भूमिकांचा मेळ घालून अभिनय केला पाहिजे. हा ज्येष्ठ कलाकार शंभू मित्रांनी मला दिलेला मंत्र मी आयुष्यभर अंगी बाणवला. अभिनयाची तंत्रे शिताफीने वापरून कलाकाराला भूमिका जिवंत करता आली पाहिजे. त्यासाठी भूमिका जगण्याची आवश्यकता असतेच असे नाही, असे ते म्हणाले.

माझ्यावर लहानपणापासूनच निरीश्वरवादाचे संस्कार झाले. स्टीफन हॉकिंगच्या परखड मतांमुळे मी अधिकच प्रभावित झालो. त्यामुळेच त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळाली तेव्हा मी त्यांच्या पाया पडलो, असे डॉ. लागू यांनी सांगितले.

हिंदी चित्रपटांमध्ये काम करणे म्हणजे माझ्यासारख्या अभिनेत्यासाठी आत्महत्या करण्यासारखेच होते. त्या रंगभूमीवर माझा श्वास कोंडत होता. हिंदी चित्रपटसृष्टीने मला पोतेऱ्यासारखे वापरले, असा आरोप करीत पोटासाठी ती कामे केली असे डॉ. लागू यांनी सांगितले.

## * मॅगसेसे पुरस्कार

पत्रकारिता, साहित्य या क्षेत्रांमध्ये अतुलनीय कामगिरी केल्याबद्दल प्रख्यात पत्रकार पी. साईनाथ यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झाला आहे. रॅमन मॅगसेसे पुरस्कारांसाठी यंदाच्या वर्षी विविध देशांतील सात मान्यवरांची निवड झाली असून त्यामध्ये पी. साईनाथ यांचा समावेश आहे. मॅगसेसे पुरस्काराला आशिया खंडामध्ये नोबेल पुरस्कारासारखा मान दिला जातो.

महाराष्ट्र, आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या तसेच अन्य सामाजिक प्रश्नांवर पी. साईनाथ यांनी अत्यंत परखडपणे व संशोधनपर वृत्तीने लिखाण केले आहे. पी. साईनाथ यांचा जन्म चेन्नई येथे १९५७ साली झाला. इतिहास विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या पी. साईनाथ यांनी पत्रकारिता हे आपले कार्यक्षेत्र म्हणून निवडले. १९९७ साली त्यांनी लिहिलेले 'एव्हरीबडी लव्हज ए गुड ड्रॉट' हे पुस्तक खूप लोकप्रिय ठरले. भारतातील बदलती अर्थव्यवस्था, त्यामुळे ग्रामीण व शहरी भागावर होणारे परिणाम, पर्यावरणविषयक प्रश्न अशा विषयांवर पी. साईनाथ यांनी लिहिले आहे.

## * पत्रकारिता सर्वोत्कृष्ट पुरस्कार

सनसनाटी बातम्या काही काळासाठी चर्चिल्या जात असल्या तरी पत्रकारितेमध्ये

सनसनाटीपणाला अजिबात स्थान नाही. अशा बातम्या म्हणजे पत्रकारितेच्या पावित्र्याचा भंग करणे होय, असे नि:संदिग्ध प्रतिपादन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी केले.

पत्रकारितेतील सर्वोत्कृष्ट कामगिरीचा मानदंड समजल्या जाणाऱ्या 'रामनाथ गोएंका एक्सलन्स फॉर जर्नालिझम' पुरस्कारांचे १६ जुलै रोजी दिल्लीत एका शानदार सोहळ्यात वितरण करण्यात आले.

'जर्नालिस्ट ऑफ द इयर' या सर्वोच्च पुरस्कारासाठी 'द इंडियन एक्सप्रेस'च्या रितू सरीन यांची (वृत्तपत्र) आणि सीएनएन- आयबीएन'चे राजदीप सरदेसाई यांची (वृत्तवाहिन्या) निवड करण्यात आली. प्रत्येकी अडीच लाख रुपये व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. कलामांनी आदर्श पत्रकारितेची व्याख्या स्पष्ट केली. 'पत्रकार : राष्ट्रीय विकासातील भागीदार- हे शक्य आहे काय?' या विषयावरील आपल्या भाषणात, विशेषत: सनसनाटी बातम्या देण्यास त्यांनी कडाडून विरोध केला. अशा बातम्या काही थोड्या काळासाठी वाचल्या जातात. परंतु तो पत्रकारितेचा पावित्र्यभंग आहे. खरी पत्रकारिता ही धाडसी, सत्यान्वेषी, प्रेरणादायी असते, असे ते म्हणाले.

प्रसारमाध्यमांनी समाजातील चांगल्या गोष्टींवर अधिक भर दिला पाहिजे हा मुद्दा मांडताना त्यांनी १९९९ मधील आपल्या तेल अवीवच्या दौऱ्यातील प्रसंग कथन केला. तेथील वृत्तपत्रे बॉम्बहल्ले आणि लढाईच्या बातम्यांऐवजी वाळवंटात यशस्वी झालेल्या शेतीच्या प्रयोगांच्या बातम्या छापत असत, असे त्यांनी सांगितले. नागरिक अशा बातम्यांच्या शोधात असतात आणि त्यांना तशा बातम्या मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. प्रसारमाध्यमांच्या सुयोग्य विकासाच्या दृष्टीने प्रत्येक संस्थेत एक संशोधन शाखा असायला हवी, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवर खरे संशोधन करणे आणि त्यावर कायमस्वरूपी उपाय शोधण्याच्या कामात त्यामुळे मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वृत्तपत्रांच्या मालकांनी अशा संशोधनाला उत्तेजन द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. देशातील कृषीविषयक प्रश्नांना वाचा फोडणे तसेच आपत्कालीन सेवांना मदत करणे या दोन क्षेत्रांमध्ये प्रसारमाध्यमे आपला वाटा उचलू शकतात. विदर्भातील पत्रकारांनी आपल्या विभागातील समस्यांचा अभ्यास करून तेथे कायमस्वरूपी उपाययोजना शोधण्यासाठी राज्य सरकारला मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## * नाट्य कलावंत पुरस्कार

''जुन्य संगीत नाटकांचा केवळ वारसा जपून संगीत रंगभूमी पुढे जाणार नाही. नवे चेहरे, नवीन संगीत आणि वेगवेगळ्या विषयांचा समावेश करून नवीन नाटके तयार करण्याची गरज आहे. संगीत रंगभूमीवरही प्रायोगिक रंगभूमी निर्माण झाली पाहिजे,'' असे मत ज्येष्ठ रंगकर्मी अनंत कान्हो कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



कृष्णराव गोखले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा पुरस्कार संगीत रंगभूमीवरील गायक नट डॉ. रवींद्र घांगुर्डे यांना, 'हरी गणेश फडके' पारितोषिक प्रसाद बेडेकर, राजेश्वरी शेंडे आणि मानसी इनामदार या कलाकारांना, तर 'नरहरीबुवा पाटणकर' पारितोषिक ऊर्जिता जावडेकर बेहरे यांना कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी ग्रंथालयाचे अध्यक्ष प्रकाश फडके, कार्यवाह मुकुंद अनगळ, कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त निमकर उपस्थित होते.

कुलकर्णी म्हणाले, ''गद्य रंगभूमीने ज्या वेगाने नवीन बदल आत्मसात केले, तरुण पिढीला सामावून घेतले, तसे संगीत नाटकांच्या बाबतीत झाले नाही. आज तरुणांना संगीताने वेड लावले आहे. यात शास्त्रीय, सुगम संगीत मागे नाही. असे असतानाही नाटक तयार करणाऱ्या मंडळींना नवे चेहरे कसे मिळत नाहीत, याबद्दल शंकाच आहे.''

गद्य रंगभूमीच्या सद्य:स्थितीबद्दल ते म्हणाले, ''साहित्य आणि रंगभूमीचे काय नाते आहे, हे सांगायची वेळ आता आली आहे. नाटकात साहित्यमूल्ये आहेत का, याची दिग्दर्शकाने जाणीव ठेवली पाहिजे. कारण नाट्य हे शब्दांशी निगडित आहे.''

''आजकाल नाटक बनविण्यासाठी कोणी पुढे येत नाही, या मंडळींना समांतर, व्यावसायिक अशी भांडणे करीत नाटकाच्या माध्यमातून राजकारण, सत्ता मिळवायची आहे. यापेक्षा हौशी रंगकर्मींचे काम चांगले आहे. त्यांनी अलीकडच्या काळात आलेली त्यांची नाटके पाहिली, तर हौशी रंगभूमीच नाट्य चळवळीचे नवे बीज रोवते आहे असे लक्षात येते.'' असेही ते म्हणाले.

घांगुर्डे यांनी, ''सर्व नाट्यसंस्थांनी एकत्र येऊन समन्वयाने संगीत रंगभूमीच्या नव्या वाटचालीसाठी प्रयत्न केले पाहिजेत,'' अशी अपेक्षा व्यक्त केली.

## * संगीतकार खय्याम यांना लता मंगेशकर पुरस्कार

ज्येष्ठ संगीतकार मोहम्मद जहूर खय्याम यांना यंदाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार देण्यात येईल घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री अशोक चव्हाण यांनी केली. एक लाख रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. दिल्ली येथे लवकरच या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कार्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीच्या बैठकीस राज्यमंत्री राणा जगजितसिंह पाटील, सचिव भूषण गगराणी, संतूरवादक शिवकुमार शर्मा, गायक सुरेश वाडकर आदी उपस्थित होते. 'कभी कभी', 'त्रिशूल', 'नूरी', 'बाजार', 'रजिया सुलतान' आदी चित्रपटांतील सुप्रसिद्ध गाणी खय्याम यांनी संगीतबद्ध केली आहेत. 'उमराव जान'मधील गाण्यांमुळे त्यांची कारकीर्द बहरली. गीतकाराला विश्वासात घेऊन संगीत देणे, त्याला बरोबरीचे स्थान देणे; तसेच गीतकाराला गाण्यामागचा दृष्टिकोन व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य देणे, या त्यांच्या

वैशिष्ट्यगुणांमुळे खय्याम प्रसिद्ध आहेत.

### * दादासाहेब फाळके पुरस्कार

भारतीय चित्रपटसृष्टीतील भरीव योगदानाबद्दल प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांना चित्रपटक्षेत्रातील सर्वोच्च प्रतिष्ठेच्या 'दादासाहेब फाळके पुरस्कारा'ने गौरविले जाणार आहे. राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते त्यांना या वर्षाअखेरीस हा पुरस्कार बहाल केला जाईल. पुरस्कारात दोन लाख रुपये आणि स्वर्णकमळ यांचा समावेश आहे.

बेनेगल यांचा जन्म १९३४ मध्ये सध्याच्या आंध्रप्रदेशातील हैदराबाद येथे झाला. जन्माने कानडी असलेले व राज्यसभेचे सदस्यत्वही भूषविणारे बेनेगल यांना याआधी १९७६ मध्ये पद्मश्री किताबाने तर १९९१ मध्ये पद्मभूषण किताबाने गौरविण्यात आले आहे. फाळके पुरस्काराचे ते ३७ वे मानकरी आहेत. जाहिरातपटांच्या क्षेत्रातून चित्रपटसृष्टीत आलेले बेनेगल यांनी निर्माता, दिग्दर्शक, लेखक-पटकथाकार, छायाचित्रण व प्रकाशयोजनाकार, लघुपटनिर्माते अशा अनेकविध भूमिका लीलया पेलल्या आहेत. त्यांच्या अनेक चित्रपटांवर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय मान्यतेची मोहोर उमटली आहे. सुमारे दीड हजार जाहिराती, ५० लघुपट व वीसहून अधिक चित्रपट तसेच ५० हून अधिक भागांच्या दूरदर्शन मालिका; अशी त्यांची आजवरची कारकीर्द आहे.

त्यांच्या दिग्दर्शनाचा अमीट ठसा उमटलेल्या चित्रपटांमध्ये अंकुर, निशांत', मंथन, भूमिका, जुनून, कलयुग, मंडी, त्रिकाल, अंतर्नाद, सूरज का सातवाँ घोडा, मम्मो, सरदारी बेगम, द मेकिंग ऑफ महात्मा, समर, हरीभरी, झुबेदा आणि नेताजी- द फॉरगॉटन हिरो या चित्रपटांचा समावेश आहे. आठ चित्रपटांचे लेखन, तीन चित्रपटांची निर्मिती आणि 'निशांत'चे छायाचित्रण व प्रकाशयोजनाकार म्हणूनही त्यांनी कामगिरी बजावली.

त्यांच्या चित्रपटांनी त्यांना नावलौकिक मिळवून दिलाच; पण प्रत्येक चित्रपटाने लोकसंस्कृतीलाही अधिक प्रगल्भ केले. स्त्रीशोषणाच्या प्रश्नाचे अनेक पैलू उलगडवून दाखवणारे 'अंकुर' वा 'निशांत', हंसा वाडकर यांच्या 'सांगत्ये ऐका' या आत्मकथनावर आधारित 'भूमिका', कुरियन यांच्या धवलक्रांतीचा वेध घेणारा तसेच तब्बल पाच लाख दूधउत्पादक शेतकऱ्यांनी प्रत्येकी दोन रुपये काढून निर्माण केलेला 'मंथन', महाभारतातील संघर्षाचा धागा आधुनिक औद्योगिक घराण्यातील संघर्षात शोधू पाहणारा 'कलयुग', धर्मवीर भारतींच्या कादंबरीचा तितक्याच तोलामोलाचा दृश्यात्मक प्रत्यय देणारा 'सूरज का सातवाँ घोडा', शास्त्रीय संगीताचा वारसा टिकवू पाहणाऱ्या गायिकेचा जीवनप्रवास टिपणारा 'सरदारी बेगम', पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्यायाचा संदेश मांडणारा 'अंतर्नाद'; आदी चित्रपटांनी जनमानसावर आपला ठसा उमटविला. 'यात्रा', 'कथासागर' आणि 'भारत एक खोज' या



त्यांच्या दूरदर्शन मालिकाही कमालीच्या लोकप्रिय ठरल्या. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या चित्रपटाचे ते मानद सल्लागार होते. पुण्याच्या 'फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट'मध्येही ते काही काळ व्याख्याते होते.

❐

**आगामी**

**ताजमहालमध्ये सरपंच**




**शंकर पाटील**

**किंमत ९०रु.**
**पोस्टेज २० रु.**

शंकर पाटील यांनी कथा, कादंबरी, ललित लेख, वगनाट्य असे विविध साहित्य प्रकार हाताळले असले तरी ग्रामीण कथाकार म्हणूनच ते अधिक लोकप्रिय झाले.
'ताजमहालमध्ये सरपंच' हा कायम टवटवीत राहतील अशा कथांचा संग्रह. या कथा म्हणजे खुसखुशीत विनोदाआडून घडवलेलं वास्तवदर्शनच!

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# मानधन

**प्रमोदिनी वडके-कवळे**

वैभव नेमकी कोणत्या संपत्तीनुसार मोजलं जावं हा अनेकांच्या मते वादाचा विषय असेल पण त्या बाबतीतली माझी मतं पक्की आहेत. मैत्रधन हेच समृद्धीचं खरं मोजमाप आहे असं मला वाटत. आणि त्यानुसार मी स्वत:ला श्रीमंतच समजते. कारण मला भरपूर मैत्रिणी आहेत आणि दरवेळी माझ्या आयुष्यात आनंदाचे क्षण आणायला त्यातल्याच कुणाचा तरी हातभार लागतो.

यावेळीही असंच झालं.

. . .नेमकी मी स्वेच्छानिवृत्ति घेतली आणि त्याच सुमारास माझ्या मुलाने स्वत:चं लग्न ठरवलं. खरेदी आमंत्रणं. व्याहीभोजन आणि केळवणं असल्या माझ्या आवडत्या कार्यक्रमात मी गळ्यापर्यंत अशी काही बुडून गेले की आपण निवृत्त झालो आहोत हे माझ्या लक्षातही राहिलं नाही.

त्याचं लग्न व्हायच्या आतच मुलीचंही लग्न ठरलं आणि दोन महिन्यात तेही पार पडलं.

आयुष्यातली दोन ठळक इतिकर्तव्य अशी पटकन उरकूनच गेली.

मुलगा-सून त्याच्या नोकरीच्या गावाला आणि मुलगी गावात असली तरी तिच्या घरी. नोकरी सोडून बसलेल्या मला रिकाम्या घरात रिकाम्या वेळाचं काय करायचं याचा विचार करताकरता वेड लागायची पाळी आली.

पण चारपाच दिवसातच मला सुवर्णाचा फोन आला.

सामान्य कुटुंबात जन्मलेल्या पण अगदी पूर्णतया वेगळं जीवन जगलेल्या एका बाईना आपलं आत्मचरित्र लिहायची इच्छा होती. त्यांनी बराचसा भाग लिहून काढलाही होता. फक्त त्यांचं लेखन सफाईदार नव्हतं आणि आठवणींचे वेगवेगळे तुकडे नीट सांधून घ्यायला हवे होते.

''मी त्यांना तुझं नाव सुचवलंय. तुला चालेल ना?'' सुवर्णा फोनवर मला विचारत होती.

''हो. हो. नुसतं चालणार नाही. अगदी पळेल.'' मी घाईघाईने उत्तर दिलं.

नंतरचे दिवस अक्षरश: भारलेले होते.

माझ्या या नव्या कामातला सुरूवातीचा भाग होता गप्पांमधून त्यांचा परिचय करून घेण्याचा!



साधारण माझ्या आईच्या वयाच्या असलेल्या वत्सलाताई देखण्या व्यक्तीमत्त्वाच्या काहीशा मनस्वी स्वभावाच्या आणि सन्मानाचं. सुसंपन्न जीवन जगणाऱ्या. आजवरचं त्यांचं आयुष्य विलक्षण गतिमान आणि परस्परविरूद्ध घटनांनी भरलेलं होतं. बाईंची स्मरणशक्तीही दांडगी. सगळ्या घटना त्यांना अगदी नीट तपशीलवार आणि स्पष्टपणे आठवत होत्या. महत्त्वाच्या घटना त्यांनी लिहून काढलेल्याच होत्या पण बोलताना त्यांना आणखीही बरंच काही आठवत जायचं. रसाळपणे त्या तो प्रसंग मला सांगायच्या. मग मी म्हणायची ''हा प्रसंग लिहून काढलाय ना तुम्ही?''

'' नाही ग. सगळं कुठे लिहीत बसायचं?''

'' नाही पण हा प्रसंग घालायलाच हवा.''

'' कुठे घालणार आता?''

'' तुम्ही लिहून तर काढा. मी बघते कुठे आणि कसा घालायचा ते.''

असे संवाद दिवसातून कमीतकमी दोनदा तरी व्हायचे. दुसऱ्या दिवशी ते प्रसंग कथनाच्या ओघात कुठे बसवावेत याचा विचार करत मी त्यांच्याकडे जायची तेव्हा त्यांना आणखी कुठलातरी वेगळाच प्रसंग आठवलेला असायचा. त्यांनी तो सांगितल्यावर पुन्हा मला वाटायचं. हाही प्रसंग महत्त्वाचा आहे. पुस्तकात कुठेतरी यायलाच हवा हा.

कधीकधी 'हे पुस्तकासाठी नाही हं.' असं म्हणत त्या वेगळयाच विषयावर घसरायच्या. मनाच्या खोल तळातलं एखादं गुपित अगदी विश्वासाने मला सांगायच्या आणि ते ऐकताना यांनी आपल्यावर किती विश्वास टाकलाय या भावनेने मलाही खुप बरं वाटायचं. आमच्या नात्याच्या विणीत मैत्रीचा एक रंगीत रेशीमधागा नकळतपणे गुंफला जायचा.

नोकरी करत असताना कधीकधी कंटाळा यायचा. घरातल्या कामाने दमणूक झाली की ऑफिसला जायचा विचारही नकोसा वाटायचा. पण या बाबतीत मात्र तसं झालं नाही. घरातलं तेच ते काम उरकून मी रोज वेळेवर बाहेर पडायची. बसरिक्षाचा प्रवास करून सहलीला जावं तशा उत्साहाने वत्सलाताईंकडे पोचायची.

बरेचदा त्यांची एक भाचीही आमच्याबरोबर असायची. आपल्या मावशीबद्दल तिला सार्थ अभिमान होता. वयाने ती आमच्या दोघींपेक्षा बरीच लहान होती पण मावशीने आयुष्यात पार केलेले खाचखळगे आणि परिस्थितीशी झगडून मिळवलेलं यश याबद्दल बोलताना तिचे विचार एकदम परिपक्व वाटायचे. आमचं लिखाण कॉम्प्युटरवर टकाटक लिहून काढायलाही तिची मदत व्हायची. असं तीन पिढयातल्या तिघी मिळून एकच काम करताना संघभावनेची एक छान हवीहवीशी जाणीव मनात जागायची आणि आमच्यातला मैत्रीचा धागा त्या जाणीवेला अलगदपणे वेढून घ्यायचा.

मध्येच कधीतरी वत्सलाताईंच्या लोणावळयाच्या बंगल्याचा विषय निघाला आणि पटकन तिकडे जायचा बेत ठरला. दिवसरात्रीचं भान न ठेवता तिघींनी अविरतपणे मारलेल्या गप्पा आणि बंगल्यावरच्या खानसाम्याने बनवलेलं तऱ्हेतऱ्हेचे रूचकर (आणि आयतंही) जेवण! लोणावळयाचे ते दिवस अगदी माहेरपणाचा अनुभव देणारे होते. ऐन उन्हाळयातली ती सहल मनाला छानसा गारवा देउन गेली.

पुस्तकाचं लिखाण पुरं झालं तेव्हा ते उगीच पुरं झालं अशी वेडी हुरहूर माझ्या मनात दाटून आली होती. त्यामुळे त्याकाळात कुणीही भेटलं तरी मी त्याच्याजवळ त्या पुस्तकाबद्दलच बोलायची.

''मानधन किती मिळालं या लिखाणाचं?'' एकदा असंच मी भारावून बोलत असताना कुणीतरी माझे पाय जमिनीवर आणण्याचा प्रयत्न केला.

मी मानधनाचा आकडा सांगताच त्या रकमेचं (आणि माझ्या सुरातल्या अभिमानाचंही) प्रचंड आश्चर्य वाटून त्या व्यक्तीने जरा जोरातच विचारलं. ''काय सांगता? फक्त एवढेच? अहो अशा लिखाणाचं मानधन केवढालं घेतात हल्ली. शिवाय त्या बाई चांगल्या श्रीमंत आहेत. तुम्ही जरा मोठा आकडा सांगायला हवा होता.''

'हो ना! अगदीच चुकलं माझं.' असा चेहरा करून मी गप्प बसले.

कारण तेच शहाणपणाचं ठरणार होतं.

व्यवहाराच्या दृष्टीने पाहिलं तर विचारणाऱ्या माणसाचा हिशोब बरोबरच होता. पण माझ्या दृष्टीने?

पाखरं घरटयातून उडून गेल्यावर पक्षिणी म्हणे रिकाम्या घरटयाकडे पाहून सैरभैर होते. आर्त आवाजात ओरडत त्या रिकाम्या घरटयाभोवती घिरटया घालत रहाते. तिची ही अवस्था संपवण्यासाठी निसर्गाने तिच्या दुसऱ्या विणीच्या हंगामाची सोय केलेली आहे.

माणसासाठी मात्र ती सोय नाही. पिलं घरटयातून उडून गेल्यावर आलेलं एकटेपण घालवण्यासाठी त्याने स्वत:च कितीतरी सोयी करून घेतल्या आहेत. पेन्शनर्सक्लब भ्रमणमंडळ हास्यक्लब अमुकसंघ तमुकमंडळ. पण तरीही ते जीवघेणं एकटेपण मागे उरतंच. माझ्यावर ते तेवढंसं जोरदारपणे कोसळलं नाही. कारण सुवर्णाने माझ्यासाठी केलेली ही मोठी सोय! वत्सलाताईंच्या पुस्तकाचं काम.

सुरूवातीला काम म्हणून ते स्वीकारल्यावर आमच्यात मानधनाचंही बोलणं झालं होतं पण नंतरच्या सगळया प्रवाहात मला त्याचा पार विसर पडला. कारण आपल्याला आनंद देणाऱ्या, आपला एकटेपणा घालवणाऱ्या गोष्टींचं मानधन कोणत्या आकडयात मोजायचं असतं याचं गणितच मला कळलेलं नव्हतं. तसं ते कधीच कळत नाही. कारण मी आनंदाचा आणि वैफल्याचा हिशोब मांडायला शिकले ती बिनभिंतीच्या शाळेत. मनाला भिडणारी कोणतीच गोष्ट पैशात मोजायची



नसते हाच खरा व्यवहार आहे असं मला वाटतं. तसं केलं की सुखाचा गुणाकार आणि मनस्तापाची वजाबाकी आपोआपच होते.

आनंदावैफल्याचं हे गणित नफ्यातोटयाचं नसतंच मुळी. ते आकडयांचंही नसतं. ते असतं मऊ उबदार किंवा बोचऱ्या काटेरी शब्दांचं!

एखाद्या दिवशी कथाकथनाच्या प्रयोगाचं आमंत्रण देणारा फोन येतो. स्थळवेळ ठरवल्यावर पलिकडून प्रश्न येतो. ''मानधन किती आहे तुमचं?''

मी सांगते ''तुमच्या संस्थेला परवडेल तितकं.''

मानधनाच्या बाबतीतलं माझं हे उत्तर माझ्या हितचिंतकांना अजिबात आवडत नाही. संस्थेला परवडण्याचा विचार तू कशाला करतेस? सरळ एक आकडा ठरवून सांगून टाकायचं. आजकाल रिक्षाचं भाडंसुद्धा किती वाढलंय.'' असा जिव्हाळयाचा पण व्यवहारी सल्ला मला नेहमी मिळतो. .

खुद्द त्या संस्थेच्या कार्यकर्त्यालाही माझं हे बेहिशोबी उत्तर फारसं रूचत नाही. माझ्या कथाकथनाच्या गुणवत्तेबद्दल त्याच्या मनात जरा शंकाच येते.

मी कार्यक्रमाला जाते. श्रोत्यांमधे बरीचशी ज्येष्ठ मंडळीच असतात. काहीजण घराच्या जवळचा सोयीचा कार्यक्रम म्हणून आलेले. तर कुणी मंडळाची वार्षिक वर्गणी भरलेली आहे ती वसूल व्हायला हवी हा हिशोब मनात ठेवून लांबूनही आलेले. सुरूवातीला सगळयांच्याच चेहऱ्यावर एक थंड तटस्थपणा उमटून राहिलेला मला दिसतो. माझ्याही मनावर 'आज काय होणार आपलं?' असा ताण साचून येतो.

पण हळुहळू माझ्या बोलण्याचा आणि समोरच्या श्रोत्यांचा सूर जमतो. तल्लीन होउन ते माझ्या कथा ऐकतात. काही उल्लेखांनी त्यांच्या जुन्या आठवणी जाग्या होतात. या आठवणी कधी त्यांच्या चष्म्यातून चमकतात तर कधी सुरकुतलेल्या गालावरसुद्धा उतरतात.

कार्यक्रम संपला की माझ्याभोवती गर्दी जमते. 'ती कथा फार आवडली.' 'या कथेतलं वर्णन ऐकून मला माझ्या गावाची आठवण आली.' 'ही कथा आहे ना अगदी तस्संच घडलंय माझ्या बाबतीत.' 'फार छान वाटलं. वेळ कसा गेला कळलंच नाही.' 'आणखी एखादी कथा चालली असती.' असे कौतुकाचे पुष्पगुच्छ घेउन एकेकजण उभा असतो. आयुष्याबद्दल स्थितप्रज्ञ झालेल्या ज्येष्ठ नागरिकांकडून माझ्या अजाण शब्दांना हा एवढा 'मान' मिळाल्यावर 'धना'चा हिशोब कुणी आणि कशाला ठेवायचा?

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

# नवे कोरे

## आयएसआयच्या कारवाया




पदम शर्मा

अनुवाद :अरुण मांडे

❒ ❒ ❒

**किंमत : १५०रु.**

पोस्टेज : २५रु.

भारतीयांच्या अतिशय कुतूहलाचा विषय म्हणजे भारत-पाक संबंध होय. या पुस्तकामध्ये पाकिस्तानच्या आयएसआयच्या प्रसार, दहशतवादाचा उद्रेक, दिवसेंदिवस अधिक शक्तिमान होत जाणारी आहे. तिचं सतत व्यापकपणे पसरत जाणारं जाळं, याबद्दल अतिशय सखोल माहिती दिली आहे.

आयएसआय लष्करांतर्गत असलेलं लष्कर, शासनांतर्गत असलेलं शासन, राज्यांतर्गत असलेलं राज्य - अशा आयएसआयने इतर ठिकाणी आणि विशेषत: भारतामध्ये खुपसलेली विषारी नखे, अमेरिकेची गुप्तचर संस्था आणि आयएसआय याचं साटंलोटं....

राजकीय पडद्याआडून आयएसआयच्या कारवाया कशा चालतात हे वाचताना कुणीही चकित होईल असे हे पुस्तक.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# श्रद्धांजली

*** श्री. पु. भागवत**



मराठीतील अभिरुचीसंपन्न समीक्षक, साक्षेपी संपादक तसेच 'मौज प्रकाशनगृह'चे संवर्धक प्रा. श्रीकृष्ण पुरुषोत्तम ऊर्फ श्री. पु. भागवत यांचे २१ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात त्यांचे पुत्र अशोक, सून आणि नातवंडे आहेत. श्रीपुंच्या निधनाने मराठी साहित्यातील एक पर्व हरपले, अशा शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत.

सत्यकथा आणि मौज या मराठीतील सर्वकालीन दर्जेदार आणि अभिरुचीसंपन्न मासिकांचे संपादक म्हणून सिद्ध झालेल्या श्रीपुंचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख येथे २७ डिसेंबर १९२३ रोजी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर मुंबईच्या युनियन हायस्कूलमधून मॅट्रिकपर्यंत तर रुईया महाविद्यालयात एम. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याच महाविद्यालयात त्यांनी काही काळ अध्यापनही केले. पुढे एसआयइएस महाविद्यालयात प्रदीर्घ काल अध्यापन करुन ते निवृत्त झाले. श्रीपुंचा मूळ पिंड हा शिक्षकाचाच होता. बहुदा त्यातूनच त्यांनी संपादनाची धुरा सांभाळतानाही अनेक नवागतांना, होतकरुंना लिहिते केले, घडवले. १९४५ पासून त्यांनी मौज, सत्यकथा या नियतकालिकांच्या संपादनात सहभाग घेण्यास सुरुवात केली. प्रा. र. न. फाटक, प्रा. गोवर्धन पारिख आदींच्या अध्यापनाचे संस्कार तसेच त्या जोडीला भरपूर वाचन, तत्कालिन सामाजिक तसेच राजकीय चळवळींचा जवळून झालेला परिचय या सगळ्यांतून श्रीपुंचे व्यक्तित्व संस्कारित होत गेले. सत्यकथा मासिकाने १९४५ नंतर नववाङ्मयाला प्राधान्य देणारे जे नवे रुप धारण केले त्यात श्रीपुंचा महत्त्वाचा सहभाग होता. श्रीपुंना त्यांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत अनेक गौरव व पुरस्कार प्राप्त झाले. अलीकडेच 'चतुरंग प्रतिष्ठान'ने त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. मौज प्रकाशनातर्फे सत्यकथा

हे साप्ताहिक पूर्वीपासूनच चालविले जात असे. मात्र श्री. पु. भागवत व ग. रा. कामत यांनी त्याला खऱ्या अर्थाने वाङ्मयीन स्वरूप दिले. सत्यकथेमुळे मराठीतील अनेक प्रयोगशील कथाकार व कवींसाठी एक उत्तम व्यासपीठ तयार झाले. या व्यासपीठाने मराठीला श्री. ना. पेंडसे, गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, जी. ए. कुलकर्णी, कमल देसाई, उद्धव ज. शेळके, हमीद दलवाई यांच्यासारखे नव्या दमाचे व नव्या विचारांचे कथाकार दिले. तर मराठी कवितेला नवे आयाम देणाऱ्या कवींमधील चिं. त्र्य. खानोलकर उर्फ आरती प्रभू, नामदेव ढसाळ, अरुण कोलटकर, गुरुनाथ धुरी, दिलीप चित्रे यांच्यासारखे कवीदेखील सत्यकथेमुळेच उजेडात आले. मौज प्रकाशनातर्फे प्रकाशित झालेल्या अनेक पुस्तकांनी मराठी साहित्याला जागतिक उंचीवर नेले. यात कॉम्रेड गोदावरी परूळेकर यांचे 'जेव्हा माणूस जागा झाला' अनिल अवचट यांचे 'माणसं' आदी पुस्तकांचा सामावेश आहे.

**राज्य शासनातर्फे 'श्रीपु भागवत' पुरस्कार दिले जाणार...**

मराठीतल्या उत्कृष्ट प्रकाशकाला यंदापासून 'मौजकार श्री.पु.भागवत पुरस्कार' देण्याची घोषणा मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी केली आहे.

राज्य सरकार दरवर्षी साहित्य पुरस्कार देते. त्यात आता 'मौजाकारां'च्या नावाचा पुरस्कार असेल. श्रीपुंचा मुलगा अशोक अमेरिकेतून मुंबईत दाखल झाला. त्यांनतर सायन येथे घरी श्रीपुंना श्रद्धांजली वाीहल्यानंतर सायन स्मशानभूमीत अंतिम संस्कार झाले. अशोक यांनी मौज परिवार व भागवत कुटुंबीय यांच्या वतीने भावना व्यक्त केल्या. तेव्हा सर्वानी दोन मिनिटे स्तब्ध राहून मराठी साहित्यातील या युगकर्त्याचे स्मरण केले. मुख्यमंत्र्यांच्या वतीने यावेळी पुष्पचक्र वाहण्यात आले. मंगेश पाडगावकर, राम पटवर्धन, वसंत सरवटे, गंगाधर पाटील, अरुण साधू, सुभाष भेंडे, शंकर वैद्य, विजया राजाध्यक्ष, यास्मिन शेख, सु. रा. चुनेकर, वसंत आबाजी हडाके आदी लेखक तसेच रसिक यावेळी उपस्थित होते.

*** साहित्य परिषदेचे तीन दशकांचे सूत्रधार – डॉ. गं. ना. जोगळेकर**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्षपद तब्बल बारा वर्षे सातत्याने आपल्या हाती ठेवणारे आणि एकूणच मराठी साहित्यक्षेत्राचे सूत्रधारपद आपल्या एकछत्री कारभाराने भूषविणारे डॉ. गं. ना. जोगळेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याची बातमी धक्कादायक वाटावी यात नवल नाही. दिनांक १३ ऑगस्ट रोजी ते दिवसभर सासवडच्या आचार्य अत्रे साहित्य संमेलनाला उपस्थित होते; तेथून परतल्यावर साहित्य परिषदेत झालेल्या कार्यक्रमालाही रात्री साडेआठपर्यंत ते हजर होते... त्यामुळे त्यानंतर सातआठ तासांच्या आतच आलेली त्यांच्या निधनाची वार्ता– अगदीच अनपेक्षित होती. केवळ फोनवरूनच ही वार्ता पुण्यातील लेखक-कवी-रसिकांना कळली आणि तरीही शंभर-दीडशे व्यक्तींनी त्यांच्या





अंत्यदर्शनासाठी परिषदेत गर्दी केली. त्यांच्या एकूण कार्यकर्तृत्वाला मिळालेली ती पावतीच म्हणायला हवी.

डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी मराठीचे प्राध्यापक म्हणून फर्गसन महाविद्यालयात तीस वर्षे अध्यापन केले. शेकडो विद्यार्थी त्यांच्या हाताखालून गेले. १९७५ पासून महाराष्ट्र साहित्य परिषदेला त्यांनी आपले कार्यक्षेत्र बनवले; आणि साहित्य परिषदेच्या विविध उपक्रमांमध्ये ते उत्साहाने भाग घेऊ लागले. साहित्य परिषदेच्या मराठी परीक्षांचे त्यांनी पुनरुज्जीवन केले. प्राज्ञ, विशारद वगैरेंचे वर्ग गावोगावी सुरू केले. त्यामुळे शेकडो विद्यार्थी या परीक्षांना बसू लागले. डॉ. जोगळेकरांचा कामाचा आवाका व्यापक होता. साहित्य परिषदेच्या प्रमुख अशा सर्व उपक्रमांत त्यांचा सहभाग असे. ग्रंथालय, वर्षात होणारे डझनवारी कार्यक्रम, उत्तम ग्रंथांना पुरस्कार, साहित्य पत्रिकेचे प्रकाशन, गावोगावच्या शाखा, महामंडळाचे कार्य वगैरे सर्व बाबतीत त्यांना स्वारस्य होते आणि त्या-त्या बाबींशी संबंधित अनेक समित्यांवर त्यांनी वेळोवेळी कामही केले. त्यामुळे परिषदेच्या कार्याशी ते एकरूप झालेले होते. त्यांच्या पॅनेलला वर्षानुवर्षे निवडणुकीत बहुमत मिळत असे. एकदोनदा त्यांच्या पॅनेलची थोडी पीछेहाट झाली. परंतु नंतर त्यांनी विरोधकांना व्यवस्थित हाताळून किंवा डच्चू देऊन आपले वर्चस्व कायम राखले. साहित्य संमेलन घेण्याचे सर्व अधिकार आरंभी साहित्य परिषदेकडे असत. त्यामुळे परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा दबदबा-दरारा असे... पुढे महाराष्ट्र साहित्य परिषदेऐवजी अ.भा. मराठी साहित्य महामंडळाची स्थापना करून, त्याकडे संमेलनाच्या आयोजनाचे अधिकार सोपवण्यात आले. महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, मुंबई साहित्य संघ, आणि विदर्भ साहित्य संघ या चार संस्थांना घटकसंस्था म्हणून त्यात स्थान मिळेल. या महामंडळाचे कार्यालय दर तीन वर्षांनी एकेका संस्थेकडे असे. तेथील कोणीतरी महामंडळाचा अध्यक्ष म्हणून निवडला जाई.

संमेलनासाठी निमंत्रण देणाऱ्या संस्थेची व स्थळाची निवड, संमेलनातील निमंत्रित वक्ते आणि विविध कार्यक्रम ठरवणे हे महामंडळाच्या अधिकारात असे. वेगवेगळ्या घटकसंस्थांकडे कार्यालये असली तरी डॉ. जोगळेकर यांच्या शब्दाला आणि मताला अनेकदा निर्णायक स्थान असे. त्यामुळे डॉ. जोगळेकर यांचे महत्त्व वाढत गेले. किंगमेकरच्या या भूमिकेचा त्यांनाही मोह पडला. आपले प्रभुत्व साहित्य परिषदेवर राहावे या दृष्टीने गेली वीस वर्षे त्यांनी व्यूहरचना केली. कोणाला जवळ करायचे, कोणाला दूर करायचे याचे ठोकताळे ठरवले.

त्यामुळे परिषदेच्या सदस्यांपैकी काही जणांना आणि काही शाखांच्या पदाधिकाऱ्यांना त्यांचा जाचही झाला. मला स्वत:ला परिषदेच्या पत्रिकेच्या संपादनामध्ये त्यांच्या नाराजीचा सामना करावा लागला आणि राजीनामा द्यावा लागला... त्यानंतर सातारा येथे अ.भा. साहित्य संमेलनाचे आमंत्रण मा. अभयसिंहराजे भोसले यांच्या पुढाकाराने आम्ही दिले. नागपूरला महामंडळाच्या बैठकीत ते स्वीकारले गेले. परंतु डॉ. जोगळेकरांनी ते आमंत्रण स्वीकारल्याबद्दल महामंडळाचे अध्यक्ष सुरेश द्वादशीवार यांना धारेवर धरले. पुढे ते आमंत्रण स्वीकारण्यावर शिक्कामोर्तब झाले. ते संमेलन अत्यंत उत्तम झाले. परंतु डॉ. जोगळेकरांनी पदोपदी विरोध करण्यात कसूर केली नाही. एखाद्या व्यक्तीच्या दीर्घकालीन पकडीमुळे संस्थेला स्थैर्य येते. तसेच संस्थेच्या कामात साचेबंदपणाही येतो. संस्थेची वाढ थांबते. आपण म्हणतो तसेच सर्व व्हायला हवे हा हट्ट संस्थेच्या प्रगतीत खीळ घालतो.

साहित्य परिषदेची जन्मशताब्दी २००६ साली साजरी झाली. त्या निमित्ताने खरे तर अनेक योजनांना चालना देता आली असती. परिषदेची सध्याची जागा आणि वास्तू एकूण कार्याच्या मानाने फार तोकडी आहे. नवीन प्रशस्त इमारत, सभागृह, अतिथीगृह, ग्रंथालय यादृष्टीने सोयीस्कर जागा मिळवण्याची गरज आहे. परंतु त्याबाबत साहित्य परिषदेला यश आलेले नाही. डॉ. जोगळेकर यांच्या कार्यपद्धतीच्या मर्यादा परिषदेच्या जन्मशताब्दीच्या सोहळ्यालाही पडल्या. डॉ. पतंगराव कदम यांच्या संस्थेला या जन्मशताब्दीचे कंत्राट दिले गेले... डॉ. पतंगरावांनी आपली सर्व यंत्रणा उदारपणे राबवली. परंतु मोजकी उपस्थिती आणि सरधोपट कार्यक्रम यामुळे हा सोहळा अगदीच सुमार झाला. जन्मशताब्दीच्या निमित्ताने निधी संकलनही जे झाले ते कोटीचा आकडाही गाठू शकले नाही.

डॉ. जोगळेकर हे गेली चाळीस वर्षे शिक्षणक्षेत्र आणि साहित्य परिषद यांच्याशी संबंधित होते, त्यामुळे त्यांचा साहित्यक्षेत्रातील वावर हा महत्त्वपूर्ण होताच. मराठी साहित्याचा इतिहास, इंग्रजी इतिहास, संशोधनात्मक ग्रंथांची सिद्धता यात त्यांचाही पुढाकार होता. परिषदेच्या कामातले सातत्य त्यांनी टिकवून धरले. नव्या शाखांनाही त्यांनी चालना दिली. साहित्य परिषदेचा दबदबा त्यांनी टिकवून धरला. परंतु साहित्यपरिषदेच्या कार्याला व्यापक अधिष्ठान देण्याच्या दृष्टीने फारसे काही झाले नाही. मा. विलासराव देशमुख यांचा यथोचित मान एका समारंभात राखला न गेल्याने ते नाराज झालेले आहेत; त्यांची नाराजी परिषदेला वास्तू उभारणे वा निधी संकलन करणे यांच्या आड येत राहिली आहे. विदर्भ साहित्य संघ, मुंबई साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद यांच्या स्वत:च्या भव्य वास्तू उभ्या झाल्या आहेत; परंतु साहित्य परिषदेला अजूनही पन्नास वर्षांपूर्वीच्या छोटेखानी जागेतच आपला सर्व संसार सीमित ठेवणे भाग पडले आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेने गेल्या दहाबारा वर्षांत साहित्य परिषदेपेक्षाही जास्त शाखा



काढण्यात यश मिळवले आहे. दक्षिण महाराष्ट्र परिषदेनेही आपले कार्य विस्तारत नेले आहे; परंतु साहित्य परिषदेने त्यांच्या कार्याची दखल घेण्याची टाळाटाळ चालविली आहे. एकूण साहित्यव्यवहाराचा सध्या पसारा वाढत आहे; परंतु त्याची दखल घेऊन आपल्या कामकाजाला, साहित्य संमेलनांना नवी दिशा देण्याबाबत साहित्य परिषद आणि महामंडळ कमी पडत आहेत.

डॉ. जोगळेकर हे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे गेली तीस वर्षे अध्वर्यू होते. चालताबोलता ज्ञानकोश होते. साहित्य चळवळीसाठी त्यांनी हयात वेचली. लेखनापेक्षा अध्यापन आणि साहित्यसंस्थांचे व्यवस्थापन यात त्यांना स्वारस्य होते. संस्थेवरची आपली पकड त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवली; हे त्यांचे कौशल्य विसरता येणार नाही. अनेक संमेलनांचे आणि अध्यक्षांचे मार्गदर्शक, सूत्रधार, किंगमेकर म्हणून त्यांचे स्मरण सतत होत राहील.

**– शंकर सारडा**

## * ज्येष्ठ कवयित्री वृंदा लिमये

गेली पाच दशके बालकवितांचा नवनवा आविष्कार घडवणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री वृंदा लिमये यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. वयाच्या ७८ व्या वर्षीही त्यांचे लेखन चालू होते. त्यांची दहा पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

जंतरमंतर कमाल आणि धमाल, गंमतजत्रा यासारख्या अनेक बालकवितासंग्रहांप्रमाणेच त्यांचे काळोखकमळ व नि:शब्दाचे रंग हे काव्यसंग्रहही नावाजले गेले. 'काळोखकमळ'ला नुकताच इंदूर साहित्य सभेचा पुरस्कारही मिळाला होता. वृंदा लिमये पंडित फिरोज दस्तूर व हिराबाई बडोदेकर यांच्या शिष्या होत्या. पुण्याच्या सवाई गंधर्व महोत्सवात त्यांचे गायनही झाले होते.

वृंदा लिमये इंग्रजी साहित्याच्या रसिक जाणकार होत्या. त्यांचे इंग्रजी पुस्तकांवरचे लेखन 'सत्यकथे'त गाजले होते. शिक्षणतज्ज्ञ आईची– यमुनाबाई हिर्लेकरांची स्मृती जपण्याची त्यांची धडपड असायची.

## * ज्येष्ठ व्यंगचित्रकार हरिश्चंद्र लचके

दुसऱ्या महायुद्धात हिरोशिमा आणि नागासाकी या जपानमधील दोन शहरांवरील अणुबॉम्ब टाकल्याबद्दल 'द ॲटॉमिक एग हॅचड्' हे व्यंगचित्र 'द टाइम्स ऑफ इंडिया'च्या पहिल्या पानावर काढणारे हरिश्चंद्र लचके हे पहिले मराठी व्यंगचित्रकार! त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. लचके यांच्या पश्चात मुलगा, मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे.

गेली सहा दशके मराठी मासिके तसेच दिवाळी अंकांमधील आपल्या व्यंगचित्रांद्वारे वाचकांना मनमुराद हसवण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या कामाची पहिली दखल 'किर्लोस्कर'चे संपादक शं. वा. किर्लोस्कर यांनी घेतली. त्यांच्या प्रोत्साहनातूनच

लचके यांनी 'स्त्री', 'किर्लोस्कर' तसेच पुढे 'मोहिनी', 'हंस', 'जत्रा' आणि 'आवाज' अशा विविध अंक तसेच दिवाळी अंकांमधून सातत्याने व्यंगचित्रे काढली.

'टाइम्स'च्या १७ ऑगस्ट १९४५ रोजीच्या अंकातील व्यंगचित्राबद्दल लचके यांना ५० रुपये मानधन मिळाले होते!

१९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात भारतीयांचे देशप्रेम आणि ब्रिटिश सरकारची खिल्ली उडवणारी व्यंगचित्रेही काढली. जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे विद्यार्थी असणाऱ्या लचके यांनी मुलांसाठी काही पुस्तके लिहिली. त्यामध्ये 'हसा आणि हसवा', 'हसा आणि लठ्ठ व्हा' तसेच 'गुदगुल्या' आणि 'हसा मुलांनो हसा' इत्यादी पुस्तकांचा समावेश आहे.

### * डॉ. सरोजिनी वैद्य

ज्येष्ठ लेखिका आणि समीक्षक डॉ. सरोजिनी वैद्य (वय ७४) यांचे ३ ऑगस्ट रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पती कवी शंकर वैद्य, मुलगा निरंजन व सून असा परिवार आहे.

दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा वाग्विलासिनी पुरस्कार स्वीकारण्यासाठी पुण्यात आल्या असतानाच त्यांची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे २६ एप्रिलपासून त्या पुणे येथील रुग्णालयातच दाखल होत्या. त्यांनी लिहिलेल्या 'काव्य आणि काव्योदय कर्ते वासुदेव बळवंत पटवर्धन- जीवन आणि लेखन' या पुस्तकाचे औपचारिकरित्या नुकतेच प्रकाशन झाले होते.

१५ जून १९३३ रोजी पुणे येथे त्यांचा जन्म झाला. पुणे विद्यापीठातून त्यांनी एम.ए. केले, तर मुंबई विद्यापीठाची पीएच.डी. प्राप्त केली. १९५७ ते ९३ पर्यंत त्यांनी अध्यापनाचे कार्य केले.

राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालकपदी १९९३ ते २००१ पर्यंत काम केले. 'पहाटपाणी', 'माती आणि मूर्ती', 'गोपाळराव हरी', 'काशीबाई कानिटकर', 'शब्दायन', 'नाट्यछटाकार दिवाकर- जीवन आणि लेखन', 'श्रीमती रमाबाई रानडे- व्यक्ती आणि कार्ये', 'संक्रमण' आदी पुस्तकांचे लेखन त्यांनी केले. 'नानासाहेब फाटक- व्यक्ती आणि कला', 'वाङ्मयीन महत्ता', 'टी. एस. एलियट आणि नवीन मराठी कविता', 'ज्ञानदेवी', 'इतिहासकार त्र्यंबक शंकर शेजवलकर', 'द. ग. गोडसे', 'समग्र दिवाकर' आदी पुस्तकांचे त्यांनी संपादन केले.

ललित निबंध, संशोधन व समीक्षा क्षेत्रातील त्यांच्या पाच पुस्तकांना राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे शि. म. परांजपे पारितोषिक, नगरवाचन मंदिराचा ह. स. गोखले पुरस्कार, सत्यशोधक पुरस्कार आदी पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले होते. बडोदा वाङ्मय परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.



### * मनीष मेहता



निपाणी, बेळगाव येथील 'अजब स्टोअर्स'चे संचालक श्री. प्रकाश मेहता यांचे द्वितीय पुत्र मनीष मेहता यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. ते ४१ वर्षांचे होते. पेशाने मेकॅनिकल इंजिनिअर असणाऱ्या मनीष यांचे गेली १६ वर्षे अमेरिकेतील बेलमाऊंट या शहरात वास्तव्य होते. गेली काही वर्षे ते कर्करोगाने ग्रस्त होते. कर्करोग बळावल्याने गेल्या ९ ऑगस्ट रोजी त्यांचे निधन झाले.

मनीष यांचे मागे त्यांची पत्नी, आई-वडिल, आणि दोन भाऊ आहेत. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. अनिल मेहता यांचे ते पुतणे आणि श्री. सुनील मेहता यांचे ते चुलत बंधु होत.

खेळकर आणि हसतमुख स्वभावाचे मनीष पाहताक्षणी सर्वांना आपलेसे करून घेत. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. त्यांच्या अकाली निधनाबद्दल नातेवाईक आणि मित्रपरिवारात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे आणि 'मेहता बुक सेलर्स', कोल्हापूर परिवारातर्फे मनीष मेहता यांना विनम्र श्रद्धांजली.

❒

# बालनगरी

## अनुक्रमणिका

गजेंद्र १०३





## गजेंद्र

'इंद्रद्युम्न' हा एक चारित्र्यवान राजा होता.



एकदा त्याने आपल्या मंत्रिमंडळाची सभा बोलावली.






राजा इंद्रद्युम्न कुलाचला पर्वतावर पोहोचला. तिथे स्वतःसाठी एक झोपडी त्याने बांधली. निःशब्द शांततेत त्याने विष्णुनामाचा जप सुरू केला.



एके दिवशी अगस्ती ऋषी आपल्या शिष्यांसह त्या ठिकाणी आले.









अगस्तीऋषींची शापवाणी स्वर्गात बसलेल्या भगवान विष्णुंनी ऐकली. ते हळूच हसले.




शापामुळे इंद्रद्युम्नचे एका हत्तीत रूपांतर झाले.



इकडे तिकडे भटकताना इंद्रद्युम्नला समोर एक हत्तींचा कळप दिसला.




दोघांच्या लढाईला सुरूवात झाली.



हत्तींच्या राजाचा पराभव करून इंद्रद्युम्न नवीन राजा झाला.







गजेंद्राने सर्वांना त्रिकुट जंगलाकडे नेले.





या जंगलात एक तलाव होता. त्यांत एका मगरीचे वास्तव्य होते. हत्ती तलावातून जाऊ लागले.




रागावलेली मगर भराभर गजेंद्राच्या दिशेने पोहायला लागली.




पाणी पिऊन ताजेतवाने झाल्यावर, हत्ती पाण्यातून बाहेर यायला लागले...




सुटण्यासाठी गजेंद्र धडपड करू लागला. पण त्याला त्यातून वेदनाच जास्त होऊ लागल्या.
या मगरीनं माझा पाय घट्ट पकडून ठेवलाय.
राजा, आम्ही आलोय तुझ्या मदतीला.
गजेंद्राला ओढण्याचा सर्व हत्तींनी प्रयत्न केला, पण व्यर्थ...
या मगरीत दैवी शक्ती असावी. आपण काहीच करू शकत नाही.




गजेंद्र हताश झाला.
काय करावं बरं?
त्याला भगवान विष्णुंची आठवण झाली.
हे देवा! मला मदत करा.
विष्णु वैकुंठ सोडून गरूडावरून निघाले.
देवा! मी तुमच्या मदतीचीच वाट पाहतोय.
भगवान विष्णु तिथे पोहोचले...
आपल्या सुदर्शन चक्राने त्यांनी मगरीला मारून टाकले.
देवा! देवा!

गजेंद्र पाण्याबाहेर आला. गुडघे टेकून तो विष्णुसमोर बसला.







भगवान विष्णुंचा स्पर्श होताच, गजेंद्राला मानवाचे रूप मिळाले.






# गोलात अंक भरा




सोबतच्या आकृतीत एका मोठ्या वर्तुळाच्या परिघावर १० गोल काढलेले आहेत. ही दहा घरे समोरासमोरच्या गोलांना सरळ रेषांनी जोडली आहेत. या दहा गोल घरात १ ते १० हे अंक अशा प्रकारे लिहावयाचे आहेत की, कोणत्याही दोन शेजारी असणाऱ्या गोलांतील अंकांची बेरीज आणि त्यांच्या नेमक्या समोरच्या म्हणजे सरळरेषेच्या दुसऱ्या बाजूला असणाऱ्या गोलातील अंकांची बेरीज सारखीच येईल. १० अंकांपैकी १ हा अंक आधीच लिहीला आहे. आता बाकीचे २ ते १० हे अंक योग्य प्रकारे त्या गोलात भरा बरं!